

आदिकवी

श्री वाल्मिकी

विरचित

मूळ संस्कृत

रामायण

७

मराठी श्लोक

श्री. श्याम

कुलकर्णी



अयोध्याकांड

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

-श्रीवाल्मिकी रामायण-

खंड ७- अयोध्याकांड

मूळ संस्कृत व मराठी श्लोकमय अनुवाद-श्री.श्याम कुलकर्णी

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act १९५७ provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

-श्रीवाल्मिकी रामायण – खंड ७

मराठी समश्लोकी अनुवाद : श्री. श्याम कुलकर्णी

पत्ता : द्वाराश्री. जयवंत कुलकर्णी, "गन्धार" फ़्लॅटक्र. ५/४
आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे४११०२९
संपर्क – व्हॉट्सऍपक्र. ९७६५४५६५८१
Email : sgk६६४२@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १२ ऑगस्ट २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

श्री श्याम कुलकर्णी (काव्यानुवादक)

यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E. १९७५

अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त.

लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित

प्रास्ताविक

ग्रन्थ पूर्ण होण्यापूर्वीच प्रस्तावना लिहिणे हा मर्यादातिभङ्ग आहे आणि 24,000 श्लोकांच्या "वाल्मीकीय रामायण" या ग्रन्थातील 350-400 श्लोकांचे रूपान्तरण हे तर मूळ ग्रन्थाचा साठावा भाग पूर्ण करण्यासारखे आहे. त्यामुळे हे दोन शब्द केवळ ईसाहित्य चे श्री. सुनिळ सामन्त यांचे ऋण मान्य करण्यासाठी लिहीत आहे. केवळ त्यांच्या आग्रहामुळेच मी हे मोठे काम अंगावर घेतले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

या ग्रन्थास डॉ. रविन थत्ते यांच्यासारख्या महान व्यक्तीचा आशीर्वाद लाभणे हे माझे महद्भाग्य!

हे काम माझ्या हातून पूर्ण होण्याचे भाग्य मला लाभो येवढीच ईश्वरचरणी प्रार्थना !

श्याम कुलकर्णी

Dr. Ravin Thatte

श्याम कुलकर्णी ह्यांची आणि माझी ओळख खरे तर माझ्या व्यवसायामुळे (प्लास्टिक सर्जन \ सुघटन शल्य) झाली होती ह्याची त्यांनी मला हल्लीच ह्या त्यांच्या प्रकल्पाबद्दल चर्चा करतांना करून दिली . पुढे मी ज्ञानेश्वरीवर लिहिण्यास सुरुवात केल्या नंतर देखील आमची भेट झाली होती हे मात्र आठवते. हा रामायणावरचा त्यांचा प्रयत्न \प्रकल्प बघून आणि वाचून मी थक्क झालो आहे . केवढे प्रचंड काम आहे हे! ह्या पूर्वी त्यांनी भगवत गीतेवर, रामरक्षेवर आणि मेघदूतावर अशीच समश्लोकी लिहिण्याची कामगिरी केली आहे हे कळल्यावर तर मी अवाक झालो . असला माणूस माझ्या परिचयाचा

आहे हे कळून धन्य वाटले. त्यांनी हे सगळे काम "मी स्वानंदासाठी करत आहे" असे लिहिले आहे . सगळ्या मोठ्या कृती ह्या स्वानंदातूनच निर्माण होतात हे फार जुने सत्य इथे परत उजळले आहे. ही हल्लीची समश्लोकी , रामायणाची, आताच वाचली. ती फार छान उतरली आहे आणि वाचतांना खिळवून ठेवते. प्रकल्प अजून पूर्ण व्ह्यायचा आहे तो नक्कीच पूर्ण होईल अशी खात्री आहे आणि त्यासाठी माझ्या सारख्या अनेकांच्या शुभेच्छा पोहोचवण्याचे काम मी आनंदाने करतो आहे.

Dr. रविन थत्ते

(प्लॅस्टिक सर्जन व संस्कृत पंडित. अध्यात्मावर ११ पुस्तके प्रकाशित)













श्रीवाल्मिकी रामायण-

१ ते ६ वाचण्यासाठी मुखपृष्ठांवर क्लिक करावे

- अथ श्रीवाल्मिकी रामायण- ७

अयोध्याकाण्ड सर्ग 44

विलपन्ती तथा तां तु कौसल्यां प्रमदोत्तमाम् ।
इदंधर्मे स्थिता धनं सुमित्रा वाक्यमब्रवीत् ॥1॥

स्त्रियांत ज्येष्ठ कौसल्या रुदन करिता पाहता ।
सुमित्रा धर्मपरायण वाक्य धर्मयुक्त वदे ॥1॥

तवार्ये सद्गुणैर्युक्त: स पुत्र: पुरुषोत्तम ।
किं ते विलपितेनैवं कृपणं रुदितेन वा ॥2॥

आर्ये उत्तम गुणे युक्त श्रीराम तव पुत्र जो ।
विलाप करणे योग्य नसे व्यर्थचि ते असे ॥2॥

यस्तवार्ये गत: पुत्रस्त्यक्त्वा राज्यं महाबल: ।
साधु कुर्वन् महात्मानं पितरं सत्यवादिनम् ॥3॥
शिष्टैराचरिते सम्यक्षश्वत प्रेत्य फलोदये ।
रामो धर्मे स्थित: श्रेष्ठो न स शोच्य: कदाचन ॥4॥

आर्ये पुत्र तुझा राज्य त्यजुनी जाइ महाबली ।
सत्यवादी पिता व्हावा महात्मा म्हणुनि वनी ॥3॥
पाळी सत्पुरुषधर्म फळ उत्तम ज्या मिळे ।
धर्मात्म्यास्तव कदापि शोक करणे योग्य ना ॥4॥
वर्तते चोत्तमां वृत्तिं लक्ष्मणोऽस्मिन् सदानघः।
दयावान् सर्वभूतेषु लाभस्तस्य महात्मनः ॥5॥
असे लक्ष्मण निष्पाप दयाळू श्रीरामासवे ।
सदैव उत्तम वागे लाभदायक गोष्ट ही ॥5॥

अरण्यवासे यद् दु:खं जानन्त्येव सुखोचिता ।

अनुगच्छति वैदेही धर्मात्मानं तयात्मजम् ॥6॥

सुख भोगण्या योग्य सीता जाणुनिया वनी ।

असे दु:ख तरी पुत्रा धर्मात्म्यातव अनुसरे ॥6॥

कीर्तिभूतां पताकां यो लोके भ्रमयति प्रभु:।

धर्म: सत्यव्रतपर: किं न प्राप्तस्तवात्मज:॥7॥

कीर्तीपताका आपुली जगी फडकवि जो प्रभु ।

धर्मस्वरूप श्रीरामा कोणते श्रेय़ ना मिळे?॥7॥

व्यक्तं रामस्य विज्ञाय शौर्यं माहात्म्यमुत्तमम् ।

न गात्रमंशुभि: सूर्य: संतापयितुमर्हसि ॥8॥

माहात्म्य शौर्य उत्तम श्रीरामाचे जाणुनी ।

सूर्यही गात्रा त्याच्या संतप्त न करू शके ॥8॥

शिव: सर्वेषु कालेषु काननेभ्यो विनि:सृत: ।

राघवं युक्तशीतोष्ण: सेविष्यति सुखोऽनिल: ॥9॥

सर्वदा मंगलमय वायु शीतोष्ण सुखदायक।

सेवा श्रीरघुनाथाची करील वनि सर्वदा ॥9॥

शयासमनघं रात्रौ पितेवाभिपरिष्वजन ।

धर्मघ्न: संस्पृशन शीतश्चन्द्रमा ल्हादयिष्यति ॥10॥

रात्री श्रीराम निष्पाप झोपता चंद्र शीतल ।

आल्हाद देइल स्पर्शे किरणे आलिंगुनी ॥10॥

ददौ चास्त्राणि दिव्यानि यस्मै ब्रह्मा महौजसे ।

दानवेन्द्रं हतं दृष्ट्वा तिमिजध्वजसुतं रणे ॥11॥

तिमिजध्वजसुता ठार करिता पाहुनी रणी।

प्रदान करि दिव्यास्त्रे वीरास विश्वामित्र ज्या ॥11॥

स शूर: पुरुषव्याघ्र: स्वबाहुबलमाश्रित:।

असंत्रस्तो शरण्येऽसौ वेश्मनीय निवत्स्यते ॥12॥

पुरुषसिंह तो राम आपल्या बाहुबलावरी ।

राहील निर्भय बनुनी भुवनी राहतो जणु ॥12॥

यस्येषुपथमासाद्य विनाशं यान्ति शत्रव:।

कथं न पृथिवी तस्य शासने स्थातुमर्हति ॥13॥

नष्ट होत असे ज्याच्या तीराचे लक्ष्य होत जे ।

पृथ्वीवर शासन त्याचे कसे शक्य न राहणे ? ॥13॥

या श्री: शौर्यं च रामस्य या च कल्याणसत्त्वता ।

निवृत्तारण्यवास: स्वं क्षिप्रं राज्यमवाप्स्यति ॥14॥

सौन्दर्य सत्त्व रामाचे पराक्रम कल्याणकारिता ।

त्यामुळे वाटते शीघ्र प्राप्त राज्य करील तो ॥14॥

सूर्यस्यापि भवेत् सूर्यो ह्यग्नेरग्न: प्रभो: प्रभु:।

श्रिया: श्रीश्च भवेदग्र्या कीर्त्या किर्ति: क्षमाक्षमा ॥15॥

दैवतं देवतानां च भूतानां भूतसत्तमम् ।

तस्य के ह्यगुणा देवि वने वाप्यथवा पुरे ॥16॥

सूर्याचा सूर्य अग्नीचा अग्नी प्रभूचा प्रभू ।
लक्ष्मीचा लक्ष्मी कीर्तीचा कीर्ति क्षमेचा क्षमा ॥15॥
देवांवा देव भूतांचा भूत उत्तम जो तया ।
वनी वा नगरी राहो असे निर्दोष सर्वदा ॥16॥
पृथिव्या सह वैदेह्या श्रिया च पुरुषर्षभ ।
क्षिप्रं तिसृभिरेताभि: सह रामोऽभिषेक्ष्यते ॥17॥
पुरुषसिंह श्रीराम सीता लक्ष्मी आणि धरा ।
तिन्हींसह आरूढ राज्यावरि तो होइल ॥17॥

दु:खे विसृजत्यश्रु निष्क्रामन्तमुदीक्ष्य यम् ।

अयोध्यायां जन: सर्व: शोकवेगसमाहत:॥18॥

कुशचीरधरं वीरं गच्छन्तमपराजितम् ।

सीतेवानुगता लक्ष्मीस्तस्य किं नाम दुर्लभम् ॥19॥

पाहुनी ज्यास निघताना शोकावेगे दु:खित।

अयोध्यावासी सर्व नेत्रातुनि अश्रु ढाळती ॥18॥

कुशचीरधारि जाती नित्यविजयी वीर ते ।

मागे सीता जशी लक्ष्मी तयां काय दुर्लभ ॥19॥

धनुर्ग्रहवरो यस्य बाणखड्गास्त्रभूत स्वयम ।

लक्ष्मणो व्रजति ह्यग्रे तस्य किं नाम दुर्लभम ॥20॥

धनुर्धाऱ्यांमध्ये श्रेष्ठ बाण खड्गासवे पुढे ।

लक्ष्मण स्वत: असता कोणती गोष्ट दुर्लभ ॥20॥

निवृत्तवनवासं तं द्रष्टासि पुनरागतम ।

जहि शोक च मोहं च देवि सत्यं ब्रवीमि ते ॥21॥

वदते सत्य मी देवी पाहशील त्याना पुन्हा ।

वनवासातून आलेले सोडुनी शोकमोह दे ॥21॥

शिरसा चरणावेतौ वन्दमानमनिन्दिते ।

पुनर्द्रक्ष्यसि कल्याणि पुत्रं चण्द्रमिवोदितम् ॥22॥

पायी मस्तक ठेवोनि प्रणाम करता तुला ।

नवोदित चंद्र अश्या पुत्रा कल्याणी पाहशील तू ॥22॥

पुन: प्रविष्टं दृष्ट्वा तमभिषिक्तं महाश्रियम् ।

समुत्स्रक्ष्यसि नेत्राभ्यां शीघ्रमानन्दजं जलम् ॥23॥

प्रविष्ट राजभवनी अभिषिक्त राजपदी ।

शीघ्र पाहुनि आनंदे नेत्रातुनि अश्रु येतिल ॥23॥

मा शोको देवि दु:खं वा न रामे दृष्यतेऽशिवम् ।

क्षिप्रं द्रक्ष्यसि पुत्रं त्वं ससीतं सहलक्ष्मणम् ॥24॥

नको दु:ख करू देवी चिन्ती न रामा अशुभ ।

सीता लक्ष्मणासह त्यां सुस्थित पाहशील तू॥24॥

त्वयाऽशेषो जनश्चाय समाश्वास्यो यतोऽनये ।

कमिदानींमिदं देवि करोषि हृदि विक्लवम् ॥25॥

इतरेजनांना सर्व तू धीर देण्याऐवजी ।

हृदयी येवढे दु:ख ऐसे का करतेस तू ॥25॥

नार्हा त्वं शोचितुं देवि यस्यास्ते राघवः सुतः।

नहि रामात् परो लोके विद्यते सत्पथे स्थितः॥26॥

देवी न शोभे शोक राघव पुत्र असे जिचा।

रामाइतका कोणी सन्मार्गी स्थिर ना असे ॥26॥

अभिवादयमानं तं दृष्ट्वा ससुहृदंसुतम्।

मृदाश्र मोक्ष्यसे क्षिप्रं मेघरेखेव चार्षिकी ॥27॥

सुहृदांसह तव पुत्र प्रणाम करिता तुला।

वर्षाकालिन मेघासम अश्रुवर्षा करशील तू ॥27॥

पुत्रस्ते वरद: क्षिप्रमयोध्यां पुनरागत:।

कराभ्यां मृदुपीनाभ्यां चरणौ पीडयिष्यति ॥28॥

अयोध्येत तव पुत्र येता जो वरदायक ।

दीर्घ कोमल हस्तांनी चरणा कुरवाळिल ॥28॥

अभिवाद्य नमस्यन्तं शूरं ससुहृदं सुतम् ।

मुदाश्रै: प्रोक्षसे पुत्रं मेघराजिरिवाचलम् ॥29॥

अभिवादन करणाऱ्या पुत्रा सुहृदांसह ।

अश्रूंनी भिजवी जैसी मेघमाला पर्वता ॥29॥

आश्वासयन्ती विविधैश्च वाक्यै: क्योपचारे कुशलानवद्या ।

रामस्य तां मातरमेवमुक्त्वा देवी सुमित्रा विरराम रामा ॥30॥

आश्वासना देइ अश्या प्रकारे सुमित्रा संभाषण कुशल असे जी ।

बोलून मातेस रामचंद्राचिया असे दोषरहित बोलुनि थांबली ती ॥30॥

निशम्य तल्लक्ष्मणमातृवाक्यं रामस्य मातुर्नरदेवपत्न्या:।

सद्य: शरीरे विननाश शोक: शर्द्वतो मेघ इवाल्पतोय: ॥31॥

ऐकून हे लक्ष्मण मातृ वाक्य असे होत शोक नष्ट राममातेचा ॥

जसा शरद ऋतुमधिल मेघ जलहीन निमिषात असे होत नष्ट ॥31॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे चतुश्चत्वारिंश: सर्ग: ॥44॥

अयोध्याकाण्ड सर्ग 45

अनुरक्ता महात्मानं रामं सत्यपराक्रमम् ।
अनुजग्मु: प्रयान्तं तं वनवासाय मानवा: ॥1॥

रामावरि अनुरक्त अयोध्यावासी जन ।
करण्या वनी निवास तयामागे चालती ॥1॥

निवर्तितेऽतीव बलात् सुहृद्धर्मेण राजनि ।

नैव ते संन्यवर्तन्त रामस्यानुगता रथम् ॥2॥

दशरथा जरि सक्तीने परतविले तरि अन्य जे।

रथामागे जाणारे ते मागे न फिरती जन ॥2॥

अयोध्यानिलयानां हि पुरुषाणां महायशा:।

बभूव गुणसंपन्न: पूर्णचन्द्र इव प्रिय:॥3॥

महायशस्वी श्रीराम सद्गुणी अतिप्रिय । ।

जनां अयोध्यावासी पूर्ण चन्द्रासम प्रिय ॥3॥

स याच्यमान: काकुत्स्थस्ताभि: प्रकृतिभिस्तदा ।

कुर्वाण: पितरं सत्यं वनमेवान्यपद्यत ॥4॥

प्रार्थना करि श्रीराम तरी जाती पुढे पुढे ।

पित्यास सत्य कराया पुढे जातच राहती ॥4॥

अवेक्षमाण: सस्नेहं चक्षुषा प्रपिबन्निव ।

उवाच राम: सस्नेहं ता: प्रजा इव ॥5॥

स्नेहे पाहुनिया त्यांना जणु नेत्रे पीतसे ।

संततीसम प्रिय त्यांना श्रीराम प्रेमाने वदे ॥5॥

या प्रीतिर्बहुमानश्च मय्ययोध्यानिवासिनाम् ।

मत्प्रियार्थं विशेषेण भरते सा विधीयताम् ॥6॥

अयोध्यानिवासी हो प्रीति बहुमान जो मला ।

माझ्यासाठी विशेषत्वे तोच भरतास द्या तुम्ही ॥6॥

स हि कल्याणचारित्र: कैकेय्यानन्दवर्धन:।

करिष्यति यथावद् व: प्रियाणि च हितानि च ॥7॥

तोहि उत्तम चारित्र्ये कैकेयी नन्दवर्धन।

तोहि प्रिय हितकर तुम्हा करिल निश्चित ॥7॥

ज्ञानवृद्धो वयोबालो मृदुर्वीर्यगुणान्वित:।

अनुरूप: स वो भर्ता भविष्यति भयापह:॥8॥

जरि कनिष्ठ ज्ञानवृद्ध कोमल तसा पराक्रमी ।

आपणा योग्य राजा तो करील भय निवारण ॥8॥

स हि राजगुणैर्युक्तो युवराज: समीक्षित:।

अपि चापि मया शिष्टै: कार्यं वो भर्तृशासनम् ॥9॥

तोही राजगुणे युक्त युवराज म्हणुनिया ।

तरि आता तुम्ही त्याचे आज्ञा पालन करा ॥9॥

न संतप्येद् यथा चासौ वनवासं गते मयि।

महाराजस्तथा कार्यो मम प्रियचिकीर्षया ॥10॥

मम वनि जाण्याने दशरथ महाराजांसम ।

नका संतप्त व्हा तुम्ही मम प्रिय करण्यास्तव ॥10॥

यथा यथा दाशरथिर्धर्ममेवाश्रितो भवेत ।

तथा तथा प्रकृतयो रामं पतिमकामयन ॥11॥

राम दाशरथी जैसा असे दृढ धर्मपालनी ।

तैसा प्रजाजनां स्वामी व्हावा तो इच्छा अशी ॥11॥

बाष्पेण पिहितं दीनं राम: सौमित्रिणा सह ।

चकर्षेव गुणैर्बद्धं जनं पुरनिवासिनम् ॥12॥

पुरवासी अतिदीन अश्रु ढाळित जात ते ।

जणु गुणे बांधुनि राम नेत त्यां लक्ष्मणासवे ॥12॥

ते द्विजास्त्रिविधं वृद्धा ज्ञानेन वयसौजसा ।

वय:प्रकम्पशिरसो दूरादूचुरिदं वच: ॥13॥

त्यात ब्राह्मण जे ज्ञान,अवस्था तपश्रेष्ठ ही ।

वृद्धत्वे कंपित काही दुरूनच बोलती असे ॥13॥

वहन्तो जवना रामं भोभो जात्यास्तुरंगमा:।

निवर्तध्वं न गन्तव्यं हिता भवत भर्तरि ॥14॥

वेगे घेउनी रामास वनी जाता अश्व हो ।

स्वामीस हितैषी व्हा न जा तुम्हि वनाकडे ॥14॥

कर्णवन्ति हि भूतानि विशेषेण तुरङ्गमा:।

यूयं तस्मान्निवर्तध्वं याचनां प्रतिवेदिता:॥15॥

सर्व भूतां जरी होति कर्ण तीक्ष्ण अश्वा अति।

याचना ऐकुनिया ही वळा परत घराकडे ॥15॥

धर्मत: स विशुद्धात्मा वीर: धुभदृढव्रत:।

उपवाह्यास्तु वो भर्ता नापवाह्य: पुराद् वनम् ॥16॥

श्रीराम विशुद्धात्मा,वीर धर्मे दृढव्रत ।

भर्त्या त्या न वनी नेणे नगराप्रति आणणे ॥16॥

एवमार्तप्रलापांस्तान् वृद्धान् प्रलपतो द्विजान् ।

अवेक्ष्य सहसा रामो रथादवततार ह ॥17॥

पाहुनी आर्त विलाप करिता द्विज वृद्ध ते ।

रथातुनि येती खाली श्रीरामचंद्र तेधवा ॥17॥

पद्भ्यामेव जगामाथ ससीत: सहलक्ष्मण:।

संनिकृष्टपदन्यासो रामो वनपरायण:॥18॥

लक्ष्मण सीतेसह ते पायी चालु लागले ।

वनी जाणे जरी लक्ष्य चालाया हळु लागती ॥18॥

द्विजातीन् हि पदातींस्तान् रामश्चारित्रवत्सल:।

न शशाक घृणाचक्षु: परिमोक्तुं रथेन स:॥19॥

वात्सल्य दयेने युक्त राम बैसुनिया रथी ।

द्विजां पायि येणाऱ्या मागे सोडु न इच्छिती ॥19॥

गच्छन्तमेव तं दृष्ट्वा रामं सम्भ्रान्तमानसा:।

ऊचु: परमसंतप्ता रामं वाक्यमिदं द्विज:॥20॥

वनाकडे जाता रामा पाहुनी सम्भ्रान्त द्विज ।

संतप्त होउनी त्याना वदती बोल ते असे ॥20॥

ब्राह्मण्यं कृत्स्नमेतत त्वां ब्रह्मण्यमनुगच्छति।

द्विजस्कंधाधिरूढास्त्वामग्नयोऽप्यनुयान्त्वमी ॥21॥

हितैषी द्विजांचे तुम्ही म्हणुनी सर्व ब्राह्मण ।

मागे येति तयां ज्यांना अनुसरे अग्निदेवही ॥21॥

वाजपेयसमुत्थानि च्छत्राण्येतानि पश्य न:।

पृष्ठतोऽनुप्रयातानि मेघानिव जलात्यये ॥22॥

शरदातिल शुभ्र मेघां सम श्वेत छत्रा आमुच्या।

वाजपेय यज्ञी प्राप्त पहा मागुती येत जे ॥22॥

अनवाप्तातपत्रस्य रश्मिसंतापितस्य ते ।

एभिश्छायां करिष्याम: स्वैश्छत्रैर्वाजपेयकै:॥23॥

राजश्वेतछत्र नसे त्याने रविकिरणे तप्त तू।

छाया करु तुला आम्ही वाजपेयछत्रे आमुच्या ॥23॥

या हि न: सततं बुद्धिर्वेदमन्त्रानुसारिणी।

त्वत्कृते सा कृता वत्स वनवासनुसारिणी ॥24॥

आमची बुद्धि चाले जी वेदमन्त्रानुसार ती।

तीच तुज अनुसरुनी वनवासाकडे निघे ॥24॥

हृदयेष्ववतिष्ठन्ते वेदा ये न: परं धनम।

वत्स्यन्त्यपि गृहेष्वेव दाराश्चारित्ररक्षिता:॥25॥

आमुच्या हृदयी वेद स्थित परमधन आमुचे।

राहतील स्त्रिया आमुच्या सुचरित्र सुखी गृही ॥25॥

पुनर्न निश्चय: कार्यस्त्वद्गतौ सुकृता मति:।

त्वयि धर्मव्यपेक्षे तु किं स्याद् धर्मपथे स्थितम् ॥26॥

तुझ्यासह जाण्याचा न निश्चय बदले पुन्हा ।

दुर्लक्षसि तूच ब्रह्माज्ञा कोण धर्म पाळे जगी ॥26॥

याचितो नो निवर्तस्य हंसशुक्लशिरोरुहै:।

शिरोभिर्निभृताचार महीपतनपांसुलै: ॥27॥

केस शुभ्र हंसासम वार्धक्ये आणि धूळिने ।

पाया पडून विनवीतो परतण्या तुजला गृही ॥27॥

बहूनां विवता यज्ञा द्विजानां य इहागता: ।

तेषां समाप्तिरायत्ता तव वत्स निवर्तते ॥28॥

द्विजांनी अनेक यज्ञ आरंभ केलेला असे ।

समाप्ति ज्याची अवलंबे तुझ्या परतण्यावरी ॥28॥

भक्तिमन्तीह भूतानि जङ्गमाजङ्गमानि च ।

याचमानेषु तेषु त्वं भक्तिं भक्तेषु दर्शय ॥29॥

जड चेतन जे भक्ति करती सर्व तुझ्यावरी ।

याचना त्यांचि ऐकून परतावेस तू गृही ॥29॥

अनुगन्तुमशक्तास्त्वां मूलैरुद्धतवेगिनः।

उन्नता वायुवेगेन विक्रोशन्तीव पादपाः ॥30॥

मुळे पकडिती म्हणुनी वाटती वृक्ष हे स्थिर ।

परि वाऱ्यामधुनि आक्रन्दति गमने तव ॥30॥

निश्चेष्टाहारसंचारा वृक्षकस्थाननिश्चिताः।

पक्षिणोऽपि प्रयाचन्ते सर्वभूतानुकम्पितम् ॥31॥

सर्व व्यवहार सोडून वृक्षावरि स्तब्ध बैसुनी ।

पक्षीहि प्रार्थना करती कृपाळू परतण्या तुला ॥31॥

एवं विक्रोशतां तेषां द्विजातीनां निवर्तने ।

ददृशे तमसा तत्र वारयन्तीव राघवम् ॥32॥

ब्राह्मणां याचना रामा करिती परतण्यास जे ।

तमसा दर्शने वाटे अडवण्या ही येत राघवा ॥32॥

ततः सुमन्त्रोऽपि रथाद् विमुच्य श्रान्तान् हयान् सम्परिवर्त्य शीघ्रम् ।

पीतोदकांस्तोयपरिप्लुताङ्गानचारयद् वै तमसाविदूरे ॥33॥

सुमन्त तेव्हां उतरूनि रथातुनी अश्वांस श्रान्त सोडुनि मोकळे करी ।

देऊनि जलपान धुवूनि स्वच्छ सोडी चराया तमसा तीरावरी ॥33॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे पञ्चचत्वारिंश: सर्ग: ॥45॥

अयोध्याकाण्ड सर्ग 46

ततस्तु तमसातीरं रम्यमाश्रित्य राघवः।
सीतामुद्वीक्ष्य सौमित्रीमिदं वचनमब्रवीत ॥1॥

रमणीय तमसातीरी पाहूनी सीतेकडे ।
लक्ष्मणा उद्देशून श्रीराम वदती असे ॥1॥

इयमद्य निशा पूर्वा सौमित्रे प्रहिता वनम् ।

वनवासस्य भद्रं ते चोत्कंठितुमर्हसि॥2॥

वनी जाण्या निघालो ही रात्र पहिली त्यातली ।

नगरीप्रति जाण्याची आता न उत्कंठा धरी ॥2॥

पश्य शून्यान्यरण्यानि रुदन्तीव समन्ततः।

यथानिलयमायद्भिर्निलीनानि मृगद्विजैः॥3॥

पाही शून्य वना जेथे पशु पक्षी चित्कारती ।

खिन्न रूदन जणु करती अवस्थेवरि आपुल्या ॥3॥

अद्यायोध्या तु नगरी राजधानी पितुर्मम।

सस्त्रीपुंसा गतानस्मात शोचिष्यति न संशय:॥4॥

पुरी पित्याचि अयोध्या आम्हा वनवासी जनां ।

स्मरुनी शोकमग्न नि:संशय असेल ती ॥4॥

अनुरक्ता हि मनुजा राजानं बहुभिर्गुणै:।

त्वां च मां च नरव्याघ्र शत्रुघ्नभरतौ तथा ॥5॥

भरत शत्रुघ्न महाराज तुझ्या माझ्यावरी सवे

अयोध्यावासि अनुरक्त अनेक सद्गुणांनुळे ॥5॥

पितरं चानुशोचामि मातरं च यशस्विनीम् ।

अपि नान्धौ भवेतां नौ रुदन्तौ तावभीक्ष्णश:॥6॥

पिता यशस्विनि माता यांस्तव शोकमग्न मी ।

निरन्तर रडण्याने न व्हावेत अन्ध ते ॥6॥

भरत: खलु धर्मात्मा पितरं मातरं च मे ।

धर्मार्थकामसहितैर्वाक्यैराश्वासयिष्यति ॥7॥

मातापित्यास माझ्या धर्मात्मा भरत निश्चित ।

धर्म काम अर्थपूर्ण वचने आश्वासयिल त्यां॥7॥

भरतस्यानृशंसत्वं संचिन्त्याहं पुन:पुन:।

नानुशोचामि पितरं मातरं च महाभुज ॥8॥

भरताच्या स्वभावास कोमल स्मरतो पुन्हा ।

त्यामुळे न करी चिन्ता मातापित्यांची मम ॥8॥

त्वया कार्य नरव्याघ्र मामनुव्रजता कृतम् ।

अन्वेष्टव्या हि वैदेह्या रक्षणार्थं सहायता॥9॥

महत्कार्य नरव्याघ्रा केलेस मजबरोबरी ।

सहाय्या मम येऊन रक्षणार्थ वैदेहिच्या ॥9॥

अद्धिरेव हि सौमित्रे वत्स्याम्यद्य निशामिमम् ।

एतद्धि रोचते मह्यं वन्येऽपि विविधे सति ॥10॥

उपलब्ध फल मूल इथे तरी जल पिऊनिया ।

काढावी आजची रात्र असे मी ठरविले असे ॥10॥

एवमुक्त्वा तु सौमित्रिं सुमन्त्रमपि राघव ।

अप्रमत्तस्त्वनश्वेषु भव सौम्येत्युवाच ह ॥11॥

लक्ष्मणा म्हणुनी ऐसे सुमन्त्रा राघव म्हणे ।

अश्वरक्षणि हो दक्ष बेसावध न राहणे ॥11॥

सोऽश्वान् सुमन्तः संयम्य सूर्येऽस्तं समुपागते।

प्रभूतयवसाम् कृत्वा बभूव प्रत्यनन्तरः॥12॥

होता सूर्यास्त आणूनी अश्वां बान्धे सुमन्त्र तो।

चारा देउनिया त्यांना श्रीरामापाशि येतसे ॥12॥

उपास्य तु शिवां संध्यां दृष्ट्वा रात्रिमुपागताम् ।

रामस्य शयनं चक्रे सूतः सौमित्रिणा सह ॥13॥

संध्या कल्याणमयी करुनी रात्र येता सलक्ष्मण ।

श्रीरामशयना योग्य स्थान शय्या करी सुत ॥13॥

तां शय्यां तमसातीरे वीक्ष्य वृक्षदलैर्वृताम् ।

रामः सौमित्रिणा सार्धं सभार्यः संविवेश ह ॥14॥

वृक्षाच्छादित ती शय्या पाहुनी तमसातिरी ।

श्रीराम लक्ष्मण सीता यांसवे बसे तीवरी ॥14॥

सभार्यं सम्प्रसुप्तं तु श्रान्तं सम्प्रेक्ष्य लक्ष्मणः।

कथयामास सूताय रामस्य विविधान् गुणान् ॥15॥

सीतेसह पाहुनी रामा श्रान्त निद्रा करीति जे ।

लक्ष्मण सुमन्त्रा करी रामाचे गुणवर्णन ॥15॥

जाग्रतोरेव तां रात्रिं सौमित्रेरुदितो रवि:।

सूतस्य तमसातीरे रामस्य ब्रुवतो गुणान ॥16॥

चर्चा गुणांचि रामाच्या करिता उभयता अशी ।

जागृत तमसातीरी रात्री तो उगवे रवि ॥16॥

गोकुलाकुलतीरायास्तमसाया विदूरत:।

अवसत तत्र रात्रिं राम: प्रकृतिभि: सह ॥17॥

तमसातीरी श्रीराम गाईंचा कळप जिथे ।

प्रजाजनांपासून दूर निद्रिस्त होति ते ॥17॥

उत्थाय च महातेजा: प्रकृतीस्ता निशाम्य च ।

अब्रवीद् भ्रातरं रामो लक्ष्मणं पुण्यलक्षणम् ॥18॥

उठुनि महातेजस्वी पहाटे जागृत होउनी।

बन्धु लक्ष्मणास श्रीराम बोले पुण्यवान ॥18॥

अस्मद्व्यपेक्षान् सौमित्रे निरपेक्षान् गृहेष्वपि ।

वृक्षमूलेषु संसक्तान् पश्य लक्ष्मण सांप्रत ॥19॥

पहा या पुरवासींना निद्रित वृक्षाखालती ।

भक्तिने आमुच्या होती निरपेक्ष गृहांप्रति ॥19॥

यथैते नियमं पौरा: कुर्वन्त्यास्मन्निवर्तने ।

अपि प्राणान् न्यसिष्यन्ति न तु त्यक्ष्यन्ति निश्चयम् ॥20॥

परतविण्या आम्हास करती वर्तन पाहुनी ।

वाटे सोडतिल प्राण परि अविचल निश्चय ॥20॥

यावदेव तु संसुप्तास्तावदेव वयं लघु ।

रथमारुह्य गच्छाम: पन्थानमकुतोभयम् ॥21॥

यास्तव निद्रित असता रथातून शीघ्र निघू ।

मग मार्गावर कोणी येईल हे भय नसे ॥21॥

अतो भूयोऽपि नेदानीमिक्ष्वाकुपुरवासिनः।

स्वपेयुरनुरक्ता मा वृक्षमूलेषु संश्रिताः॥22॥

आपण निघुनी जाता अयोध्याजनां आमुच्या ।

प्रेमे वृक्षतळी निद्रा ऐसी न करणे पडे ॥22॥

पौरा ह्यात्मकृताद् दुःखाद् विप्रमोच्या नृपात्मजैः।

न तु खल्वात्मना योज्या दुःखेन पुरवासिनः॥23॥

कर्तव्य राजपुत्रांचे दुःखमुक्त पौरजनां ।

करणे न आपुले दुःख भोगण्या लावणे तयां॥23॥

अब्रवील्लक्ष्मणो रामं साक्षाद् धर्ममिवं स्थितम् ।

रोचते मे तथा प्राज्ञ क्षिप्रमारुह्यतामिति ॥24॥

साक्षात धर्मावतार बोले रामास लक्ष्मण ।

योग्य हे मजला वाटे चला शीघ्र रथावरी ॥24॥

अथ रामोऽब्रवीत् सूतं शीघ्रं संयुज्यतां रथ:।

गमिष्यामि ततोऽरण्यं गच्छ शीघ्रमित: प्रभो॥25॥

राम सांगतसे सूता शीघ्र सज्ज करी रथ ।

त्वरित त्यामुळे आम्हा जाणे शक्य वनाप्रती ॥25॥

सूतस्तत: संत्वरित: स्यंदनं तैर्हयोत्तमै:।

योजयित्वा तु रामस्य प्राञ्जलि: प्रत्यवेदयत ॥26॥

अश्वा उत्तम जोडूनी सुमन्त रथास तदा ।

जाउनि सांगे श्रीरामा हात जोडुनिया तसे ॥26॥

अयं युक्तो महाबाहो रथस्ते रथिनां वर।

त्वरयाऽऽरोह भद्रं ते ससीत: सहलक्ष्मण:॥27॥

रथिश्रेष्ठ महाबाहो केला रथ सज्ज आपुला ।

सीता लक्ष्मणासहित शीघ्र त्यात बसून जा ॥27॥

तं स्यन्दनमधिष्ठाय राघवः सपरिच्छदः।

शीघ्रमाकुलावर्तां तमसामतरन्नदीम् ॥28॥

रामचंद्र सर्वांसह रथी आरूढ होउनी ।

करी तमसा पार वाहे जी चक्रांसवे ॥28॥

स संतीर्य महाबाहुः श्रीमान् शिवमकंटकम् ।

प्रापद्यत महामार्गमभयं भयदर्शिनाम् ॥29॥

पोचती करुनी पार महामार्गी निष्कंटक ।

भय वाटे अशांनाही कल्याणप्रद निर्भय ॥29॥

मोहनार्थं तु पौराणां सूतं रामोऽब्रवीद् वच:।

उदमख: प्रयाहि त्वं रथमारुह्य सारथे ॥30॥

मुहूर्तं त्वरितं गत्वा निवर्तय रथं पुन:।

यथा न विद्यु: पौरा मां तथा कुतु समाहित:॥31॥

चकविण्या पौरजनां आज्ञापिती सुता राम ।

आम्ही उतरता जावे रथारूढ उत्तरेकडे ॥30॥

शीघ्र गति पुढे जात रथ आण पुन्हा इथे।

ज्यामुळे पौरजनांना कळे न स्थान आमुचे ॥31॥

रामस्य तु वचः श्रुत्वा तथा चक्रे च सारथिः।

प्रत्यागम्य च रामस्य स्यंदनं प्रत्यवेदयत ॥32॥

ऐकुनी वचना त्यांच्या सारथी करुनी तसे ।

येतसे फिरुनी तेथे रामास्तव घेउनी रथ ॥32॥

तौ सम्प्रयुक्तं तु रथं समास्थितौ तदा ससीतौ रघुवंशवर्धनौ ।

प्रचोदयामास ततस्तुरंगमान् स सारथिर्येन पथा तपोवनम् ॥33॥

त्या परत आलेल्या रथी श्रीराम लक्ष्मण सीता यांसवे ।

बसता सारथि अश्वां हाकुनी नेत मार्गी जाण्या वनी ॥33॥

ततः समास्थाय रथं महारथः ससार्थिर्दाशरथिर्वनं ययौ ।

उदमखं तं तु रथं चकार प्रयाणमाङ्गल्यनिमित्तदर्शनात ॥34॥

शुभशकुन नन्तर पाहुनी करुनी उत्तराभिमुख रथ उभा ।

सारथ्यासह नन्तर होत आरूढ वनाप्रति जाउ लागले ॥34॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोद्धाकाण्डे षट्चत्वारिंशः सर्गः ॥46॥

अयोध्याकाण्ड सर्ग 47

प्रभातायां तु शर्वर्यां पौरास्ते राघवं विना ।
शोकोपहतनिश्चेष्टा बभूवर्हतचेतस:॥1॥

प्रभाती पाहता राम नसे तेथे पाहुनी ।
पौरवासी शोकग्रस्त हतबुद्ध होति ते ॥1॥

शोकजाश्रुपरिघुना वीक्षमाणास्ततस्तत:।

आलोकमपि रामस्य न पश्यन्ति स्म दु:खिता:॥2॥

शोकाने अश्रु ढाळूनी खिन्न सर्वत्र शोधति।

परि दिसे न श्रीराम तदा दु:खित होति ते ॥2॥

ते विषादातवदना रहितास्तेन धीमता।

कृपणा: करुणा वाचो वदन्ति स्म मनीषिण:॥3॥

विरहाने श्रीरामाच्या मुखावर दीन वेदना ।

करुणायुक्त वचने ते विलाप करु लागती ॥3॥

धिगस्तु खलु निद्रां तां ययापहतचेतस:।

नाद्य पश्यामहे रामं पृथूरस्कं महाभुजम् ॥4॥

धि:क्कार तव निद्रे गे बेसावध तुझ्यामुळे।

दर्शना वंचित आम्ही श्रीरामाच्या महाभुज ॥4॥

कथं रामो महाबाहु: स तथावितथक्रिय:।

भक्तं जनमभित्यज्य प्रवासं तापसो गत:॥5॥

न निष्फल क्रिया ज्याची कधी श्रीराम तापस ।

वेषधारी महाबाहू कैसे भक्तां त्यागती ॥5॥

यो न: सदा पालयति पिता पुत्रानिवौरसान।

कथं रघूणां स श्रेष्ठस्त्यक्त्वा नो विपिनं गत:॥6॥

करी पालन आमुचे जो औरस पुत्रांपरी ।

सोडून रघुकुलश्रेष्ठ आम्हा जाइ वनी कसा ॥6॥

इहैव निधनं याम महाप्रस्थानमेव वा ।

रामेण रहितानां नो किमर्थं जीवितं हितम् ॥7॥

येथेच मरू आम्ही वा उत्तरे निश्चये तश्या ।

रामाविण निरर्थक वाटे जीवन हे आम्हा ॥7॥

सन्ति शुष्काणि काष्ठानि प्रभूतानि महान्ति च ।

तै: प्रज्वाल्य चितां सर्वे प्रविशामोऽथवा वयम् ॥8॥

पुष्कळ काष्ठे शुष्क असती पेटवूनि त्यां ।

चितेत त्या प्रवेशावे लोकांनी सर्व आपण ॥8॥

किं वक्ष्यामि महाबाहुरनसूय: प्रियंवद:।

नीत: स राघवोऽस्माभिरिति वक्तुं कथं क्षमम् ॥9॥

सांगावे आपण काय की प्रियभाषी अनागस ।

रामचंद्रा महाबाहू वनी सोडियले आम्ही ॥9॥

सा नूनं नगरी दीना दृष्ट्वास्मान् राघवं विना ।

भविष्यति निरानन्दा सस्त्रीबालवयोऽधिका ॥10॥

श्रीरामाविण पाहून नगरी बालक स्त्रियांसह ।

निश्चित आनन्दहीन दीन होउनि जाइल ॥10॥

निर्यातास्तेन वीरेण सह नित्यं महात्मना।

विहीनास्तेन च पुनः कथं द्रक्ष्याम तां पुरीम् ॥11॥

श्रीरामासह करण्या सर्वदा निवास वनी ।

निघालो असता कैसे अयोध्येस पाहू शकू ॥11॥

इतीव बहुधा वाचो बाहुमुद्यम्य ते जना:।

विलपन्ति स्म दु:खार्ता हृतवत्सा इवाग्रयगा:॥12॥

ऐसे बोलुनिया हस्त उंचावुनी विलपती ।

वासरांपासुनि दूर गायी हंबरती जणु ॥12॥

ततो मार्गानुसारेण गत्वा किंचित ततः क्षणम।

मार्गनाशाद् विषादेन महता समभिप्लुता:॥13॥

रथमार्ग चिन्हावरुनि जाता काही क्षणास्तव ।

जाति बुडुनि शोकात अस्पष्ट होताच ती ॥13॥

रथमार्गानुसारेण न्यवर्तन्त मनस्विन:।

किमिदं किं करिष्यामो दैवेनोपहता इति ॥14॥

"झाले काय कसे ऐसे" म्हणुनी रथमार्गावरी।

मनस्वी परतती तैसे अयोध्यानगरीप्रति ॥14॥

तदा यथागतेनैव मार्गेण क्लान्तचेतस:।

अयोध्यामगमन् सर्वे पुरीं व्यथितसज्जनाम् ॥15॥

गेले ज्या मार्गाने परतती त्यावरुनी पुन्हा।

अयोध्यापुरिला येती सर्व व्यथित सज्जन ॥15॥

आलोक्य नगरीं तां च क्षयव्याकुलमानसा:।

आवर्तयन्त तेऽपि नयनै: शोकपीडितै:॥16॥

हृदय व्याकुल हो त्यांचे पाहुनी नगरी तदा ।

शोकाने नेत्रातुनि अश्रुवर्षाव करति ते ॥16॥

एषा रामेण नगरी रहिता नातिशोभते।

आपगा गरुडेनैव हफ़ादुद्धृतपन्नगा॥17॥

नगरी रामावाचुनि नसे शोभत जशी नदी।

गरुडाने नाग उचलता शोभाहीन होतसे ॥17॥

चंद्रहीनमिवाकाशं तोयहीनमिवार्णवम् ।

अपश्यन् निहतानन्दं नगरं विचेतस:॥18॥

जसे चंद्राविण आकाश जसा सागर जलाविण ।

आनन्दशून्य नगर तैसे पाहता ते अचेतन ॥18॥

ते तानि वेश्मानि महाधनानि दु:खेन दु:खोपहता विशन्त:।

नैव प्रजग्मु: स्वजनं परं वा निरीक्ष्यमाणा: प्रविनष्टहर्षा:॥19॥

उल्हास ज्यांचा असे जाहला नष्ट वैभवशाली गृही प्रवेशती ते ।

न ओळखीति स्वकीय परके पाहूनही हर्ष नष्ट झाल्यामुळे ॥19॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे सप्तचत्वारिश:सर्ग:॥47॥

अयोध्याकाण्ड सर्ग 48

तेषामेवं विषण्णानां पीडितानामतीव च ।
बाष्पविप्लुत नेत्रानां सशोकानां मुमूर्षया ॥1॥
अभिगम्य निवृत्तानांरामं नगरवासिनाम।
उद्गतानीव सत्त्वानि बभूवुरमनस्विनाम।।2॥

ऐश्या विषण्ण शोके पीडित प्राणत्यागही ।
करण्या असती सज्ज नेत्रातुनि अश्रु वाहत ॥1॥
रामासह जाउनिया त्याच्याविण परतता ।
स्थिती नगरवासींची प्राणहीनच ते जणु ॥2॥
स्वं स्वं निलयमागम्य पुत्रदारै: समावृता:।
अश्रूणि मुमुचु: सर्वे बाष्पेण पिहिताननाः ॥3॥
सर्व ते स्वगृही जाती स्वस्त्रीपुत्रांच्यासवे।
नेत्रातुनि अश्रू गळती मुख आच्छादित त्यामुळे ॥3॥

न चाहृषन् न चामोदन् वणिजो न प्रसारयन् ।

न चाशोभन्त पण्यानि नापचन् गृहमेधिन:॥4॥

मनी नसे आनन्द वैश्य व्यापार सोडुनी ।

विपणे बन्द राहूनी अन्न ना शिजे घरी ॥4॥

नष्टं दृष्ट्वा नाभ्यनन्दन् विपुलं वा धनागमम् ।

पुत्रं प्रथमजं लब्ध्वा जननी नाप्यनन्दत॥5॥

सापडता हरविली वस्तु वा धनलाभे पुष्कळ।

प्रथम पुत्रलाभेही आनन्दी जननी नसे ॥5॥

गृहे गृहे रुदतस्य भर्तारं गृहमागतम् ।

व्यगर्हयन्त दु:खार्ता वाग्भिस्तौलैरिव द्विपान॥6॥

सर्व गृही भर्ते येता दु:खित होउनी स्त्रिया ।

टोचती बोलुनी जैसा माहुत अंकुशे गजा ॥6॥

किं नु तेषां गृहै: कार्यं किं दारै: किं धनेन वा ।

पुत्रैर्वापि सुखैर्वापि ये न पश्यन्ति राघवम् ॥7॥

बोलती श्रीरामाविण कशास धन दौलत ।

घरदार पुत्रपत्नी तसेच सुखभोगही ॥7॥

एक: सत्पुरुष: लोके लक्ष्मण: सह सीतया।

योऽनुगच्छति काकुत्स्थं रामं परिचरन् वने ॥8॥

जगी सत्पुरुष एक लक्ष्मण जातसे वनी ।

सीतेसह अनुसरे रामसेवा करण्यास्तव ॥8॥

आपगा: कृतपुण्यास्ता: पद्मिन्यश्च सरांसि च ।

येषु यास्यति काकुत्स्थो विगाह्य सलिलं शुचि॥9॥

कमलयुक्त तलाव नद्याही पुण्यवान् त्या ।

जलाने जेथिल स्नान पवित्र राम करीतसे ॥9॥

शोभयिष्यन्ति काकुत्स्थमटव्यो रम्यकानना:।

आपगाश्च महानूपा: सानुमन्तश्च पर्वता:॥10॥

रमणीय वृक्षवल्ली वनश्रेणी मनोहर ।

गिरी शिखरांची शोभा वाढवीत वाहती नद्या ॥10॥

काननं वापि शैलं वा यंरामोऽनुगमिष्यति।

प्रियातिथिमिव प्राप्तं नैनं शक्ष्यन्त्यनर्चितुम् ॥11॥

वनी पर्वतावरि ज्या अतिथी राम जाइल ।

केल्याविण पूजा त्याची सोडतील न ते तया ॥11॥

विचित्रकुसुमापीडा बहुमञ्जरिधारिण:।

राघवं दर्शयिष्यन्ति नगा भ्रमरशालिन:॥12॥

विचित्र पुष्पमुकुट भृंग मंजिरीसवे ।

सुशोभित वृक्ष शोभा पर्वत रामा दाविती ॥12॥

अकाले चापि मुख्यानि पुष्पाणि च फलानि च।

दर्शयिष्यन्त्यनुक्रोशाद् गिरयो राममागतम् ॥13॥

अयोग्य समयी सुद्धा फळे फुले अतिउत्तम।

देतील आदरे रामा येथवरी जो येतसे ॥13॥

प्रस्रविष्यन्ति तोयानि विमलानि महीधरा:।

विदर्शयन्तो विविधान् भूयचित्रांश्च निर्झरान॥14॥

झरे नाना प्रकाराचे श्रीरामास दाखवुनी ।

निर्मल पाण्याचे स्रोत निर्मितिल त्याच्यास्तव ॥14॥

पादपा: पर्वताग्रेषु रमयिष्यन्ति राघवम् ।

यत्र रामो भयं नात्र नास्ति तत्र पराभव:॥15॥

स हि शूरो महाबाहु: पुत्रो दशरथस्य च।

पुरा भवति नोऽदूरादनुगच्छाम राघवम् ॥16॥

रमवतील श्रीरामा गिरिशिखरी वृक्ष जे ।
भय नाही जिथे राम पराभवहि ना असे ॥15॥
तो शूर महाबाहू असे दशरथपुत्र जो ।
जाईल न दूर तोवरी पोचावे त्याप्रति ॥16॥

पादच्छाया सुखं भर्तुस्तादृशस्य महात्मन:।
स हि नाथो जनस्यास्य स गति: स परायणम् ॥17॥

स्वामीची चरणछाया अतिसुखद आपणा।
तेच रक्षक ते स्वामी परमाश्रय ते आम्हा ॥17॥

वयं परिचरिष्यामि सीतां यूयंच राघवम् ।

इति पौरस्त्रियोभर्तॄन् दु:खार्तास्ततदब्रुवन् ॥18॥

आम्ही सीतेची सेवा राघवाची तुम्ही करा ।

दु:खे आतुर पुरवासी स्त्रिया भर्त्यां बोलती ॥18॥

युष्माकं राघवोऽरण्ये योगक्षेमं विधास्यति।

सीता नारीजनस्यास्य योगक्षेमं करिष्यति ॥19॥

श्रीराम चालवतील योगक्षेम वनि आपला ।

सीतामाई चालवतील नारीजनांचा आम्हा॥19॥

को न्वनेनाप्रतीतेन सोत्कंठित्जनेन च।

सम्प्रीयतामनोज्ञेन वासेन हृतचेतसा ॥20॥

उत्कंठित श्रीरामास्तव वास येथिल निर्मम ।

राहणे मन मारून त्यात आनन्द कोणता ॥20॥

कैकेय्या यदि चेद् राज्यं स्यदधर्म्यमनायवत।

न हि नो जीवितनार्थ: कुत: पुत्रै: कुतो धनै:॥21॥

अधिकारे कैकेयीच्या अनाथ राज्य हो जणु ।

जगणे नसता आम्हा धन पुत्र कशास्तव ॥21॥

यया पुत्रश्च भर्ता च त्यक्त्वावैश्वर्यकारणात ।

कं सा परिहरेदन्यं कैकेयी कलपांसनी ॥22॥

त्यागिले पुत्रभर्त्यास राज्यवैभवास्तव जिने ।

कलंकिनि कैकेयी कोणासहि त्यागू शके ॥22॥

कैकेय्या न वयं राज्ये भृतका हि वसेमहि।

जीवन्त्या जातु जीवन्त्य: पुत्रैरपि शपामहे ॥23॥

कैकेयीच्या राज्यात न शकू राहण्या आम्ही ।

पुत्रांची शपथ घेऊन सांगतो आम्ही असे ॥23॥

या पुत्रं पर्थिवेन्द्रस्य प्रवासयति निघृणा।

कस्तां प्राप्य सुखं जीवेदधर्म्या दुष्टचारिणीम् ॥24॥

महाराज पुत्रा राज्य सोडाया लावले जिने ।

निर्दयी कैकेयीच्या त्या राज्यात कुणा सुख ?॥24॥

उपद्रुतमिदं सर्वमनालम्भनायकम् ।

कैकेय्यास्तु कृते सर्वं विनाशमुपयास्यति॥25॥

उपद्रवकेन्द्र राज्य अनाथ कैकेयीमुळे।

यज्ञरहित होईल विनाश सर्वांचा इथे ॥25॥

नहि प्रव्रजिते रामे जीविष्यति महीपति ।

मृते दशरथे व्यक्तं विलोपस्यदनन्तरम् ॥26॥

राहतील न जीवित जाता राम वनी नृप ।

दशरथ मृत होता राज्याचा लोप होइल ॥26॥

ते विषं पिबतालोड्य क्षीणपुण्या: सुदु:खिता:।

राघवं वानुगच्छध्वमश्रुतिं वापि गच्छत ॥27॥

संपले आपले पुण्य अनुसरावे रामास वा ।

विष प्यावे वा जावे जेथ कैकेयी नसे ॥27॥

मिथ्याप्रव्राजितो राम: सभार्य: सहलक्ष्मण:।

भरते संनिबद्धा: स्म सौनिके पशवे यथा ॥28॥

रामा व्यर्थ वनी धाडी भार्या लक्ष्मणासह ।

भरताशी आम्हि बद्ध कसायाशी जसे पशु ॥28॥

पूर्णचंद्रानन: श्यामो गूढजत्रुररिंदम:।

आजानुबाहु: पद्माक्षो रामो लक्ष्मणपूर्वज:॥29॥

पूर्वाभिभाषी मधुर: सत्यवादी महाबल:।

सौम्यश्च सर्वलोकस्य चन्द्रवत प्रियदर्शन:॥30॥

ज्येष्ठ बन्धु लक्ष्मणाचा आजानुबाहु राम तो ।
पूर्णचंद्रापरी शोभे कमलनेत्र मनोहर ॥29॥
येता समोर भाषण करी मधुर सत्य जे।
बलवान दमन शत्रूंचे करी स्वभावे कोमल ॥30॥
नूनं पुरुषशार्दूलो मत्तमातङ्गविक्रमः।
शोभयिष्यत्यरण्यानि विचरन स महारथः॥31॥
पराक्रमी गजासम मत्त श्रीराम महारथी ।
फिरता भूतली शोभा वाढेल वनसृष्टिची ॥31॥

तास्तथा विलपन्त्यस्तु नगरे नगरस्त्रियः।

चुक्रुशुर्दुःखसंतप्ता मृत्योरिव भयागमे ॥32॥

स्त्रिया नगरवासी त्या दुःखसंतप्त क्रंदती ।

जणु त्यांवरि मृत्यूचे भय दाटुनि येतसे ॥32॥

इत्येव विलपन्तीनां स्त्रीणां वेश्मसु राघवम् ।

जगामास्तं दिनकरो रहनीं चाभ्यवर्तते ॥33॥

विलाप स्त्रिया करती ऐसा श्रीरामास्तव ।

जाइ अस्ताचली सूर्य रात्र भूवरी येतसे ॥33॥

नष्टज्वलनसंतापा प्रशान्ताध्यायसत्कथा ।

तिमिरेणानुलिप्तेव तदा सा नगरी बभौ ॥34॥

अग्निहोत्र नसे होत स्वाध्याय वार्ता कथा ।

अयोध्यानगरी सारी अन्ध:कारे माखली ॥34॥

उपशान्तवणिक्पण्या नष्टहर्षा निराश्रया।

अयोध्या नगरी चासीन्नष्टतारमिवाम्बरम् ॥35॥

दुकाने बंद नसे गर्दी नष्ट हास्य पुरीतले।

नभासम दिसे निष्प्रभ तारे नसति ज्यामध्ये ॥35॥

तदा स्त्रियौ रामनिमित्तमातुरा यथा सुते भ्रातरि वा विवासिते।
विलप्य दीना रुरुदुर्विचेतस: सुतैर्हि तासामधिकोऽपि सोऽभवत ॥36॥

स्त्रिया पुरीतिल दु:खित श्रीरामास्तव जसे बन्धु पुत्र जाति वनी ।
विलाप करती अतिदीन होउनी पुत्राहुनी राम असे जयां प्रिय ॥36॥

प्रशान्तगीतोत्सवनृत्यवादना विभ्रष्टहर्षा पिहितापणोदया:।
तदा ह्ययोध्या नगरी बभूव सा महार्णव: संक्षपितोदको यथा ॥37॥

कुठेहि नसे नृत्य वादन न उत्सव उत्साह नष्ट व्यापार बंद ।
तदा दिसे अयोध्यानगरी महासागरासम जल ज्यातिल आटलेले ॥37॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डेऽष्टचत्वारिंश:सर्ग:॥48॥

अयोध्याकाण्ड सर्ग 49

रामोऽपि रात्रिशेषेण तेनैव महदन्तरम् ।
जगाम पुरुषव्याघ्रः पितुराज्ञामनुस्मरन् ॥1॥

पित्राज्ञा स्मरता रात्री श्रीराम पुरुषोत्तम ।
शेष रात्रीमध्ये जाती बरेच अंतर तोडुनी ॥1॥

तथैव गच्छतस्तस्य व्यपायाद रजनी शिवा।

उपास्य तु शिवां संध्यां विषयानत्यगाहत॥2॥

सरली रात्र जाण्यात त्यांच्या होत प्रभातही।

संध्या करुनी निघुनी जनपदे ओलांडती ॥2॥

ग्रामान् विकृष्टसीमान्तान् पुष्पितानि वनानि च ।

पश्यन्नतिययौ शीघ्रं शनैरिव हयोत्तमै:॥3॥

सीमेवरी नांगरलेली भूमी ज्यांची ग्रामे तशी ।

वनेही दिसती ऐसी पुष्पांनी जी बहरली ।

हे सर्व पाहत जाता अश्व उत्तम ओढती ।

शीघ्र वेगे जाता परि वाटे हळु चालती ॥3॥

श्रुण्वन् वाचो मनुष्याणां ग्रामसंवासवासिनाम् ।

राजानं धिग् दशरथं कामस्य वशमास्थितम् ॥4॥

मार्गातिल गावी ऐके ग्रामस्थ बोलती वच ।

धिक्कार दशरथाचा त्या कामाग्नि वश होतसे ॥4॥

हा नृशंसाय कैकेयीपापा पापानुबन्धिनी।

तीक्ष्णा सम्भिन्नमर्यादा तीक्ष्णकर्मणि वर्तते ॥5॥

पापासक्त पापशील कैकेयीस दया नसे ।
त्यागुनी धर्ममर्यादा क्रूर निष्ठुर वागते ॥5॥

या पुत्रमीदृशं राज्ञः प्रवासयति धार्मिकम् ।
वनवासे महाप्राज्ञं सानुक्रोशं जितेन्द्रियम् ॥6॥

पुत्रास महाराजांच्या जितेन्द्रिय दयाळु जो ।
धर्मात्मा महाज्ञानी वनवासात पाठवी ॥6॥

कथं नाम महाभागा सीता जनकनन्दिनी ।
सदा सुखेष्वभिरता दुःखान्यनुभविष्यति ॥7॥

जनकनन्दिनी सीता वाढलेली सदा सुखी ।
वनवासातील दु:खा कशी भोगू शकेल ती ॥7॥

अहो दशरथो राजा नि:स्नेह: स्वसुतं प्रति।
प्रजानामघं रामं पर्यक्तुमिहेच्छति॥8॥

काय दशरथ राजा पुत्राप्रति स्नेहहीन हो ।
परित्यजति त्या रामा प्रजापराध जो न करी ॥8॥

एता वाचो मनुष्याणां ग्रामसंवासवासिनाम्।
श्रुण्वन्नतिययौ वीर: कोसलान् कोसलेश्वर:॥9॥

ग्रामवासी बोलताना असे श्रीराम ऐकत ।

सीमा ओलांडि श्रीराम कोसलापति कोसल ॥9॥

ततो वेदश्रुति नाम शिववारिवहां नदीम् ।

उत्तीर्याभिमुख: प्रायादगस्त्याध्युषितां दिशम् ॥10॥

सुखद शीतल जलयुक्त वेदश्रुति नदि नंतर ।

श्रीराम करुनी पार जाताती दक्षिणेकडे ॥10॥

गत्वा तु सुचिरं कालं तत: शीतवहां नदीम् ।

गोमतीं गोयुतानूपामतरम् सागरङ्गमाम् ॥11॥

दीर्घ काल जाऊनी समुद्रगामिनि गोमती ।
शीतजलस्रोती जिच्या तीरी गायी चरति बहु ॥11॥

गोमतीं चाप्यतिक्रम्य राघव: शीघ्रगैर्हयै:।
मयूरहंसाभिरुतां ततार स्यन्दिकां नदीम् ॥12॥

गोमती ओलांडुनी व्याप्त हंसमोरांच्या रवे ।
स्यंदि नाम नदी तीही करती पार राघव ॥12॥

स महीं मनुना राज्ञा दत्तामिक्ष्वाकवे पुरा।
स्फीतां राष्ट्रवृत्तां रामो वैदेहीमन्वदर्शयत ॥13॥

धनधान्यसंपन्न भूमि सीतेस दाविती ।
जनपदे युक्त असे मनुने इक्ष्वाकूंस दिली ॥13॥

सूत इत्येव चाभाष्य सारथिं तमभीक्ष्णश:।
हंसमत्तस्वर: श्रीमानुवाच पुरुषोत्तम:॥14॥

पुरुषोत्तम श्रीराम सारथ्या "सूता" असे ।
हंसासम स्वरे मधुर आवाहुनि त्यास बोलती ॥14॥

कदाहं पुनरागम्य सरय्या पुष्पिते वने ।
मृगतां पर्यटिष्यामि मात्रा पित्रा च संगत:॥15॥

वनातुन येता परत शरयूच्या या पुष्पित ।
मृगयेस्तव पिता माता यांना घेउन येइन ॥15॥

नात्यर्थमभिकांक्षाणि मृगयां सरयूवने ।
रतिद्वेषातुला लोके राजर्षिगणसम्मता ॥16॥

इच्छा शिकारीची मज अधिक नसली तरी।
असे अनुपम क्रीडा जी राजर्षिगणसम्मत ॥16॥

राजर्षीणां हि लोकेऽस्मिन् रत्यर्थं मृगया वने ।
काले कृतां तां मनुजैर्धन्विनामभिकांक्षिताम् ॥17॥

असे प्रचलित क्रीडा मृगया राजर्षि जनी ।
त्याकाळची अनुसरती मानवही धनुर्धर ॥17॥

स तमध्वानमैक्ष्वाक: सूतं मधुरया गिरा ।
तं तमर्थभिप्रेत्य ययौ वाक्यमुदीरयन् ॥18॥

अनेक उपयुक्त गोष्टी सूता श्रीराम सांगती ।
आपल्या मधुर वाणीने मार्ग आक्रमिता पुढे ॥18॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डेएकोनपञ्चाश: सर्ग:॥49॥

अयोध्याकाण्ड सर्ग 50

विशालान् कोसलान् रम्यान् यात्वा लक्ष्मणपूर्वज ।
अयोध्यामुन्मुखी धीमान् प्राञ्जलिर्वाक्यमब्रवीत ॥1॥

कोसल रम्य विशाल पार करुनिया श्रीराम ।
अयोध्येप्रति वळुनी म्हणती हात जोडुनी ॥1॥

आपृच्छे त्वां पुरिश्रेष्ठे काकुत्स्थपरिपालिते ।

दैवतानि च यानि त्वां पालयन्त्यावसन्ति च ॥2॥

पुरिश्रेष्ठे पाळणाऱ्या काकुत्स्थां तव रक्षकां ।

दैवतांहि तशी आज्ञा वनि जाण्याची मागत ॥2॥

निवृत्तवनवासत्वामनृणो जगतीपते:।

पुनर्द्रक्ष्यामि मात्रा च पित्रा च सह संगत:॥3॥

करुनी पूर्ण वनवास ऋणमुक्त महाराजा कृत ।

येउनी पाहीन तुम्हा मातापितरां भेटेन मी ॥3॥

ततो रुचिरताम्राक्षो भुजमुद्यम्य दक्षिणम् ।

अश्रूपूर्णमुखो दीनोऽब्रवीज्जानपदं जनम् ॥4॥

नंतर श्रीराम अश्रूपूर्ण नेत्रे अरुण सुंदर ।

उंचावुनि दक्षिण हात जनपद लोकां म्हणे ॥4॥

अनुक्रोशो दया चैव यथार्ह मयि वः कृतः।

चिरं दुःखस्य पापीयो गम्यतामर्थसिद्धये ॥5॥

कृपा मजवरि तैसी दया यथार्थ तुम्ही ।

कष्टही सहन केले असे दुःखात राहणे ।

नसे योग्य तरी तुम्ही स्वकार्यास लागणे ॥5॥

तेऽभिवाद्य महात्मानं कृत्वा चापि प्रदक्षिणम् ।

विलपन्तो नरा घोरं व्यतिष्ठंश्च क्वचित् क्वचित् ॥6॥

ऐकुनी जन श्रीरामा घालुनीया प्रदक्षिणा ।

विलाप करीत घोर उभे तेथेच राहती ॥6॥

तथा विलपतां तेषामतृप्तानां च राघवः।

अचक्षुर्विषयं प्रायाद् यथार्कः क्षणदामुखे ॥7॥

जन दर्शने अतृप्त रामाच्या रडती पूर्ववत ।

श्रीराम होत अदृष्य सूर्य प्रदोषी जसा ॥7॥

धान्यधनोपेतान् दानशीलजनान् शिवान् ।

अकुतश्चिद्भयान् रम्यांश्चैत्यायूपसमावृतान् ॥8॥

उद्यानाश्रवणोपेतान् सम्पब्बसलिलाशयान् ।

तुष्टपुष्टजनाकीर्णात् गोकुलाकुलसेवितान् ॥9॥

रक्षणीयान् नरेन्द्राणां ब्रह्मघोषाभिनादितान् ।

रथेन पुरुषव्याघ्रः कोसलानत्यवर्तत ॥10॥

कोसल जनपदास रथी बसुनी श्रीराम ।

ओलांडी जे धनधान्य संपन्न सुखदायक ॥8॥

आम्रवने उद्याने जलसंपन्न सरोवरे ।

जन सर्व हृष्टपुष्ट गाईंचे समूह तसे ॥9॥

जन दानशील संपन्न नसे भय कोणासही ।

नरेन्द्र करी रक्षा वेदमन्त्रध्वनी घुमे ॥10॥

मध्येन मुदितं स्फीतं रम्योद्यानसमाकुलम् ।

राज्यं भोज्यं नरेन्द्राणां ययौ धृतिमतां वर:॥11॥

मध्ये राज्य दिसे रामा रम्योद्याने युक्त जे ।

सामन्त नरेशां उपभोग्य धनधान्यसंपन्न जे ॥11॥

तत्र त्रिपथगां दिव्यां शीततोयामशैवलाम् ।

ददर्श राघवो गङ्गां रम्यामृषिनिषेविताम् ॥12॥

त्रिपथगामिनी गङ्गा जल शीतल रम्य जे।

महर्षि करिती प्राशन पाही रघुनाथ त्या तिथे ॥12॥

आश्रमैरविदूरस्थै श्रीमद्भि: समलंकृतम।

कालेऽप्सरोभिर्हृष्टाभि: सेविताम्भोह्रदां शिवाम् ॥13॥

जवळी आश्रम रम्य शोभा वाढवती तिथे ।

जलसेवना अप्सराही येती गङ्गा शुभंकर ॥13॥

देवदानवगन्धर्वैः किन्नरैरूपशोभिताम् ।

नागगन्धर्वपत्नीभिः सेवितां सततं शिवाम् ॥14॥

देव दानव गन्धर्व शोभा वाढवती तश्या ।

नाग गन्धर्व पत्न्या सेविती जल ते तिचे ॥14॥

देवाक्रीडशताकीर्णां देवोद्यानयुतां नदीम् ।

देवार्थमाकाशगतां विख्यातां देविपद्मिनीम् ॥15॥

क्रीडास्थले पर्वतीय उद्याने देवांची तशी ।

तटी तिच्या आकाशी विख्यात देवपद्मिनी ॥15॥

जलाघाताट्टहासोग्रां फेननिर्मलहासिनीम् ।

क्वचिद् वेणीकृतजलां क्वचिदावर्तशोभिताम् ॥16॥

प्रस्तरांवर आदळुनी ध्वनि जो अट्टहास तिचा ।

शुभ्र फेस प्रकट होई ते हास्य निर्मल तिचे ।

जल वेणीसम कुठे कोठे आवर्ते शोभित असे ॥16॥

क्वचित् स्तिमितगम्भीरां क्वचिद् वेगसमाकुलाम् ।

क्वचिद् गम्भीरनिर्घोषां क्वचिद् भैरवनि:स्वनाम् ॥17॥

कुठे निश्चल खोल कुठे वेगे धावत ।
कुठे मृदङ्ग गम्भीर कुठे वज्रासम महाध्वनी ॥17॥

देवसंघाप्लुतजलां निर्मलोत्पलसंकुलाम् ।
क्वचिदाभोगपुलिनां क्वचिन्निर्मलवालुकाम् ॥18॥

समुदाय त्यात देवांचे आच्छादित नीलोत्पले ।
विशाल पुलिन कोठे कुठे निर्मल वालुका ॥18॥

हंससारसंघुष्टां चक्रवाकोपशोभिताम् ।
सदामत्तैश्च विहगैरभिपन्नामनिन्दिताम् ॥19॥

हंस,सारस,करती कलरव शोभा भवरे वाढविती ।

जलावरी मदमत्त विहंगम उडुनी शोभा वाढवती ॥19॥

क्वचित तीररुहैर्वृक्षर्मालाभिरिव शोभिताम ।

क्वचित फुल्लोत्पलच्छन्नां क्वचित पद्मवनाकुलाम ॥20॥

कुठे तटवर्ती वृक्ष मालाकारे शोभती ।

उत्पले आच्छादित ते व्याप्त पद्मवने कुठे ॥20॥

क्वचित कुमुदखण्डैश्च कुड्मलैरुपशोभिताम ।

नानापुष्परजोध्वस्तां समदामिव च क्वचित ॥21॥

कुमुदसमूह कोठे शोभविती कोठे कळ्या।
पुष्पपरागे शोभित कोठे मत्त नारीसम ॥21॥

व्यपेतमलसंघातां मणिनिर्मलदर्शनाम् ।
दिशागजैर्वनगजैर्मतैश्च वरवारिणैः॥22॥
देवराजोपवार्यश्च संनादितवनांतराम् ।

करती दूर पापराशी जल निर्मल मणीसम ।
गज मदोन्मत्त श्रेष्ठ देवराज ज्यांचेवरी ॥22॥
होती स्वार कोलाहले त्यांच्या वन जाई भारुन ।

प्रमदामिव यत्नेन भूषितां भूषणोत्तमे ॥23॥

फलपुष्पै: किसलयैर्वृतां गुल्मैर्दिजेस्तथा ।

विष्णुपादच्युतां दिव्यामपापां पापनाशिनीम् ॥24॥

फळे फुले पल्लव गुल्म अलंकृत युवतीसम ।

विष्णुपदातुन प्रकट गङ्गा निष्पाप दिव्यही ।

पवित्र ती जीवां सर्व पापनाशिनी ती असे ॥24॥

शिंशुमारैश्च नक्रैश्च भुजंगैश्च समन्विताम् ।

शंकरस्य जटाजूटाद् भ्रष्टां सागरतेजसा ॥25॥

समुद्रमहिषीं गंगां सारसक्रौन्चनादिताम् ।

आससाद महाबाहुः शृङ्गवेरपुरं प्रति ॥26॥

भुजङ्ग मगरी यांनी वास्तव्य केले असे।

शंकराच्या जटेतून प्रकट भगिरथ कारणे ॥25॥

समुद्र पत्नी सारस क्रौञ्च कलरव जिच्यामध्ये ।

श्रुंगवेरपुरी जवळी श्रीराम तिजला स्पर्शती ॥26॥

तामूर्मिकलिलावर्तामन्यवेक्ष्य महारथः।

सुमन्तमब्रवीत् सूतमिहैवाद्य वसामहे ॥27॥

आवर्तव्याप्त दर्शन गंगेचे श्रीराम घेउनी।
वदती सुमन्त्र सूता राहू आज आपण इथे ॥27॥

अविदूरायं नद्या बहुपुष्पप्रवालवान्।
सुमहानिङ्गदीवृक्षो वसामोऽत्रैव सारथे ॥28॥

गङ्गेजवळि इङ्गदी पल्लवपुष्पशोभित।
वृक्षांतळी करू आज निवास रात्रि सारथी ॥28॥

प्रेक्षामि सरितां श्रेष्ठां सम्मान्यसलिलां शिवाम्।
देवमानवगन्धर्वमृगपन्नगपक्षिणाम् ॥29॥

देव मानव गन्धर्व मृग पक्षी पशुंसही ।
पवित्र जल जिचे गङ्गा होईल दर्शन तिचे ॥29॥

लक्ष्मणश्च सुमन्त्रश्च बाढमित्येव राघवम् ।
उक्त्वा तमिङ्गदीवृक्षं तदोपययतुहयैः ॥30॥

लक्ष्मण सुमन्त्र त्यांच्या वचना होकार देउनी ।
नेती अश्वांस जाण्यास इङ्गुदी वृक्षाप्रति ॥30॥

रामोऽभियाय तं रम्यं वृक्षमिक्ष्वाकुनन्दनः।
रथावतरत तस्मात सभार्यः सहलक्ष्मणः॥31॥

वृक्षाप्रति रमणीय श्रीराम इक्ष्वाकुनन्दन ।
उतरती रथातून भार्या लक्ष्मणासह ॥31॥

सुमन्त्रोऽप्यववतीर्याथ मोचयित्वा हयोत्तमान ।
वऋक्षमूलगतं राममुपतस्थे कृताञ्जलि: ॥32॥

सुमन्त्रही उतरे खाली अश्व उत्तम सोडुनी ।
रामास वृक्षतळी जो वन्दितो हात जोडुनी ॥32॥

तत्र राजा गुहो नाम रामस्यात्मसम: सखा।
निषादजात्यो बलवान स्थपतिश्चेति विश्रुत:॥33॥

तेथ गुह नाम राजा प्रिय मित्र रामाचा असे ।
जातीने निषाद बलवान् सैन्यासह नृप श्रेष्ठ जो ॥33॥

स श्रुत्वा पुरुषव्याघ्रं रामं विषयमागतम् ।
वृद्धैः परिवृत्तोऽमात्यैतिभिश्चाप्युमागतः॥34॥

ऐकुनि येति श्रीराम राज्यात आपुल्या सवे ।
घेउनी वृद्ध मन्त्यांना बन्धुबान्धवासह येतसे ॥34॥

ततो निषदाधिपति दृष्ट्वा दूरादुपस्थितम् ।
सह सौमित्रिणा रामः समागच्छद् गुहेन सः ॥35॥

निषादापतिला तेव्हां पाहुनी दूर उपस्थित ।
लक्ष्मणासह श्रीराम भेटती येत पुढे तया ॥35॥

तमार्तः सम्परिष्वज्य गुहो राघवमब्रवीत् ।
यथायोध्या तथेदं ते राम किं करवाणि ते ॥36॥
ईदृशं हि महाबाहो कः प्राप्स्यत्यतिथिं प्रियम् ।

आर्त वल्कलधारी त्या पाहुनी गुह दुःखित ।
जशी अयोध्या आपणा हेही राज्य तुम्हा असे ॥36॥
सांगा काय करू आपणासम अतिथि मिळे कुणा ।

ततो गुणवदन्नाद्यमुपादाय पृथग्विधम् ॥37॥

अर्घ्यं चोपानयच्छीघ्रं वाक्यं चेदमुवाच ह ।

स्वगतं ते महाबाहो तवेयमखिला मही ॥38॥

वयं प्रेष्या भवान् भर्ता साधु राज्यं प्रशाधि नः।

भक्ष्यं भोज्यं च पेयंच लेह्यं चैतदुपस्थितम् ।

शयनानि च मुख्यानि वाजिनां खादनं च ते ॥39॥

अन्न विविध उत्तम घेउनीया उपस्थित ।

अर्घ्य शीघ्र देउनिया असे बोले तयांप्रति ॥

असो स्वागत आपुले सर्व ही भूमि आपली ॥
आपण स्वामी सेवक आम्ही करा राज्य आपण।
खाद्य पेय लेह्य सर्व स्वीकारावे आपण ।
शय्या आपणासाठी अश्वांस्तव खाद्य चणे ॥37-39॥

गुहमेवं ब्रुवाणं तु राघव: प्रत्युवाच ह ।
अर्चिताश्चैव हृष्टाश्च भवता सर्वदा वयम् ॥40॥
पद्भ्यामभिगमाच्चैव स्नेहसंदर्शनेन च ।

गुहाने म्हणता ऐसे उत्तरे राघव तया ।

पायी येउनिया स्नेह दर्शने होत स्वागत ॥40॥

तसे पूजन झालो प्रसन्न अति त्यामुळे ।

भुजाभ्यां साधुवृत्ताभ्यां पीडयन् वाक्यमब्रवीत ॥41॥

दिष्ट्या त्वां गुह पश्यामि ह्यरोगं सह बान्धवै: ।

अपि ते कुशलं राष्ट्र मित्रेषु च वनेषु च ॥42॥

पुष्ट भुजांनी आपुल्या श्रीराम आलिङ्गुनि तया ॥41॥

बांधवांसह आनंदे पाहुनीया विचारतो ।

आहे ना कुशल सर्व वने राज्ये मित्रांसह ॥42॥

यत् त्विदं भवता किंचित् प्रीत्या समुकल्पितम् ।

सर्वं तदनुजानामि नहि वर्ते प्रतिग्रहे ॥43॥

सामुग्री प्रेमाने ही जी आणली घेउनी परत जा।

दुसरे देति त्या वस्तु अस्वीकार्य उपयोगि ना ॥43॥

कुशचीराजिनधरं फलमूलाशनं च माम् ।

विद्धि प्रणिहितं धर्मे तापसं वनगोचरम् ॥44॥

मी वल्कल मृगचर्म धारुनी फलमूल सेवन ।

वनात विचरित ऐसा नियमस्थित मी असे ॥44॥

अश्वानां खादनेनाहमर्थी नान्येन केनचित ।

एतावतात्र भवता भविष्यामि सुपूजित:॥45॥

अश्वखाद्य असे यात आवश्यक तेवढे आम्हा ।

तेवढेच घेता आमचा सत्कार हो स्वागत ॥45॥

एते हि दयिता राज्ञ: पितुर्दशरथस्य मे ।

एतै: सुविहितैरश्वैर्भविष्याम्यहमर्चित:॥46॥

प्रिय हे मम पित्याचे राजा दशरथाचे बहु ।

त्यांच्या योग्य समाचारे होतसे पूजन मम ॥46॥

अश्वानां प्रतिपानं च खादनं चैव सोऽन्वशात् ।

गुहस्तत्रैव पुरुषांस्त्वरितं दीयतामिति ॥47॥

अश्वाना खाण्या योग्य वस्तु आणाव्या अशी ।

सेवकां करी आज्ञा गुह तत्काळ त्यापरी ॥47॥

ततश्चीरोत्तरासङ्गः संध्यामन्वास्य पश्चिमाम् ।

जलमेवाददे भोज्यं लक्ष्मणोनाहतं स्वयम् ॥48॥

श्रीराम वल्कलधारी सायंसंध्या करोनिया ।

लक्ष्मणाने आणलेले जल घे भोजनास्तव ॥48॥

तस्य भूमौ शयानस्य पादौ प्रक्षाल्य लक्ष्मण:।

सभार्यस्य ततोऽभ्येत्य तस्थौ वृक्षमुपाश्रित:॥49॥

भार्येसह श्रीराम तृणशय्येवरि झोपती ।

चरण करुनी स्वच्छ लक्ष्मण अन्य वृक्षातळी ॥49॥

गुहोऽपि सह सूतेन सौमित्रिमनुभाषय्न ।

अन्वजाग्रत ततो रामम्प्रमत्तो धनुर्धर:॥50॥

सूतासह गुहसुद्धा लक्ष्मणाशी बोलत ।

रात्री जागृत राहून रक्षण रामाचे करी ॥50॥

तथा शयानस्य ततो यशस्विनी मनस्विनी दाशरथेर्महात्मन:।

अदृष्टदु:खस्य सुखोचितस्य सा तदा व्यतीता सुचिरेण शर्वरी ॥51॥

अश्या प्रकारे मनस्वी यशस्वी महात्मा श्रीराम सुख भोगलेले ।

ज्यांनी कधी दु: ख न पाहिलेले रात्र सुदीर्घ होतसे तयां ॥51॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे पञ्चाश: सर्ग:।

अयोध्याकाण्ड सर्ग 51

तं जाग्रतमदम्भेन भ्रातुराय लक्ष्मणम् ।
गुहः संतापसंतप्तो राघवं वाक्यमब्रवीत् ॥1॥

प्रेमाने बंधूसाठी जागृत गुह लक्ष्मणा ।
निषादराज संतापे म्हणे रघुकुलनन्दना ॥1॥

इयंतात सुखा शय्या त्वदर्थमुपकल्पिता।

प्रत्याश्वसिहि साध्वस्यां राजपुत्र यथासुखम् ॥2॥

तुम्हास्तव सुखशय्या तयार ही ठेविली ।

विश्राम करा त्यावरि निद्रस्त होउनी सुखे ॥2॥

उचितोऽयं जन: सर्व: क्लेशानां त्वं सुखोचित:।

गुप्त्यर्थं जागरिष्याम: काकुत्स्थस्य वयं निशाम् ॥3॥

आम्ही वनवासी क्लेश सहन करण्या योग्य ते।

सुख योग्य तुम्हा आम्ही जागृत रामरक्षणा ॥3॥

नहि रामात् प्रियतमो ममास्ते भुवि कश्चन ।

ब्रवीम्येव च ते सत्यं सत्येनैव च ते शपे ॥4॥

शपथ घेउनि सत्याची सांगतो मी तुम्हा असे ।

रामाहुन प्रिय कोणी नसे अधिक जगामध्ये ॥4॥

अस्य प्रसादादाशंसे लोकेऽस्मिन् सुमहद् यश:।

धर्मावाप्तिं च विपुलामर्थकामौ च पुष्कलौ ॥5॥

प्रसादे श्रीरामाच्या लोकी या यश महान ।

विपुल धर्म तसे अर्थ भोग प्राप्ति तयामुळे ॥5॥

सोऽहं प्रियसखं रामं शयानं सह सीतया ।

रक्षिष्यामि धनुष्याणि सर्वथा ज्ञातिभि: सह ॥6॥

तेव्हां प्रियसखा राम निद्रिस्त जो सीतेसह ।

करी रक्षण सशस्त्र राहुनी बांधवांसह ॥6॥

न मेऽस्त्यविदितं किंचिद् वनेऽस्मिंश्चरत: सदा ।

चतुरङ्ग ह्यतिबलं सुमहत् संतरेमहि ॥7॥

नसे वनी मज काही अज्ञात सदैव राहता ।

चतुरंग दलासुद्धा जिंकू आम्ही सुनिश्चित ॥8॥

लक्ष्मणस्तु तदोवाच रक्ष्यमाणास्त्वयानघ ।

नात्र भीता वयं सर्वे धर्ममेवानुपश्यता ॥8॥

कथं दाशरथौ भूमौ शयाने सह सीतया ।

शक्या निद्रा मया लब्धं जीवितं वा सुखानि वा ॥9॥

म्हणे लक्ष्मण तेव्हां आपण करता रक्षण ।

धर्मदृष्ट्या तदा आम्हा नसे कोणतेही भय ॥8॥

असता दाशरथी सुप्त सीतेसह भूमीवरी ।

कसे शक्य मला निद्रा शय्येवरि सुखे दुजी ॥9॥

यो न देवासुरै: सर्वै:शक्य: प्रसहितुं युधि।

तंपश्य सुखसंसुप्तं तृणेषु सह सीतया ॥10॥

देवतासुर संपूर्ण वेग ज्याचा न साहती ।

श्रीराम सीतेसहित सुखे तृणशय्येवरी ॥10॥

यो मन्त्रतपसा लब्धो विविधैश्च पराक्रमै:।

एको दशरथस्यैष पुत्र: सदृशलक्षण:॥11॥

अस्मिन् प्रव्रजिते राजा न चिरं वर्तयिष्यति ।

विधवा मेदिनी नूनं क्षिप्रमेव भविष्यति ॥12॥

जो मन्त्र तपे लाभे तसा विविध पराक्रमे ।
उत्तमलक्षण असा पुत्र लाभला दशरथ नृपा ।
असा पुत्र वनी जाता राजा जीवित राहि ना ।
वाटते निश्चित पृथ्वी शीघ्र विधवा होइल ॥12॥

विनद्य सुमहानादं श्रमणोपरता: स्त्रिय: ।
निर्घोषोपरतं तात मन्ये राजनिवेशनम् ॥13॥

निवासातिल स्त्रिया रुदने श्रान्त शान्त त्या ।
राजभवन आक्रोश शान्त झाला अता असे ॥13॥

कौसल्या चैव राजा च तथैव जननी मम।

नाशंसे यदि जीवन्ति सर्वे ते शर्वरीमिमाम् ॥14॥

कौसल्या दशरथ राजा तशीच जननी मम ।

राहतील जीवित का रात्रीतुनि शंका मज ॥14॥

जीवेदपि हि मे माता शत्रुघ्नस्यान्वेक्षया ।

तद् दु:खं यदि कौसल्या वीरसूर्विनशिष्यति ॥15॥

शत्रुघ्ना पाहण्या माझी माता जीवित जरी ।

मृत्यू कौसल्या मातेचा सर्वांना दु:खदायक ॥15॥

अनुरक्तजनाकीर्णा सुखालोकप्रियावहा।

राजव्यसनसंसृष्टा सा पुरू विनशिष्यति ॥16॥

श्रीराम अनुरक्त जन जिथे सुखी नगरि ती ।

दशरथ निधने दु:खे नष्ट होउनि जाइल ॥16॥

कथं पुत्रं महात्मानं ज्येष्ठपुत्रमपश्यत:।

शरीरं धारयिष्यन्ति प्राणा राज्ञो महात्मन:॥17॥

आपला पुत्र श्रीराम महात्मा पाहता न त्या ।

महाराज शरीरी प्राण करतील धारण कसे ॥17॥

विनष्टे नृपतीं पश्चात कौसल्या विनशिष्यति ।

अनन्तरं च मातापि मम नाशमुपैष्यति ॥18॥

त्यांच्या पश्चात कौसल्या माताही न राहती।

मम माताहि नंतर जगू ना शकेल ती ॥18॥

अतिक्रान्तमतिक्रान्तमनवाप्य मनोरथम् ।

राज्ये राममनिक्षिप्य पिता मे विनशिष्यति ॥19॥

अभिषेक रामा करणे मनोरथ पित्याचे असे ।

पूर्ण ते नच झाल्याने करतील प्राणत्याग ते ॥19॥

सिद्धार्था: पितरं वृत्तं तस्मिन् काले उपस्थिते ।

प्रेतकार्येषु सर्वेषु संस्करिष्यन्ति राघवम् ॥20॥

उपस्थित मृत्यूकाळी प्रेतकार्य संस्कारही ।

करती जे जन होति सिद्ध त्यांचे मनोरथ ॥20॥

रम्यचत्वरसंस्थानां संविभक्तमहापथाम् ।

हर्म्यप्रासादसम्पन्नां गणिकावरशोभिताम् ॥21॥

रथाश्वगजसम्बाधां तूर्यनादनिनादिताम् ।

सर्वकल्याणसम्पूर्णां हृष्टपुष्टजनाकुलम् ॥22॥

आरामोद्यानसंपन्नां समाजोत्सवशालिनीम् ।

सुखिता विचरिष्यति राजधानी पितुर्मम ॥23॥

रम्य चबुतऱ्यांनी युक्त विशाल अनेक पथ ।

प्रासाद भव्य धनिकांचे वाराङ्गना शोभित ॥21॥

गज अश्व रथे शोभित वाद्य नादे निनादित ।

कल्याण ज्यांचे होते हृष्टपुष्ट असे जन ॥22॥

उद्याने आरामदायी समाज उत्सवपूर्णही ।

राहती सुखे ऐसे असता मम पिता नृप ॥23॥

अपि जीवेद् दशरथो वनवासात् पुनर्वयम् ।

प्रत्यागम्य महात्मानमपि पश्याम सुव्रतम् ॥24॥

राहतील जीवित का संपता वनवास नृप ।

येउनी पाहु का आम्ही कुशलावस्थेत तयां ॥24॥

अपि सत्यप्रतिज्ञेन सार्धं कुशलिना वयम् ।

निवृत्ते वनवासेऽस्मिन्नयोध्यां प्रविशेमहि ॥25॥

वनवास पूर्ण होता सत्यप्रतिज्ञ रामासह ।

अयोध्येत प्रवेशू का परत सकुशल येउन ॥25॥

परिदेवयमानस्य दु:खार्तस्य महात्मन:।

तिष्ठतो राजपुत्रस्य शर्वरी सात्यवर्तत ॥26॥

आर्त होउनि दु:खाने विलापे रात्र ही अशी ।

लक्ष्मण राजपुत्राची जागृतावस्थेत जात ती ॥26॥

तथा हि सत्यं ब्रुवति प्रजाहिते नरेन्द्रसूनौ गुरुसौहृदाद् गुह:।

मुमोच बाष्पं व्यसनाभिपीडितो ज्वरातुरो नाग इव व्यथातुर: ॥27॥

अश्या प्रकारे यथार्थ जेव्हा लक्ष्मण बोले भ्रात्याप्रति ज्येष्ठ आपुल्या।

ऐकोनि जे दु:खित गुह अश्रू निषादराज ढाळितसे गजापरी ॥27॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे एकपञ्चाश: सर्ग:॥51॥

अयोध्याकाण्डसर्ग 52

प्रभातायां तु शर्वर्यां पृथुवक्षा महायशा:।
उवाच राम: सौमित्रिं लक्ष्मणं शुभलक्षणम् ॥1॥

प्रभाती संपता रात्र भव्यवक्ष महायश ।
म्हणे लक्ष्मणा राम सौमित्रा शुभलक्षण ॥1॥

भास्करोदयकालोऽसौ गता भगवती निशा ।

असौ सुकृष्णो विहग: कोकिलस्तात कूजति ॥2॥

व्यतीत भगवती रात्र समीप ये सूर्योदय ।

कोकीळ कृष्णवर्ण असे कुहुकुहु कूजित ॥2॥

बर्हिणानां च निर्घोष: श्रूयते नदतां वने ।

तराम जाह्नवीं सौम्य शीघ्रगां सागरङ्गमाम् ॥3॥

केकावाणि मयूरांची कानी ऐकाया येतसे ।

तेव्हां जाह्नवी पार शीघ्र करुया आपण ॥3॥

विज्ञाय रामस्य वचः सौमित्रिर्मित्रनन्दनः।

गृहमामन्त्र्य सूतं च सोऽतिष्ठद् भ्रातुरग्रतः ॥4॥

ऐकुनी वचन रामाचे गुहा सूतास सांगुनी ।

व्यवस्था करण्यास लक्ष्मण येत बंधूप्रति ॥4॥

स तु रामस्य वचनं निशम्य प्रतिगृह्य ।

स्थपतिस्तूर्णमाहूय सचिवानिदमब्रवीत ॥5॥

रामाचे वच ऐकोनी निषादराज आपुल्या ।

सचिवां बोलावुनी आज्ञापिति करण्या तसे ॥5॥

अस्यवाहनसंयुक्तां कर्णग्राहवतीं शुभाम् ।

उपोह्य रुचिरां नावं गुहाय प्रत्यवेदयत् ॥6॥

दृढ एक अशी नाव आणा सुलभ हाकण्या ।

नाविकासहित शीघ्र घाटावर सुबकशी ॥6॥

तं निशम्य गुहादेशं गुहामात्यो गतो महान् ।

उपोह्य रुचिरां नावं गुहाय प्रत्यवेदयत् ॥7॥

आदेशे गुहाच्या त्याचा अमात्य त्वरित जाउनी ।

नाव सुबक आणोनी सांगतसे गुहा तसे ॥7॥

ततः च प्राञ्जलिर्भूत्वा गुहो राघवमब्रवीत ।

उपस्तितेयं नौर्देव भूयः किं करवाणि ते ॥8॥

तेव्हां हात जोडून राघवा म्हणतसे गुह ।

नाव आणली आहे अजून काय करायचे ॥8॥

तवामरसुतप्रख्य तर्तुं सागरगामिनीम् ।

नौरियं पुरुषव्याघ्र शीघ्रमारोह सुव्रत ॥9॥

गंगेस सागरगामी तरण्या सेवेत आपल्या ।

नाव ही पुरुषव्याघ्र शीघ्र आरूढ त्यात व्हा ॥9॥

अथोवाच महातेजा रामो गुहमिदं वच:।

कृतकामोऽस्मि भवता शीघ्रमारोप्यतामिति ॥10॥

श्रीराम महातेज म्हणे गुहास यावरी ।

मनोदय मम पूर्ण नाव शीघ्र आता भरा ॥10॥

तत:कलापान् संनह्य खड्गौ बध्या च धन्विनौ ।

जग्मतुर्येन तां गङ्गां सीतया सह राघवौ ॥11॥

धनुष्यासह कवचधारी सीतेसह राम लक्ष्मण ।

इतरजन ज्या मार्गी जाती गंगातटि जात ते ॥11॥

राममेवं तु धर्मज्ञमुपागत्य विनीतवत् ।

किमहं करवाणीति सूत: प्राञ्जलिरब्रवीत् ॥12॥

धर्मज्ञ श्रीरामास विनये सूत विचारित ।

हात जोडुनि मी काय आपली सेवा करू ॥12॥

ततोऽब्रवीत् दाशरथि: सुमन्त्रं स्पृशन् करेणोत्तमदक्षिणेन ।

सुमन्त्र शीघ्रं पुनरेव याहि राज्ञ: सकाशे भव चाप्रमत्त:॥13॥

तदा सुमन्त्रा उत्तम दक्षिण हस्ते करूनिया स्पर्श श्रीराम वदे तयास ।

महाराजांकडे पुन्हा जाउनि शीघ्र तेथे रहा होउनि सावध हे सुमन्त्रा ॥13॥

निवर्तस्वेत्युवाचैनमेतावद्धि कृतं मम ।

रथं विहाय पद्भ्यां तु गमिष्यामो महावनम् ॥14॥

महाराज आज्ञेने मी रथे आलो इथवरी ।

आता रथ सोडुन आम्ही जाऊ महावनी ।

पायी चालत तुम्ही आता येथुनि परत जा ॥14॥

आत्मानं त्वभ्यनुज्ञातमवेक्ष्यार्त: स सारथि:।

सुमन्त्र: पुरुषव्याघ्रमैक्ष्वाकमिदमब्रवीत ॥15॥

आज्ञा परत जाण्याची ऐकुनी होत व्याकुळ ।

सुमन्त्र पुरुषव्याघ्रा इक्ष्वाकुनन्दना म्हणे ॥15॥

नातिक्रान्तमिदं लोके पुरुषेणेह केनचित ।

तव सभ्रातृभार्यस्य वास: प्राकृतवद् वने ॥16॥

बंधुभार्येसह जाण्या वनी सामान्य जनापरी ।

क्वचित दैव असे भाळी कोणा संसारी येतसे ॥16॥

न मन्ये ब्रह्मचर्ये वा स्वधीते वा फलोदय:।

मार्दवार्जव्योऽपि त्वां चेद् व्यसनमागतम ॥17॥

पाहुनि संकटी ऐशा वाटते स्वाध्याय मार्दव ।

आर्जवहि ब्रह्मचर्य यांचे फल न योग्य हे ॥17॥

सह राघव वैदेह्या भ्रात्रा चैव वने वसन।

त्वं गतिं प्राप्स्यसे वीरं त्रील्लोकांस्तु जयन्निव ॥18॥

भ्राता सीतेसवे वास वनी करुनि राघवा ।

तिन्ही लोक जिंकणाऱ्या वीराचे यश मिळविसी ॥18॥

वयं खलु हता राम ये त्वया ह्युपवञ्चिता:।

कैकेय्या वशमेष्याम: पापाया दु:खभागिन: ॥19॥

तव दर्शना वञ्चित मृत जणु रामा आम्ही ।

कैकेयी पापिणिला आम्ही वश दु:ख भोगित ॥19॥

इति ब्रुवन्नात्मसमं सुमन्त: सारथिस्तदा ।ज

दृष्ट्वा दूरगतं रामं दु:खार्तो रुरुदे चिरम् ॥20॥

आत्मसम प्रिय रामा सुमन्त्र बोलुनि असे ।

पाहूनी दूर जाताना शोकाने रुदना करी ॥20॥

ततस्तु विगते बाष्पे सूतं स्पृष्ट्वोदकं शुचिम् ।

रामस्तु मधुरं वाक्यं पुन: पुनरुवाच तम् ॥21॥

अश्रुपात थांबे त्याचा पवित्र आचमने तया ।

मधुर स्वरे श्रीराम वारंवार म्हणति त्या ॥21॥

इक्ष्वाकूणां त्वया तुल्यं सुहृदंनोपलक्षये ।

यथा दशरथो राजा मां न शोचेत तथा कुरु ॥22॥

तुझ्यासम न हित पाही इक्ष्वाकूंचे कोणिही ।

ज्यामुळे न नृप शोक करतील करी असे ॥22॥

शोकोपहतचेताश्च वृद्धश्च जगतीपतिः।

कामभारावसन्नश्च तस्मादेतद् बवीमि ते ॥23॥

महाराज असुनी वृद्ध मनोरथ भग्नही तसे ।

शोकपीडित असती ते म्हणुनी तुज सांगतो ॥23॥

यद् यथा ज्ञापयेत् किंचित् स महात्मा महीपतिः।

कैकेय्याः प्रियकामार्थं कार्यं तदविकांक्षया ॥24॥

आग्रहे कैकेयीच्या जी आज्ञा देती महीपती ।

आदरे पालन करणे अनुरोध माझा तुम्हा ॥24॥

एतदर्थं हि राज्यानि प्रशासति नराधिपाः।

यदेषां सर्वकृत्येषु मनो न प्रतिहन्यते ॥25॥

राजा पालन करीती राज्य येवढ्यासाठिच ।

कार्यात कोणिही त्यांच्या विघ्न न आणू शके ॥25॥

यद् यथा स महाराजो नालीकमधिगच्छति ।

न च ताम्यति शोकेन सुमन्त्र कुरु तत् तथा ॥26॥

महाराज शोकग्रस्त खिन्न होतिल ज्यामुळे ।

सुमन्त्रा अप्रिय ऐसे न घडू देइ कारण ॥26॥

अदृष्टदु:खं राजानं वृद्धमार्यं जितेंद्रियम् ।

ब्रूयास्त्वमभिवाद्यैव मम हेतोरिदं वच: ॥27॥

जितेन्द्रिय महाराजां दु:ख न ज्यांनी पाहिले ।

प्रणाम सांगुनि माझा निरोप द्या ऐसा तयां॥27॥

न चाहमनुशोचामि लक्ष्मणो न च शोचति ।

अयोध्यायाश्च्युताश्चेति वने वत्स्यामहेति वा ॥28॥

अयोध्येतुन निघता वा रहाण्या वनि लागता ।

नसे दु:ख मला त्याचे लक्ष्मणासहि ते तसे ॥28॥

चतुर्दशसु वर्षेषु निवृत्तेषु पुन:पुन ।

लक्ष्मणं मां च सीतां च द्रक्ष्यसे शीघ्रमागताम् ॥29॥

संपता चौदा वर्षे शीघ्र येऊ आम्ही पुन्हा।

लक्ष्मण सीतेसह आम्हा पहाल आपण ॥29॥

एवमुक्त्वा तु राजानं मातरं च सुमन्त्र मे ।

अन्याश्च देवी: सहिता: कैकेयीं च पुन: पुन: ॥30॥

असे म्हणुनि राजांना सुमन्त्रा मातेस मम ।

कैकेयीसह इतर मातांसही पुन्हा पुन्हा ॥30॥

आरोग्यं ब्रूहि कौसल्यामथ पादाभिवन्दनम् ।

सीताया मम चार्यस्य वचनाल्लक्ष्मणस्य च ॥31॥

कौसल्या मातेस मम स्वास्थ्य सांगुनि चांगले ।

सीता लक्ष्मणासहित मम पादाभिवन्दन ॥31॥

ब्रूयाश्चापि महाराजं भरतं क्षिप्रमानय ।

आगतश्चापि भरत: स्थाप्यो नृपमते पदे ॥32॥

सांग ऐसे महाराजां भरता शीघ्र आणुनी ।

येता करावे स्थापित युवराज पदी तया ॥32॥

भरतं च परिष्वज्य यौवराज्येऽभिषिच्य च ।

अस्मत्संतापजं दु:खं न त्वामभिभविष्यति ॥33॥

आलिंगुनि भरतास युवराज पदी स्थापुनी ।

वियोगे आमच्या दु:ख तुमचे न सरेल ते ॥33॥

भरतश्चापि वक्तव्यो यथा राजनि वर्तसे ।

तथा मातृषु वर्तेथा: सर्वास्वेवाविशेषत:॥34॥

भरतासहि हे सांगा महाराजांप्रति तुझे ।

वर्तन जसे तैसे सर्व मातांप्रति राहुदे ॥34॥

यथा च तव कैकेयी सुमित्रा चाविशेषत:।

तथैव देवी कौसल्या मम माता विशेषत:॥36॥

कैकेयीस देसि जे स्थान सुमित्रेस विशेषत:।

तसेच मम मातेस कौसल्येसही देशिल ॥36॥

तातस्य प्रियकामेन यौवराज्यमवेक्षता ।

लोकयोरुभयो: शक्यं नित्यदा सुखमेधितुम् ॥37॥

पित्याचे प्रिय करता युवराजपदी राहता ।

राज्य करता दोन्ही लोकांत होशिल सुखी ॥37॥

निवर्त्यमानो रामेण सुमन्त्र: प्रतिबोधित:।

तत्सर्वं वचनं श्रुत्वा स्नेहात काकुत्स्थम्ब्रवीत ॥38॥

सुमन्त्रास निघताना असे श्रीराम सांगता ।

ऐकोनि वचने सर्व सुमन्त्र स्नेहाने वदे ॥38॥

यदहं नोपचारेण ब्रूयां स्नेहादविक्लवम् ।

भक्तिमानिति तत् तावद् वाक्यं त्वं क्षन्तुमर्हसि ॥38॥

कथं हि त्वद्विहीनोऽहं प्रतियास्यामि तां पुरीम् ।

तव तात वियोगेन पुत्रशोकातुरामिव ॥39॥

मर्यादातिक्रम करतो ऐसे वाटेल आपणा

भक्त म्हणुनी मजला त्याबद्दल क्षमा करा ॥38॥

पुत्रशोके तव तात माता जेथ आक्रंदती ।

नगरीत त्या कसे जाऊ आपणा घेतल्याविना ॥39॥

सराममपि तावन्मे रथं दृष्ट्वा तदा जनः।

विना रामं रथं दृष्ट्वा विदीर्येतापि सा पुरी ॥40॥

निघता रथी श्रीरामा पाहिले जनानि ज्या ।

रामाविण रथ पाहूनी विदीर्ण पुरि होइल ॥40॥

दैन्यं हि नगरीं गच्छेद् दृष्ट्वा शून्यमिमं रथम् ।

सूतावशेषं स्वं सैन्यं हतवीरमिवाहवे ॥41॥

रथ मोकळा पाहून नगरी दीन होइल ।

सारथि केवळ दिसता सैन्य स्वामीविना जसे ॥41॥

दूरेऽपि निवसन्तं त्वां मानसेनाग्रत: स्थितम् ।

चिन्तयन्तोऽद्य नूनं त्वां निराहारा: कृता: प्रजा:॥42॥

जरी दूर असताना हृदयात वास आपुला ।

वर्जिले असेल अन्न त्यांनी खचित त्यामुळे ॥42॥

दृष्टं तद् वै त्वया राम यादृशं त्वत्प्रवासने ।

प्रजानां संकुलं वृत्तं त्वच्छोकक्लान्तचेतसाम् ॥43॥

वनी निघता आपण प्रजेने चित्त व्याकुळ ।

प्रकट केला असे शोक होता आपण पाहिला ॥43॥

आर्तनादो हि यः पौरैरुन्मुक्तस्त्वत्प्रवासने ।

सरथं मां निशाम्यैव कुर्युः शतगुणं ततः ॥44॥

आर्तनाद जो पुरवासी निघता करति आपण ।

रथ तुम्हाविण पाहून शतश: करतील ते ॥44॥

अहंकिं चापि वक्ष्यामि देवीं तव सुतो यया ।

नीतोऽसौ मातुलकुलं संतापं मा कृथा इति ॥45॥

असत्यमपि नैवाहं ब्रूयां वचनीदृशम् ।

कथमप्रियमेवाहं ब्रूयां सत्यमिदं वचः ॥46॥

काय देवी कौसल्या यांना सांगू असत्य मी ।

पुत्रा मातुलगृही नेले संताप नका करू ॥45॥

ते न शक्य तदा सत्य कसे अप्रिय सांगु मी ।

आपल्या पुत्रास आलो सोडुनीया वनात मी ॥46॥

मम तावन्नियोगस्त्वबन्धुजनवाहिनः।

कथं रथं त्वया हीनं प्रवाह्यन्ति हयोत्तमाः॥47॥

मम आज्ञेने जे अश्व वाहती भार आपला ।

कसे ते तयार होतील तुम्हाविण रथ ओढण्या ॥47॥

तन्न शक्ष्याम्यहं गन्तुमयोध्यां त्वदृतेऽनघ ।

वनवासानुमानाय मामज्ञातुमर्हसि ॥48॥

निष्पाप श्रीरामा ना शक्य अयोध्या जाणे मला ।

वनवासात येण्याची आज्ञा द्यावी तरी मला ॥48॥

यदि मे याचमानस्य त्यागमेव करिष्यसि ।

सरथोऽग्निं प्रवेक्ष्यामि त्यक्तमात्र इह त्वया ॥49॥

भविष्यन्ति वने यानि तपोविघ्नकराणि ते ।

रथेन प्रतिबधिष्ये तानि सर्वाणि राघव ॥50॥

याचिता आपणा ऐसे मजला जर त्यागाल ।
रथासह अग्नीमध्ये प्रवेश करेन मी ॥49॥
तपात आपल्या विघ्ने आणतील जे जन ।
रथ वापरुनी त्यांना पळवीन दूरमी ॥50॥

त्वाकृतेन मया प्राप्तं रथचर्याकृतं सुखम् ।
आशंसे त्वत्कृतेनाहं वनवासकृतं सुखम् ॥51॥

रथी बैसवुनी तुम्हा आणण्याचे सुख मज ।

मिळाले अनुगृहे तैसे मिळो रहाया वनी ॥51॥

प्रसीदेच्छामि तेऽरण्ये भवितुं प्रत्यनन्तरः।

प्रीत्याभिहितमिच्छामि भव मे प्रत्यनन्तरः ॥52॥

आज्ञा द्या आपणासंगे वनी मी राहु इच्छितो ।

म्हणा आनंदाने मजला तू जवळी रहा ॥52॥

इमेऽपि च हया वीर यदि ते वनवासिनः ।

परिचर्यां करिष्यन्ति प्राप्स्यन्ति परमां गतिम् ॥53॥

अश्वही वनी राहूनी सेवा करता आपुली ।

तेहि परमगति प्राप्त करतील वीरा त्यामुळे ॥53॥

तव शुश्रूषणं मूर्ना करिष्यामि वने वसन् ।

अयोध्या देवलोकं वा सर्वथा प्रजहाम्यहम् ॥54॥

प्रभो वनी राहून शुश्रुषा करिन आपुली ।

अयोध्या वा देवलोक त्याज्य मज त्याच्यापुढे ॥54॥

नहि शक्या प्रवेष्टं सा मयायोध्या त्वया विना ।

राजधानी महेन्द्रस्य यथा दुष्कृतकर्मणा ॥55॥

दुष्कृत्ये करता जैसे प्रवेश न स्वर्गी मिळे ।

तुम्हाविन अयोध्येत प्रवेश मज शक्य ना ॥55॥

वनवासे क्षयं प्राप्ते ममेष हि मनोरथ:।

यदनेन रथेनैव त्वां वहेयं पुरी पुन: ॥56॥

मम इच्छा वनवास संपता रथानेच या ।

बसवूनि तुम्हा यात अयोध्येस न्यायची ॥56॥

चतुर्दश हि वर्षाणि सहितस्य त्वया वने ।

क्षणभूतानि यास्यन्ति शतसंख्यानि चान्यथा ॥57॥

तुम्हासह चौदा वर्षे क्षणापरि जातील ।

अन्यथा चौदा वर्षे शत वर्षापरी जणु ॥57॥

भृत्यवत्सल तिष्ठन्तं भर्तृपुत्रगते पथि ।

भक्तं भृत्यं स्थितं स्थित्वा न मा त्वं हातुमर्हसि ॥58॥

भक्तवत्सल मम स्वामीपुत्र आपल्या पथी ।

आहे भक्त स्थित भृत्य तुम्हा सोडु न इच्छितो ॥58॥

एवं बहविधं दीनं याचमानं पुनःपुनः।

रामो भृत्यामुकम्पी तु सुमन्त्रमिदमब्रवीत ॥59॥

करिता वचने दीन सुमन्त्रे याचना अशी ।

सेवकांस कृपावन्त श्रीराम म्हणे तया ॥59॥

जानामि परमां भक्तिमहं ते भर्तृवत्सल ।

श्रुणु चापि यदर्थं त्वां प्रेषयामि पुरीमित: ॥60॥

भक्ति तुझी मजवरी स्वामीनिष्ठामी जाणतो ।

परी तुज पुरी पुन्हा पाठवतो का सांगतो ॥60॥

नगरीं त्वां गतं दृष्ट्वा जननी मे यवीयसी ।

कैकेयी प्रत्ययं गच्छेदिति रामो वनं गत: ॥61॥

जाता परत अयोध्या तुजला माता कैकेयी ।

पाहता करेल विश्वास गेला राम वनी ॥61॥

विपरीते तुष्टिहीना वनवासं गते मयि ।

राजानं नातिशङ्केत मिथ्यावादीति धार्मिकम् ॥62॥

तुम्ही न गेल्यास वनवासी होउनीहि मी ।

संशय असत्यवचनाचा राजांवरि घेइल ॥62॥

एष मे प्रथम: कल्पो यदम्बा मे यवीयसी।

भरतारक्षितं स्फीतं पुत्रराज्यमवाप्स्यते ॥63॥

परत पाठवता तुम्हा माता मम कैकेयी ।

करेल हस्तगत राज्य सुरक्षित भरतामुळे ॥63॥

मम प्रियार्थं राज्ञश्च सुमन्त्रं त्वं पुरीं व्रज ।

संदिष्टश्चापि यानर्थास्तांस्तान् ब्रूयास्तथा तथा ॥64॥

महाराजांच्या हितासाठी सुमन्त्रा अयोध्येस जा ।

संदेश दिधले जे ते त्या त्या व्यक्तीस पोचवा ॥64॥

इत्युक्त्वा वचनं सूतं सान्त्वयित्वा पुन:पुन:।

गुहं वचनमक्लीबो रामो हेतुमब्रवीत ॥65॥

असे म्हणुनी सूता करुनि सान्वन पुन:पुन्हा ।

हेतुयुक्त गुहास उत्साहे वचन बोलले ॥65॥

नेदानीं गुह योग्योऽहं वासो मे सजने वने ।

अवश्यमाश्रमे वास: कर्तव्यस्तद्गतो विधि:॥66॥

नसे वनी जनयुक्त योग्य रहाणे मज हे गुहा ।

राहूनी कर्तव्य करणे आश्रमात आवश्यक ॥66॥

सोऽहं गृहीत्वा नियमं तपस्विजनभूषणम् ।

हितकाम: पितुर्भूय: सीताया लक्ष्मणस्य च ॥67॥

जटा: कृत्वा गमिष्यामि न्यग्रोधक्षीरमानय ।

तत्क्षीरं राजपुत्राय गुह: क्षिप्रमुपाहरत ॥68॥

निद्रा आहार नियम तपस्विजनां योग्य जे ।

पित्याच्या हितासाठी सीता लक्ष्मणा सवे॥67॥

जटा धारण करुनी वनी जाइन त्यास्तव।

वट्दुग्ध काढूनीया देई राजपुत्रा गुह॥68॥

लक्ष्मणस्यात्मनश्चैव रामस्तेनाकरोज्जटा:।

दीर्घबाहर्नरव्याघ्रो जटिलत्वमधारयत ॥69॥

ते वापरूनि श्रीराम स्वत:सह लक्ष्मणासवे ।

महाबाहु नरव्याघ्र जटाधारी बनतसे ॥69॥

तौ तदा चीरसंपन्नौ जटामण्डलधारिणौ।

अशोभेतामृषुसमौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ ॥70॥

श्रीराम लक्ष्मण तैसे जटावल्कलधारी ते ।

ऋषीसम बन्धू दोघे रामलक्ष्मण शोभती॥70॥

ततो वैखानसं मार्गमास्थित: सह लक्ष्मण:।

व्रतमादिष्टवान् राम: सहायं गुहमब्रवीत ॥71॥

आश्रयोनि वानप्रस्था श्रीराम लक्ष्मणासह ।

व्रत ग्रहण करुनी गुहास मग बोलले ॥71॥

अप्रमत्तो बले कोशे दुर्गे जनपदे तथा ।

भवेथा गुह राज्यं हि दुरारक्षतमं मतम् ॥72॥

सेना खजिना किल्ला राज्याविषयी सावध ।

रहा सदा गुहा कारण राज्यरक्षण दुर्घट ॥72॥

ततस्तं समनुज्ञाप्य गुहमिक्ष्वाकुननदन:।

जगाम तूर्ण्मव्यग्र: सभार्य: सहलक्ष्मण:॥73॥

निरोप गुहास ऐसा देत इक्ष्वाकुनन्दन ।

सपत्नी लक्ष्मणासह त्वरित निघती पुढे ॥73॥

स तु दृष्ट्वा नदीतीरे नावमिक्ष्वाकुनन्दनः।

तितीर्घः शीघ्रगां गङ्गामिदं वचनमब्रवीत ॥74॥

नाव पाहुनि नदीतीरे गङ्गा शीघ्रवाहिनी ।

नदी पार जाण्यास्तव लक्ष्मणा सम्बोधती ॥74॥

आरोहं त्वं नरव्याघ्रं स्थितां नावमिमां शनैः।

सीतां चारोपयान्वक्षं परिगृह्य मनस्विनीम् ॥75॥

नरसिंहा स्थित नावेत चढुनी सीतेसह वरी।

बसवुनी तिला तूही नावेत बसुनी रहा ॥75॥

स भ्रातु: शासनं श्रुत्वा सर्वमप्रतिकूलयन् ।

आरोप्य मैथिली पूर्वमारुरोहात्मवांस्तत: ॥76॥

ऐकुनि आदेश भ्रात्याचा वागताना तसेचही ।

बसवून मैथिलीस नावेत तो बसे स्वत: ॥76॥

अथारुरोह तेजस्वी स्वयं लक्ष्मणपूर्वज: ।

ततो निषादाधिपतिर्नुहो ज्ञातीनचओदयत ॥77॥

तेजस्वी श्रीराम बसे त्यानंतर नावेत स्वत:।

निषादराज गुह आज्ञापी नाव हाकण्या ॥77॥

राघवोऽपि महातेजा नावमारुह्य तां तत:।

ब्रह्मवत्क्षत्रवच्चैव जजाप हितमात्मन: ॥78॥

राघवहि महातेज आरूढ नावेत होउनी ।

ब्राह्मण क्षत्रिया योग्य जप करिती हितास्तव ॥78॥

आचम्य च यथाशास्त्रं नदीं तां सह सीतया ।

प्रणमत्प्रीतिसंतुष्टो लक्ष्मणस्य महारथ:॥79॥

शास्त्रयुक्त आचमने गङ्गेस वंदन करी ।

सीतेसह प्रसन्नचित्ते लक्ष्मणहि तसे करी ॥79॥

अनुज्ञाय सुमन्त्रं च सबलं चैव तं गुहम् ।

आस्थाय नावं रामस्तु चोदयामास नाविकान् ॥80॥

सुमन्त्रा गुहास जाण्या सैन्यासहित सांगुनी ।

नावाड्यांस हाकण्या नाव राम आदेश देतसे ॥80॥

ततश्चैचालिता नौका कर्णधारसमाहिता ।

शुभस्फ्यवेगाभिहता शीघ्रं सलिलमत्यगात् ॥81॥

नावाडी चालविती नाव कर्णधारसंचालित ।

वल्हे वेगे मारति ते नाव शीघ्र जलावरी ॥81॥

मध्यं तु समनुप्राप्य भागीरथ्यास्त्वनिन्दिता।

वैदेही प्राञ्जलिर्भूत्वा तां नदीमिदमब्रवीत ॥82॥

गंगेच्या मध्य धारेत जाता विदेहनन्दिनी ।

हात जोडुनिया सीता गङ्गेस प्रार्थना करी ॥82॥

पुत्रौ दशरथस्यायं महाराजस्य धीमत:।

निदेशं पालयत्वेनं गले त्वदभिरक्षित:॥83॥

दोन हे दशरथपुत्र पित्राज्ञा पाळण्यास्तव ।

वनी जाता रक्षुनि त्यां आज्ञापालन होउ दे ॥83॥

चतुर्दश हि वर्षाणि समग्राण्युष्य कानने ।

भ्राता सह मया चैव पुनः प्रत्यागमिष्यति ॥84॥

पूर्ण चौदा वर्षे वनी बन्धु आणि मजसवे ।

व्यतीत करुनी पुन्हा अयोध्यापुरि येतिल ॥84॥

ततस्तां देवि सुभगे क्षेमेण पुनरागता।

यक्ष्ये प्रमुदिता गङ्गे सर्वकामसमृद्धिनी ॥85॥

तरी हे देवी सुभगे परतता सुखरूप ।

मनोरथपूर्ण आनन्दे पूजा तव करीन मी ॥85॥

त्वंहित्रिपथगेदेविब्रह्मलोकंसमक्षसे।

भार्याचोदधिराजस्यलोकेऽस्मिन् सम्प्रदृश्यसे॥86॥

तिन्ही लोकात जाशी अससी ब्रह्मलोकिही।

यालोकी समुद्रराजाची पत्नी म्हणुनि मिरविशी॥86॥

सात्वांदेविनमस्यामिप्रशंसामिचशोभने।

प्राप्तराज्येनरव्याघ्रशिवेनपुनरागते॥87॥

श्रीराम प्राप्त करता राज्या परतुनी पुन्हा ।

पुन्हा मस्तक झुकवीन प्रशंसा तव करीन मी॥87॥

गवांशतसहस्रंचवस्त्राण्यन्नंचपेशलम् ।

ब्राह्मणेभ्य: प्रदास्यामितवप्रियचिकीर्षया॥88॥

लक्ष गायी तशी वस्त्रे उत्तम अन्नही तसे।

ब्राह्मणां करीन दान तव प्रिय करण्यास्तव॥88॥

सुराघटसहस्रेणमांसभूतौदनेनच।

उअक्ष्येत्वांप्रीयतांदेविपुरींपुनरुपागता॥89॥

अयोध्यापुरी पुन्हा येता हजारो देवदुर्लभ।

पदार्थे आपली पूजा करीन प्रसन्न व्हा॥89॥

यानित्वत्तीरवासीनिदैवतानिचसन्तिहि।

तानिसर्वाणियक्ष्यामितीर्थान्यायतनानिच॥90॥

किनाऱ्यावरि आपल्या तीर्थे देवमन्दिरे ।

असतील त्या सर्वांचे करीन मीच पूजन॥90॥

पुनरेवमहाबाहुर्मयाभ्रात्राचसंगत:।

अयोध्यावनवासात तुप्रविशत्वनघोऽनघे॥91॥

पति महाबाहु माझा भ्रात्यासह परतावा।

अयोध्येत असे माझे मागणे निर्मले असे॥91॥

तथासम्भाषमाणासासीतागङ्गामनिन्दिता।

दक्षिणादक्षिणंतीरंक्षिप्रमेवाभ्युपागमत ॥92॥

सम्भाषण अनुकूल करता सीता पतीस्तव।

दक्षिणतीरापर्यंत शीघ्र जाउनि पोचती॥92॥

तीरंतुसमनुप्राप्यनावंहित्वानरर्षभ।

प्रातिष्ठितसहभ्रातावैदेह्याचपरंतप:॥93॥

जाता तीरावरी नाव सोडुनी नरश्रेष्ठ तो।

लक्ष्मण सीतेसह करी प्रस्थान तेथुनी॥93॥

अथामब्रवीन्महाबाहु: सुमित्रानन्दनवर्धनम् ।

भय संरक्षणार्थाय सजने विजनेऽपि वा॥94॥

अवश्यं रक्षणं कार्यं मद्विधैर्विजने वने ।

अग्रतो गच्छ सौमित्रे सीता त्वामनुगच्छतु ॥95॥

पृष्ठतोऽ नुहमिष्यामि सीतां त्वां चानुपालयन् ।

अन्योन्यस्य हि नो रक्षा कर्तव्या पुरुषर्षभ ॥96॥

महाबाहु श्रीराम लक्ष्मणा नंतर बोलती ।

रक्षणार्थ सीतेच्या वनी निर्जन वा जनी॥94॥

रहा तू दक्ष कारण नारीरक्षण आवश्यक ।

म्हणुनी पुढे चाल सीता मागून येइल ॥95॥

रक्षणार्थ दोघांच्या मी चालेन सर्वा मागुती ।

रक्षिणे एकमेकां कर्तव्य पुरुषर्षभ ॥96॥

न हि तावदतिक्रान्तासुकरा काचन क्रिया।

अद्य दु:खं तु वैदेही वनवासस्य वेत्स्यति॥97॥

अजुनी न संकट काही आता येऊ शकेलही ।

अनुभवेल वैदेही कष्ट वनवासातिल ॥97॥

प्रणष्टजनसम्बाधं क्षेत्रारामविवर्जितम् ।

विषमं च प्रघातं च वनमद्य प्रवेक्ष्यति ॥98॥

प्रवेश करेल जागी निर्मनुष्य शेताविना ।

उंचसखल असेल भूमी पडण्याचे भय ॥98॥

श्रुत्वा रामस्य वचनं प्रतस्थे लक्ष्मणोऽग्रत:।

अनन्तरं च सीताया राघवो रघुनन्दन:॥99॥

ऐकुनी वचना त्याच्या लक्ष्मण होई पुढे ।

मागुनी जातसे सीता मागे श्रीरघुनन्दन ॥99॥

गतं तु गङ्गापरपारमाशु रामं सुमन्त्रः सततं निरीक्ष्य ।

अध्यप्रकर्षाद् विनिवृत्तदृष्टिन्मुमोच बाष्पं व्यथितस्तपस्वी ॥100॥

करूनि गंगा श्रीराम पार जाता न्यहाळे सुमन्त्र अविरत तोपर्यंत ।

गेल्यामुळे दूर न दृष्टि पाही सुमन्त्र दु:खे करि अश्रुपात ॥100॥

स लोकपालप्रतिमप्रभावस्तीर्वा महात्मा वरदो महानदीम् ।

ततः समृद्धान् शुभसस्यमालिनःक्रमेण मुदितानुपागमत् ॥101॥

प्रभावशाली श्रीराम महात्मा लोकपालासम गंगा करूनि पार ।

प्रवेशति वत्सदेशी समृद्ध संपन्न तसेच जनही हृष्टपुष्ट जिथे ॥101॥

तौ तत्र हत्वा चतुरो महामृगान् वराहमृश्यं पृषतं महारुरुम् ।

आदाय मेध्यं त्वरितं बुभुक्षितौ-वासाय काले ययतुर्वनस्पतिम् ॥102॥

सोडूनि बाण करती शिकार वराह,ऋष्य महारुरु,पृषत महामृग ।

होता क्षुधित नंतर घेउनि कंदमूळ पवित्र जाती वृक्षातळि रहाया ॥102॥

॥इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे द्विपञ्चाश: सर्ग:॥52॥

अयोध्याकाण्ड सर्ग 53

स तं वृक्षं समासाद्य संध्यामन्वास्य पश्चिमाम् ।
रामो रमयतां श्रेष्ठ इति होवाच लक्ष्मणम् ॥1॥

वृक्षातळि जाऊनिया करूनि संध्योपासना ।
जना आनंद देणारे बोलती श्रीराम लक्ष्मणा ॥1॥

अदैव प्रथमा रात्रिर्याता जनपदाद् बहिः।

या समन्त्रेण रहिता तां नोत्कंठितुमर्हसि ॥2॥

जनपदाबाहेर रात्र ही पहिली तुझी ।

नसे नगर व्यवस्था अस्वस्थ न हो त्यामुळे ॥2॥

जागर्तव्यमतन्द्रिभ्यामद्यप्रभृति रात्रिषु ।

योगक्षेमौ हि सीताया वर्तते लक्ष्मणावयोः॥3॥

रहावे जागृत लागे रात्री दोघांस आपणा।

सीतेचे रक्षण करणे कर्तव्य आपले असे ॥3॥

रात्रिं कथंचिदेवेमां सौमित्रे वर्तयामहे ।

अपवर्तामहे भूमावास्तीर्य स्वयमर्जिते:॥4॥

गोळा करुनी पाने पाचोळा शय्येस्तव ।

पसरूनी भूमीवरती रात्र घालवु आपण ॥4॥

स तु संविश्य मेदिन्यां महार्हशयनोचित:।

इमा: सौमित्रये रामो व्याजहार कथा: शुभा:॥5॥

शयना उचित ऐश्या बहुमूल्य शय्येविना ।

भूमीवरी बसुनि राम लक्ष्मणा सांगे कथा शुभ ॥5॥

ध्रुवमद्य महाराजो दु:खं स्वपिति लक्ष्मण ।

कृतकामा तु कैकेयी तुष्टा भवितुमर्हति ॥6॥

असतील महाराज निद्रिस्त परि दु:खित ।

मनोरथ पूर्ण कैकेयी संतुष्ट असेल ती ॥6॥

सा हि देवी महाराजं कैकेयी राज्यकारणात ।

अपि न च्यावयेत प्राणान् दृष्ट्वा भरतमागतम् ॥7॥

येता भरत मिळावे राज्य यास्तव कैकेयी ।

प्राणावरती त्यांच्या उदार होऊ नये ॥7॥

अनाथश्च हि वृद्धश्च मया चैव विना कृत:।

किं करिष्यति कामात्मा कैकेय्या वशमागत ॥8॥

मी नसता वृद्ध पिता अनाथ असती जणु ।

कह्यात कैकेयीच्या कोण त्याना रक्षिल ॥8॥

इदं व्यसनमालोक्य राज्ञस्य मतिविभ्रमम् ।

काम एवार्थधर्मात्मा गरीयानिति मे मति:॥9॥

महाराज मतिभ्रष्ट संकटा पाहुनी अश्या ।

मज वाटे धर्म अर्थाहुनि श्रेष्ठ काम तो ॥9॥

को ह्यविद्वानपि पुमान् प्रमदाया: कृते त्यजेत ।

छन्दानुवर्तिनं पुत्र तातो मामिव लक्ष्मण ॥10॥

जसे तात मला त्यजती तसा अज्ञहि कोणता ।

स्त्रीस्तव आज्ञाकारी पुत्रा त्यागेल आपुल्या? ॥10॥

सुखी बत सुभार्यश्च भरत: कैकेयीसुत:।

मुदितान् कोसलानेको यो भोक्ष्यत्यधिराजवत ॥11॥

कैकेयीसुत भरत सुभार्येचा असे पति ॥

पाळेल एकटा देश भोगेल श्रेष्ठ सुखा ॥11॥

स हि राज्यस्य सर्वस्य सुखमेकं भविष्यति।

ताते तु वयसातीते मयि चारण्यमाश्रिते ॥12॥

पिता वृद्ध मी वनात असता भरत केवळ ।

समस्त राज्याचे श्रेष्ठ सुख उपभोगेल तो ॥12॥

अर्थधर्मौ परित्यज्य य: कामनुवर्तते ।

एवमापद्यते क्षिप्रं राजा दशरथो यथा ॥13॥

त्यजूनि जो अर्थ धर्म कामास केवळ अनुसरे ।

हो शीघ्र आपत्तिग्रस्त दशरथ महाराजासम ॥13॥

मन्ये दशरथान्ताय मम प्रव्राजनाय च ।

कैकेयी सौम्य सम्प्राप्ता राज्याय भरतस्य च ॥14॥

करण्या अन्त राजांचा,पाठवाया मज वनी ।

भरतास राज्यप्राप्ती होण्या कैकेयी येतसे ॥14॥

अपीदानीं तु कैकेयी सौभाग्यमदमोहिता।

कौसल्यां च सुमित्रां च सा प्रबाधेत मत्कृते ॥15॥

सौभाग्यमदमोहित ती कैकेयी या समयीसुद्धा ।

कौसल्या नि सुमित्रेस कष्टवील मत्कारणे ॥15॥

मातास्मत्कारणाद् देवी सुमित्रा दु:खमावसेत।

अयोध्यामित एवं त्वं काले प्रविश लक्ष्मण ॥16॥

होईल सुमित्रा माता दु:खिता आमच्यामुळे ।

त्यास्तव अयोध्येत या समयी लक्ष्मणा जाइ तू ॥16॥

अहमेको गमिष्यामि सीतया सह दण्डकान् ।

अनाथाया हि नाथस्य कौसल्याया भविष्यसि ॥17॥

मी एकटाच जाईन सीतेसह दण्डकवनी ।

अनाथ मम मातेचा सहायक बनशील तू ॥17॥

क्षुद्रकर्मा हि कैकेयी द्वेषादन्यायमाचरेत ।

परिदद्यादि धर्मज्ञ गरं ते मम मातरम् ॥18॥

क्षुद्र मानस कैकेयी करिल द्वेषे अन्याय ।

विषसुद्धा देइल ती दोघांच्या मातांसही ॥18॥

नूनं जात्यन्तरे तात स्त्रिय: पुत्रैर्वियोजिता:।

जनन्या मम सौमित्रे तददैतदुपस्थितम् ॥19॥

पूर्वजन्मी मम माता काही स्त्रियांच्या पुत्रांशी।

वियोगा झाली कारण त्याचे फल प्राप्त होत हे ॥19॥

मया हि चिरपुष्टेन दु:खसंवर्धितेन च ।

विप्रयुज्यत कौसल्या फलकाले धिगस्तु माम् ॥20॥

दु:ख भोगुनि मातेने पालन केले मम ।

आज सुख तिला देण्या नसे मी धि:कार मम ॥20॥

मा स्म सीमन्तिनी काचिज्जनयेत पुत्रमीदृषम् ।

सौमित्रे योऽहमम्बाया दयि शोकमनन्तकम् ॥21॥

सौमित्रा स्त्री कोणतीही पुत्रा प्रसवेल मजसम ।

ज्याने सदैव शोक मातेस दिधला असे ॥21॥

मन्ये प्रीतिविशिष्टा सा मत्तो लक्ष्मण सारिका ।

यतस्या: श्रूयते वाक्यं शुक पादमरेर्दश ॥22॥

मातेने पाळलेली ती सारिकाही मजहुनी ।

प्रेम करते शुका सांगे शत्रुपादा चाव तू ॥22॥

शोचन्त्याश्चाल्पभाग्याया न किंचिदुपकुर्वता।

पुत्रेण किमपुत्राया मया कार्यमरिंदम ॥23॥

शोकमग्न मजसाठी अल्पभाग्य जिचे पांग ।

न जो फेडि असा पुत्र मिळुनी काय फायदा ॥23॥

अल्पभाग्या हि मे माता कौसल्या रहिता मया ।

शेते परमदु:खार्ता पतिता शोकसागरे ॥24॥

दुर्भाग्य तिचे दूर जात मी तिजपासुनी ।

शोकसागरी बुडुनी दु:खमग्न ती निद्रित ॥24॥

एको ह्यहमयोध्यां च पृथिवीं चापि लक्ष्मण ।

तरेयमिषुभि: क्रुद्धो ननु वीर्यमकारणम् ॥25॥

एकटा बाण सोडुनी अयोध्या पृथ्विही शके ।

करण्या निष्कंटक मी क्रोधे परि न योग्य ते ॥25॥

अधर्मभयभीतश्च परलोकस्य चानघ ।

तेन लक्ष्मण नाद्याहमात्मानमभिषेचये ॥26॥

अधर्म करणे योग्य नसे परलोक पावण्या ।

म्हणुनी अयोध्येवर अभिषेक न करी मम ॥26॥

एतदन्यच्च करुणं विलप्य विजने बहु ।

अश्रूपूर्णमुखो दीनो निशि तूष्णीमुपाविशत ॥27॥

ऐश्या बोलून वचना श्रीराम निर्जन वनी ।

विलाप करिता रात्री नंतर मूक होतसे ॥27॥

विलापोपरतं रामं गतार्चिषमिवानलम् ।

समुद्रमिव निर्वेगमाश्वासयत लक्ष्मण:॥28॥

ज्वालारहित अग्नि वा शान्त सागर जसा ।

विलापमुक्त रामास लक्ष्मण आश्वासुनी वदे ॥28॥

ध्रुवमद्य पुरी राम अयोध्याऽऽयधिनां वर:।

निष्प्रभा त्वयि निष्क्रान्ते गतचन्द्रेव शर्वरी॥29॥

सोडिता श्रेष्ठ रामा तू अयोध्या निष्प्रभ होतसे ।

नि:संशय जशी रात्र चन्द्र मावळता दिसे ॥29॥

नैतदौपयिकं राम यदिदं परितप्यसे ।

विषादयसि सीतां च मां चैव पुरुषर्षभ ॥30॥

संतप्त असे होणे न योग्य कदापि तुला ।

त्यामुळे सीतेस मला दु:खी बनवितोस तू ॥30॥

न च सीता त्वया हीना न चाहमपि राघव ।

मुहूर्तमपि जीवावो जलान्मत्स्याविवोद्धृतौ ॥31॥

आपणाविन आम्ही दोघे जीवित न राहु शकू ।

जसा जलातुनि मत्स्य काढता न जगू शके ॥31॥

नहि तातं न शत्रुघ्नं न सुमित्रां परंतप ।

द्रष्टमिच्छेयमद्याहं स्वर्गं वापि त्वयाविना ॥32॥

न तात बंधु शत्रुघ्ना सुमित्रा मातेसही ।

स्वर्गलोकहि पाहू इच्छी तुजवीण परंतपा ॥32॥

ततस्तत्र समासीनौ नातिदूरे निरीक्ष्य ताम् ।

न्यग्रोधे सुकृतां शय्यां भेजाते धर्मवत्सलौ ॥33॥

वटवृक्षातळी सीता राम दोघे जाउनी ।

शय्येवरी बसती जी लक्ष्मणकृत उत्तम ॥33॥

स लक्ष्मणस्योत्तमपुष्कलं वचो निशम्य चैवं वनवासमादरात ।
समा: समस्ता विदधे परंतप: प्रपद्य धर्मसुचिराय राघव:॥34॥

तसे वनवासाबद्दल लक्ष्मणाचे बोल ऐकोनिया उत्तम स्वीकारुनी ।
श्रीरामचंद्र शत्रुतापद अनुमती संपूर्ण काळ रहाया संगे देतसे तया ॥34॥

ततस्तु तस्मिन् विजने महाबलौ महावने राघववंशवर्धनौ ।
न तौ भयं सम्भ्रममभ्युपेयतुर्यथैव सिहौ गिरिसानुगोचरौ ॥35॥

वनात त्या निर्जन महावीर दोघे भव्य त्या राघववंशवर्धन ।
विचरताति पर्वतशिखरावरी सिंहापरी भय वा उद्वेग सोडुनि ॥35॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽऽयोध्याकाण्डे त्रिपञ्चाश: सर्ग:॥53॥

रामाने कैकेयी वा दशरथास दूषणे दिली ती त्याच्या स्वभावाविरुद्ध आहेत पण ती केवळ लक्ष्मणाला जाण्यास प्रवृत्त करावे म्हणूनच केली असावीत हे अनुवादकाचे मत.

अयोध्याकाण्ड सर्ग 54

ते तु तस्मिन् महावृक्षे उचित्वा रजनीं शुभाम् ।
विमलेऽभ्युदिते सूर्ये तस्माद् देशात् प्रतस्थिरे ॥1॥

महान वृक्षाखाली त्या रात्र सुन्दर कंठुनी ।
निर्मल सूर्योदये त्या निघती स्थाना सोडुनी ॥1॥

यत्र भागीरथीं गङ्गां यमुनाभिप्रवर्तते ।

जग्मुस्तं देशमुद्दिश्य विगाह्य सुमहद् वनम् ॥2॥

जिथे भागीरथी गंगा यमुनेस मिळतसे ।

स्थानी त्या जाण्यास वनी शिरुनी चालु लागती ॥2॥

ते भूमिभागान् विविधान् देशांश्चापि मनोहरान।

अदृष्टपूर्वान् पश्यन्तस्तत्र तत्र यशस्विन:॥3॥

विविध भूभाग जेथे आले न कधी तिघे ॥

प्रदेश मनोहर ते पहात पुढती चालती ॥3॥

यथा क्षेमेण सम्पश्यन् पुष्पितान् विविधान् द्रुमान् ।

निर्वृत्तमात्रे दिवसे रामः सौमित्रिमब्रवीत् ॥4॥

झाडे विविध फुललेली सुखे पाहत चालती ।

दिन मावळता राम लक्ष्मणास म्हणे असे ॥4॥

प्रयागमभितः पश्य सौमित्रे धूममुत्तमम् ।

अग्नेर्भगवतः केतुं मन्ये संनिहितो मुनिः॥5॥

लक्ष्मणा प्रयागापाशी पहा धूम्र दिसतसे ।

अग्निरूप ध्वजा सांगे भारद्वाज मुनी इथे ॥5॥

नूनं प्राप्ता: स्म सम्भेदं गङ्गायमुनयोर्वयम् ।

तथाहि श्रूयते शब्दो वारिणोरिघर्षज:॥6॥

आपण निश्चित आलो गंगायमुना संगमी ।

संगमातुन उत्पन्न संघर्षध्वनि ऐकु ये ॥6॥

दारूणि परिभिन्नानि वनजैरुपजीविभि:।

छिन्नाश्चाप्याश्रमे चैते दृश्यन्ते विविधा द्रुमा:॥7॥

तोडलेली काष्ठे भिन्न वनजीवींनी दिसती इथे ।

आश्रमापाशि ते वृक्ष विविध काष्ठे ज्यांचि ते ॥7॥

धन्विनौ तौ सुखं गत्वा लम्बमाने दिवाकरे ।

गङ्गायमुनयो: संधौ प्रापतुर्निलयं मुने:॥8॥

धनुर्धर दोघे जाता होता सूर्यास्त पाहती ।

संगमाजवळी जाती भरद्वाज मुनि आश्रमी ॥8॥

रामस्त्वाश्रममासाद्य त्रासयन् मृगपक्षिण:।

गत्वा मुहूर्तमध्वानं भरद्वाजमुपागतम् ॥9॥

आश्रमी दिसता राम मृगपक्षी भयकंपित ।*(उभयां धनुर्धारि वेषात पाहती त्यामुळे घडे)*

जात पळांमध्ये काही भरद्वाज मुनींप्रति ॥9॥

तत्स्त्वाश्रममासाद्य मुनेर्दर्शनकांक्षिणी ।

सीतयानुगतौ वीरौ दूरादेवावतस्थतु:॥10॥

पोचुनी आश्रमी तैसे मुनींदर्शन उत्सुक ।

सीतेसह वीर दोघे उभे राहति दूरची ॥10॥

स प्रविश्य महात्मानमृषिं शिष्यगणैर्वृतम् ।

संशितव्रतमेकाग्रं तपसा लब्धचक्षुषम् ॥11॥

हुताग्निहोत्रं दृष्टवैव महाभाग: कृताञ्जलि:।

राम: सौमित्रिणा सार्धं सीतया चाभवायत ॥12॥

मुनीं जे त्रिकालदर्शी दिव्य दृष्टि तपोबले ।
अग्निहोत्र करूनीया आसने विराजमान ॥11॥
शिष्य जवळी त्यांच्या पाहुनी राम लक्ष्मण ।
सीतेसह हात जोडून चरणस्पर्श करिती तयां ॥12॥

न्यवेदयत् चात्मानं तस्मै लक्ष्मणपूर्वज:।
पुत्रौ दशरथस्यायां भगवन् रामलक्ष्मणौ ॥13॥
भार्या ममेयं कल्याणी वैदेही जनकात्मजा ।
मां चानुयाता विजनं तपोवनमनिन्दिता ॥14॥

श्रीराम नंतर त्याना परिचय करण्या सांगती ।
दशरथपुत्र आम्ही भगवन् रामलक्ष्मण ॥13॥
भार्या ही माझि कल्याणि वैदेही जनकात्मजा ।
तपोवनी मजसवे आली साथ देण्या मज ॥14॥

पित्रा प्रव्राज्यमानं मां सौमित्रिरनुज:प्रिय:।
अयमन्यगमद् भ्राता वन मेव धृतव्रत:॥15॥

पित्राज्ञेने वनी जाता पाहुनी मज येतसे ।
बन्धु सौमित्र घेऊन राहण्याचे व्रत वनी ॥15॥

पित्रा नियुक्ता भगवन् प्रवेक्ष्यामस्तपोवनम् ।

धर्ममेवाचरिष्यामस्तत्र मूलफलाशना:॥16॥

आम्ही पित्याच्या आज्ञेने तिघे जाउ तपोवनी ।

आहार फल मूलांचा धर्मे आचरणा करू ॥16॥

तस्य तद् वचनं श्रुत्वा राजपुत्रस्य धीमत:।

उपानयत धर्मात्मा गामर्थ्यमुदकं तत:॥17॥

वचन राजपुत्राचे ऐकून भरद्वाज धर्मात्मा ऋषि ।

आतिथ्य करिती देत अर्घ्यजल धेनूसह ॥17॥

नानाविधानन्नरसान् वन्यमूलफलाश्रयान् ।

तेभ्यो ददौ तप्ततपा वासं चैवाभ्यकल्पयत् ॥18॥

प्रदान करिती नाना अन्नरस फलमूल ।

वास करण्या स्थानाची करती व्यवस्थाहि ते ॥18॥

मृगपक्षिभिरासीनो मुनिभिश्च समन्ततः।

राममागतमभ्यर्च्य स्वागतेनागतं मुनिः॥19॥

प्रतिगृह्य तु ताम मुपाविष्टं स राघवम्।

भरद्वाजोऽब्रवीद् वाक्यं धर्मयुक्तमिदं तदा ॥20॥

ऋषीभोवती असती मृग,पक्षि ऋषी मुनी ।
सर्व ते श्रीरामाचे करती सत्कार स्वागत ॥19॥
स्वीकारुनि ते श्रीराम विराजति आसनावरी ।
भरद्वाज धर्मयुक्त बोलती वचना तया ॥20॥
चिरस्य खलु काकुत्स्थ पश्याम्यहमुपागतम् ।
श्रुतं तव मया चैव विवासनमकारणम् ॥21॥
दीर्घकाल अपेक्षितो काकुत्स्था आश्रमी तुज ।
ज्ञात मज वनवास तुज होई अकारण ॥21॥

अवकाशो विविक्तोऽयं महानद्यो: समागमे ।

पुण्यश्च रमणीयश्च वसत्विह भवान् सुखम् ॥22॥

नद्यांचे संगमस्थान पवित्र एकान्तस्थळ ।

मंगल तसे रमणीय इथे वास सुखे करी ॥22॥

एवमुक्तस्तु वचनं भरद्वाजेन राघव:।

प्रत्युवाच शुभं वाक्यं राम: सर्वहिते रत: ॥23॥

भरद्वाज असे बोल बोलता ते ऐकोनिया ।

सर्वहित जपणारे श्रीराम शुभ बोलती ॥23॥

भगवन्नित आसन्न: पौरजानपदो जन:।

सुदर्शमिह मां प्रेक्ष्य मन्येऽहमिममाश्रमम् ॥24॥

आगमिष्यति वैदेही मां चापि प्रेक्षको जन:।

अनेन कारणेबाहमिह वासं न रोचये ॥25॥

भगवन असे हे स्थान नगर जानपदाचिया।

जवळी त्यामुळे लोकां येण्यास सुकर असे ॥24॥

भेटण्यास वैदेहीस आम्हासहि लोक येतिल ।

त्यामुळे आम्हा स्थान रहाण्या योग्य हे नसे ॥25॥

एकान्ते पश्य भगवन्ताश्रमस्थानमुत्तमम् ।

रमते यत्र वैदेही सुखार्दा जनकात्मजा ॥26॥

आश्रमा उत्तम स्थान एकान्ती पाहणे जिथे ।

भोगण्या सुख जी योग्य वैदेही राहील सुखे ॥26॥

एतच्छ्रुत्वा शुभं वाक्यं भरद्वाजो महामुनि:।

राघवस्य तु तद् वाक्यमर्थग्राहकमब्रवीत ॥27॥

ऐकुनी वचन रामाचे भरद्वाज महामुनी।

पूर्तीस वचना नेण्या सांगती ते तया असे ॥27॥

दशक्रोश इतस्तात गिरिर्यस्मिन् निवत्स्यसि ।

महर्षिसेवित: पुण्य: पर्वत: शुभदर्शन:॥28॥

येथून दहा कोस असे पर्वत सुन्दर ।

महर्षिद्वारा सेवित निवास तेथ तुम्ही करा॥28॥

गोलाङ्गलानुचरितो वानरनिर्भनिषेवित:।

चित्रकूट इति ख्यातो गन्धमादनसंनिभ:॥29॥

वानरे माकडे अस्वल असती ज्या पर्वतावरी।

चित्रकूट नामे ख्यात गन्धमादनमनोहर ॥29॥

यावता चित्रकूटस्य नरः श्रुङ्गाण्यवेक्षते ।

कल्याणानि समाधाते न पापे कुरुते मनः ॥30॥

शिखरे चित्रकूटाची कल्याणकारी पाहता ।

पुण्यकर्मफल लाभे नष्ट हो पापवासना ॥30॥

ऋषयस्तत्र बहवो विहृत्य शरदां शतम् ।

तपसा दिवमारूढाः कपालशिरसा सह ॥31॥

अनेक ऋषि तेथील शत वर्षे तपासही ।

करुनी स्वर्गलोकात जाती शुभ्र मस्तके॥31॥

प्रविविक्तमहं मन्ये तं वासं भवत: सुखम् ।

इह वा वनवासाय वस राम मया सह ॥32॥

सुखद योग्य मज वाटे एकांतवासास्तव ।

वनवासार्थ रहा रामा आश्रमे तेथे मजसवे ॥32॥

स रामं सर्वकामैस्तं भरद्वाज: प्रियातिथिम् ।

सभार्यं सह च भ्राता प्रतिजग्राह हर्षयन् ॥33॥

प्रिय अतिथि श्रीरामा मनोवाञ्छित देउनी ।

भार्येसह भ्रात्याचे करिती आतिथ्य योग्य ते ॥33॥

तस्य प्रयागे रामस्य तं महर्षिमुपेयुष:।

प्रपन्ना रजनीं पुण्या चित्रा: कथयत: कथा: ॥34॥

श्रीरामचंद्र प्रयागे मुनींच्या विविध कथा ।

ऐकता होतसे पुण्य रजनीचे आगमन ॥34॥

सीतातृतीय: काकुत्स्थ: परिश्रान्त: सुखोचित:।

भरद्वाजाश्रमे रम्ये तां रात्रिमवसत् सुखम् ॥35॥

सुखोचित परी श्रान्त सीतेसह राम लक्ष्मण ।

आश्रमे मनोहर त्या करती व्यतित रात्र ते ॥35॥

प्रभातायां तु शर्वर्यां भरद्वाजमुपागमत ।

उवाच नरशार्दूलो मुनिं ज्वलिततेजसम् ॥36॥

संपता रात्र श्रीराम तेजस्वी भरद्वाजाप्रति ।

बोलती पुरुषसिंह जवळ जाउनिया असे ॥36॥

शर्वरीं भगवन्नद्य सत्यशील तपाश्रमे ।

उषिता: स्मोऽह वसतिमनुजानातु नो भवान् ॥37॥

भगवन् सत्यशील व्यतीत रात्र आश्रमे ।

आता पुढील मुक्कामी जाण्यास द्या आज्ञा अम्हा ॥37॥

रात्र्यां तु तस्यां व्युष्टायां भरद्वाजोऽब्रवीदिदम् ।

मधुमूलफलोपेतं चित्रकूटं व्रजेति ह ॥38॥

वासमौपथिकं मन्ये तव राम महाबल ।

भरद्वाजांस श्रीराम प्रभाती पुसता असे ।

उत्तरती फलमूल असती मधुर जिथे ॥38॥

चित्रकूट असे तुम्हा वसण्या स्थान उत्तम ।

नानानगगणोपेत: किन्नरोरगसेवित:॥39॥

मयूरनादाभिरतो गजराजनिषेवित :।

गम्यता भवता शैलश्चित्रकूट: स विश्रुत:॥40॥

हरित नाना वृक्षांनी सर्प किन्नर युक्त जे ॥39॥

केकारव मयूरांचा वसती गजराजही ।

चित्रकूटे सुविख्यात जाणे योग्य तुम्ही तिथे ॥40॥

पुण्यश्च रमणीयश्च बहुमूलफलायुत:।

तत्र कुञ्जरयूथानि मृगयूथानि चैव हि ॥41॥

विचरन्ति वनान्तेषु तानि द्रक्ष्यसि राघव ।

सरित्प्रस्रवणप्रस्थान् दरीकन्दरनिर्झरान् ।

चरत: सीतया सार्धं नन्दिष्यति मनस्तव ॥42॥

ते पवित्र रमणीय संपन्न फलमुलांनी ।

झुंडीने फिरती तेथे गजराज हरिणे तशी ॥41॥

पाहसी प्रत्यक्ष त्यांना फिरताना वनामध्ये ।

पर्वतशिखरे जलस्रोत दऱ्या गुंफा झरे तसे ॥

सीतेसह फिरता तेथे प्रफुल्ल मन होइल ॥42॥

प्रहृष्टकोयष्टिभकोकिलस्वनैर्विनोदयन्त च सुखं परं शिवम् ।

मृगैश्च मत्तैर्बहुभिश्च कुञ्जरै: सुरम्यमासाद्य समावसाश्रयम् ॥43॥

मनास आनन्द मिळे ऐकुनी कोकिळ टिटव्या करति नाद सुस्वर ।
अनेक हत्ती मृगराजही तसे सौन्दर्य वाढवती तेथ रहाल सुखे तुम्ही ॥43॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे चतु:पञ्चाश: सर्ग:॥54॥

अयोध्याकाण्ड सर्ग 55

उषित्वा रजनीं तत्र राजपुत्रावरिंदमौ ।
महर्षिमभिवाद्याथ जग्मतुस्तं गिरिं प्रति ॥1॥

आश्रमी रात्र काढून राजपुत्र शत्रुनाशक ।
महर्षींना वन्दून निघती चित्रकूटाप्रति ॥1॥

तेषां स्वस्त्ययनंचैव महर्षि: स चकार ह ।

प्रस्थितान् प्रेक्ष्य तांश्चैव पिता पुत्रानिवौरसान् ॥2॥

स्वस्तिवाचन करती महर्षि तयांस्तव ।

आशीर्वाद मंगल देती स्वपुत्रांस पिता जसा ॥2॥

तत: प्रचक्रमे वक्तुं वचनं स महामुनि:।

भरद्वाजो महातेजा रामं सत्यपराक्रमम् ॥3॥

नंतर महातेजस्वी भरद्वाज महामुनि ।

सांगाया लागती रामा सत्यपराक्रमी ॥3॥

गंगायमुनयो: संधिमासाद्य मनुजर्षभौ।

कालिन्दीमनुगच्छेतां नदी पश्चान्मुखाश्रिताम् ॥4॥

संगमी गंगायमुना पोचता पश्चिममुखी ।

यमुनेस मिळे गंगा नरश्रेष्ठ त्या स्थानि जा ॥4॥

अथासाद्य तु कालिन्दी प्रतिस्रोत:समागताम् ।

तस्यातीर्थं प्रचरितं प्रकामंप्रेक्ष्य राघव ।

तत्र यूयं प्लवं कृत्वा तरतांशुमती नदीम् ॥5॥

गंगाप्रवाह वेगे यमुना बदले दिशा ।

ज्या स्थली जो पदचिन्हे उतरण्या योग्य असे ।
तराफा बनवुनि तेथे तरणे यमुना नदी ॥5॥

ततो न्यग्रोधमासाद्य महान्तं हरितच्छदम् ।
परीतं बहुभिर्वृक्षः श्यामं सिद्धोपसेवितम् ॥6॥
तस्मिन् सीताञ्जलिं कृत्वा प्रयुञ्जीताशुषां क्रियाम् ।
समासाद्य च तं वृक्षं वसेद् वातिक्रमेत वा ॥7॥

पुढे जाता वट वृक्ष हरितपर्ण सभोवती ।
असती वृक्ष अनेक छायेत त्या सिद्ध राहती ॥6॥

हात जोडुनिया सीता वृक्षांचा आशीर्वच जिथे ।
मागेल विश्राम तेथे घ्या आवश्यक वाटता ॥7॥

क्रोशमात्रं ततो गत्वा नीलं प्रेक्ष्य च काननम् ।
सल्लकीबदरीमिश्रं रम्यं वंशैश्च यामुनै:॥8॥

एक कोस पुढे जाता दिसेल नीलवन ।
बोरी बाभळी वृक्ष रमणीय वन असे ॥8॥

स पन्थाश्चित्रकूटस्य गतस्य बहुशो मया ।
रम्यो मार्दवयुक्तश्च दावैश्चैव विवर्जित:॥9॥

मार्ग हा चित्रकूटाचा क्रमिला मी अनेकदा ।
रम्य दृश्य असलेला दावानलमुक्त तो असे ॥9॥

इति पन्थानमादिश्य महर्षि: संन्यवर्तत ।
अभिवाद्य तथेत्युक्त्वा रामेण विनिवर्तित:॥10॥

मार्ग दाखवून ऋषी निघता परत तयां ।
तथास्तु म्हणुनि राम निरोप देइ वन्दुनी ॥10॥

उपावृते मुनौ तस्मिन् रामो लक्ष्मणमब्रवीत ।
कृतपुण्या: स्म भद्रं ते मुनिवर्यन्नोऽनुकम्पते ॥11॥

मुनि जाता म्हणे राम लक्ष्मणास मुनीकृपा ।
आपणावरि जी झाली कृतपुण्य त्याचे फळ ॥11॥

इति तौ पुरुषव्याघ्रौ मन्त्रयित्वा मनस्विनी ।
सीतामेवाग्रत: कृत्वा कालिन्दी जग्मतुर्नदीम् ॥12॥

पुरुषव्याघ्र ते दोघे करीत चर्चा पुढे ।
सीतेस घेउनी जाती यमुनेच्या तटावरी ॥12॥

अथासाद्य तु कालिंदी शीघ्रस्रोतबाहिनी ।
चिन्तामापेदिरे सद्यो नदीजलतितीर्षय:॥13॥

यमुना शीघ्र जिथे वाहे करती चिन्ता त्या स्थळी ।
जाउनी कशी ही पार करायची त्वरे नदी ॥13॥

तौ काष्ठसंघाटमथो चक्रतु: सुमहाप्लवम् ।
शुष्कवंशै: समाकीर्णमुशीरैश्च समावृतम् ॥14॥
ततो वैतसशाखाश्च जम्बुशाखाश्च वीर्यवान् ।
चकार लक्ष्मणश्छित्वा सीताया: सुखमासनम् ॥15॥।

शुष्क काष्ठे वनातील गोळा करुनि तयार ।
तराफा बनविती ते गवत त्यावर पसरुनी॥14॥

जम्बु वेत शाखा युक्त आसना सीतेस्तव।
करी सुखद तयार लक्ष्मण महापराक्रमी ॥15॥

तत्र श्रियमिवाचिन्त्यां रामो दाशरथि: प्रियाम् ।
ईषत्स लज्जमानां तामध्यारोपयत प्लवम् ॥16॥
पार्श्वे तत्र च वैदेह्या वसने भूषणानि च ।
प्लवे कठिनकाजं च रामश्चक्रे समाहित:॥17॥

ऐश्वर्यशाली वैदेही राम दाशरथि प्रिय।
आसनावरि केलेल्या बसवी लज्जिता तिला ॥16॥

त्यावरी आभूषण वस्त्र ठेउनी जवळी तिच्या
सावधचित्ते श्रीराम साहित्यासह बसे वरी ॥17॥

आरोप्य सीतां प्रथमं संघाटं परिगृह्य तौ।
ततः प्रतेरतुर्यत्तौ प्रीतौ दशरथात्मजौ ॥18॥

बसवुनी प्रथम सीतेस तराफा दोघे हाकती।
प्रयत्ने आरम्भ करिती पार करण्या नदी ॥18॥

कालिन्दीमध्यमायाता सीता त्वेनामवन्दत ।
स्वस्ति देवि तरामि त्वां पारयेन्म्र पतिव्रतम ॥19॥

नदीच्या मध्ये येता सीता तिज वन्दुनी म्हणे ।
कृपे पार करी देवी प्रतिज्ञा पतिची तशी ॥19॥

यक्ष्ये त्वां गोसहस्रेण सुराघटशतेन च ।
स्वस्ति प्रत्यागते रामे पुरीमिक्ष्वाकुपालिताम् ॥20॥

सहस्र गाई दुर्लभ पदार्थ शत अर्पुनी ।
पूजा करीन अयोध्या येता श्रीरामासह ॥20॥

कालिन्दीमथ सीता तु याचमाना कृताञ्जलि:।
तीरमेवाभिसम्प्राप्ता दक्षिणं वरवर्णिनी ॥21॥

प्रार्थना जोडुनी हात वैदेही वरवर्णिनी ।
करीतसे तेवढ्यात दक्षिण तीरे पोचती ॥21॥

ततः प्लवेनांशुमती शीघ्रगामूर्मिमालिनीम् ।
तीरजैर्बहुभिर्वृक्षैः संतेरुर्यमुना नदीम् ॥22॥

ते तिघे करती पार यमुना वृक्षे सुशोभित ।
अलंकृत सूर्यकन्या जलयाने बसूनिया ॥22॥

ते तीर्णाः प्लवमुत्सृज्य प्रस्थाय यमुनावनात् ।
श्यामं न्यग्रोधमासेदुः शीतलं हारितच्छदम् ॥23॥

पार करुनि जलयान सोडुनीया तटावरी ।
वनी जाति श्यामवटी हरित पर्णे सुशोभित ॥23॥

न्यग्रोधं समुपागम्य वैदेही चाभ्यवन्दत ।
नमस्तेऽस्तु महावृक्ष पारयेन्मे पतिव्रतम् ॥24॥

वट्वृक्षाप्रती येता वैदेही अभिवन्दुनी ।
म्हणे कृपा वटवृक्षा करी पूर्ण पतिव्रत ॥24॥

कौसल्यां चैव पश्येम सुमित्रां च यशस्विनीम् ।
इति सीताञ्जलिं कृत्वा पर्यगच्छन्मनस्विनी ॥25॥

परतुनी पाहू आम्ही कौसल्या सुमित्रेसह ।
म्हणुनी जोडुनी हात प्रदक्षिणा पुरी करी ॥25॥

अवलोक्य ततः सीतामायाचन्तीमनिन्दिताम् ।
दयितां च विधेयां च रामो लक्ष्मणमब्रवीत् ॥26॥

आज्ञाकारी प्रिय सीता पाहुनी करि प्रार्थना ।
वटा याचना करिता वदे श्रीराम लक्ष्मणा ॥26॥

सीतामादाय गच्छ त्वमग्रतो भरतानुज ।
पृष्ठतोऽनुगमिष्यामि सायुधो द्विपदां वर ॥27॥

सीतेस घेऊनि चाल पुढे तू भरताग्रजा ।
सशस्त्र तुमच्या मागे रक्षणार्थ चालेन मी ॥27॥

यद् यत् फलं प्रार्थयते पुष्पं वा जनकात्मजा ।
तत् तत् प्रयच्छ वैदेह्या यत्रास्या रमते मन:॥28॥

जी जी फळे वा पुष्पे मागेल जनकात्मजा ।
प्रसन्न तिजला ठेवी ती सर्व तिज देऊनी ॥28॥

एकैकं पादपं गुल्मं लतां वा पुष्पशालिनीम् ।
अदृष्टरूपां पश्यन्ती रामं पप्रच्छ साऽबला ॥29॥

एकेक वृक्ष अथवा वेली पुष्पाच्छादित ।
ज्ञात पूर्वी न सीतेस विचारी श्रीरामास ती ॥29॥

रमणीयान् बहुविधान् पादपान् कुसुमोत्करान् ।
सीतावचनसंरब्ध आनयामास लक्ष्मण:॥30॥

वृक्षाच्या विविध शाखा फुलांचे गुच्छही तसे ।
सीता मागतसे तैसे आणुनी देइ लक्ष्मण ॥30॥

विचित्रवालुकजलां हंससारसनादिताम् ।
रेभे कनकराजस्य सुता प्रेक्ष्य तदा नदीम् ॥31॥

विचित्र वालुका तैसी जलराशि सुशोभित ।
यमुना मुखरित तैसी हंस सारस कलरवे ।
प्रसन्न सीता होई दृश्य रमणीय पाहुनी ॥31॥

क्रोशमात्रं ततो गत्वा भ्रतरौ रामलक्ष्मणौ ।
बहून् मेध्यान् मृगान् हत्वा चेस्तुर्यमुनावने ॥32॥

एक कोस असे चालून वधूनि हिंस्र प्राणि जे ।
वनी यमुनातटवर्ती चालती रामलक्ष्मण ॥32॥

विहृत्य ते बर्हिणपूगनादिते शुभे वने वारणवानरायुते ।

समं नदीवप्रमुपेत्य सत्वरं निवासमाजग्मुरदीनदर्शना:॥33॥

उदार दृष्टियुक्त ते तिघे वनात सुन्दर वानर गज युक्त त्या ।

फिरूनि नदीतिरी सखल येउनी निवास तेथेच रात्रि करती तिथे ॥33॥

इत्यर्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे पञ्चपञ्चाश: सर्ग:॥55॥

अयोध्याकाण्ड सर्ग 56

अथ रात्र्यां व्यातीतायामवसुप्तमनंतरम् ।
प्रबोधयामास शनैर्लक्ष्मणं रघुपुङ्गवः॥1॥

संपता रात्र श्रीराम रघुनन्दन लक्ष्मणा ।
जागृत करुनी हलके आज्ञापती तया असे ॥1॥

सौमित्रे श्रुणु वन्यानां वल्गु व्याहरतां स्वनम् ।

सम्प्ररिष्ठामहे काल: प्रस्थानस्य परंतप ॥2॥

हे परंतपा लक्ष्मणा ऐक शुकपिक कलरव ।

करती योग्य हा काल प्रस्थानास्तव आपल्या ॥2॥

प्रसुप्तसु ततो भ्राता समये प्रतिबोधित:।

जहौ निद्रां च तन्द्रां च प्रसल्तं च परिश्रमम् ॥3॥

जागृत करता बन्धूने योग्य समयी लक्ष्मण ।

निद्रेने श्रमपरिहार करुनी आळस घालवी ॥3॥

तत उत्थाय ते सर्वे स्पृष्टा नद्या: शिवं जलम् ।

पन्थानमृषिभिर्जुष्टं चित्रकूटस्य तं ययु:॥4॥

उठुनी सर्व ते स्नान करुनी शीत नदीजले ।

ऋषिमुनींनी सेवित निघती चित्रकूटपथे ॥4॥

तत: सम्प्रस्थित काले राम: सौमित्रिणा सह ।

सीतां कमलपत्राक्षीमिदं वचनमब्रवीत् ॥5॥

लक्ष्मणासह श्रीराम उपस्थित तेथ होउनी ।

कमलनयनी सीतेस ऐश्या प्रकारे बोलती ॥5॥

आदीप्तानिव वैदेहि सर्वत: पुष्पितान् नगान् ।

स्वै: पुष्पै:किंशुकान् पश्य मालिन: शिशिरात्यये ॥6॥

वैदेही फुललेल्या या पलाशवृक्षां पहा ।

स्वपुष्पांनी आवृत्त प्रज्वलित अरुणप्रभे ॥6॥

पश्य भल्लातकान् बिल्वान् नरैरनुपसेवितान् ।

फलपुष्पैरवनतान् नूनं शक्ष्याम जीवितुम् ॥7॥

वृक्ष भल्लातक बेल वाकती फलभारे पहा ।

त्या फलाहारे निश्चित करू निर्वाह आपण ॥7॥

पश्य द्रोणप्रमाणानि लम्बमानानि लक्ष्मण ।

मधूनि मध्कारीभि: सम्भृतानि नगे नगे ॥8॥

मधमाश्या वृक्षांवरती पुष्ट पोळी लक्ष्मणा।

सर्वात या मधु भरला असे द्रोण भरूनिया ॥8॥

एष क्रोशति नत्यूहस्तं शिखी प्रतिकूजति ।

रमणीये वनोद्देशे पुष्पसंस्तरसंकटे ॥9॥

इकडे चातक बोले मोर प्रत्युत्तर दे जणु ।

पुष्पवृष्टिसवे भूमी पुष्पे आच्छादित दिसे ॥9॥

मातङ्गयूथानुसृतं पक्षिसंघानुनादितम।
चित्रकूटमिमं पश्य प्रवृद्धशिखरं गिरिम ॥10॥

चित्रकूट पर्वत हा शिखर उच्च असे तया ।
हत्तींच्या झुंडी दिसती पक्षिगण गाता तसे ॥10॥

समभूमितले रम्ये द्रुमैर्बहुभिरावृते ।
पुण्ये रंस्यामहे तात चित्रकूटस्य कानने ॥11॥

समतल भूमी तात वृक्षदाटी असे जिथे ।
पवित्र स्थानी त्या चित्रकूटे राहू सुखे ॥11॥

ततस्तौ पादचारेण गच्छन्तौ सह सीतया ।

रम्यमासेदतु: शैलं चित्रकूटं मनोहरम् ॥12॥

सीतेसह दोघे बन्धु पायी चालत चालत ।

मनोरम चित्रकूटे योग्य समयी पोचती ॥12॥

तंतु पर्वतमासाद्य नानापक्षिगणायुतम् ।

बहुमूलफलं रम्यं सम्पन्नसरसोदकम् ॥13॥

नाना पक्षिगणे युक्त संपन्न फलमूले बहु ।

स्वादिष्ट जल जिथे राम वदे शैले पोचता ॥13॥

मनोज्ञोऽयं गरि: सौम्य नानाद्रुमलतायुत:।

बहुमूलफलो रम्य: स्वाजीव: प्रतिभाति मे ॥14॥

रमणीय पर्वत सौम्य विविध वृक्षलतायुत ।

फलमूल आधिक्ये सुखे निर्वाह होइल ॥14॥

मुनयश्च महात्मानो वसन्त्यस्मिन् शिलोच्चये ।

अयं वासो भवेत् तात वयमत्र वसेमहि ॥15॥

मुनि अनेक निवास करती या गिरिवरी ।

योग्य आम्हा रहाण्यास करू वास इथे आम्ही ॥15॥

इति सीता च रामश्च लक्ष्मणश्चकृताञ्जलि: ।

अभिगम्याश्रमं सर्वे वाल्मिकिमभिवादयन ॥16॥

ठरवुनि सीता राम लक्ष्मण हात जोडुनी ।

आश्रमात प्रवेशून वाल्मिकींना वंदती ॥16॥

तान महर्षि: प्रमुदित: पूजयामास धर्मवित ।

आस्यतामिति चोवाच स्वागतं तंनिवेद्य च ॥17॥

प्रसन्न महर्षि होत त्यांच्या आगमने धार्मिक ।

या स्वागत म्हणुनी करिति योग्य सत्कार ॥17॥

ततोऽब्रवीन्महाबाहुर्लक्ष्मणं लक्ष्मणाग्रज:।

संनिवेद्य यथान्यायमात्मानमृषये प्रभु: ॥18॥

परिचय महर्षींना महाबाहु करोनिया ।

देई यथायोग्य आणि लक्ष्मणास असे म्हणे ॥18॥

लक्ष्मणानय दारूणि दृढानि च वराणि च।

कुरुष्वावसथं सौम्य वासे मेऽभिरतं मन: ॥19॥

लक्ष्मणा वनातूनी काष्ठे दृढ आणुनी ।

कुटी करी निर्माण आपल्या राहण्यास्तव ॥19॥

तस्य तद् वचनं श्रुत्वा सौमित्रिर्विविधान् द्रुमान् ।

आजहार ततश्चक्रे पर्णशालामरिंदमम् ॥20॥

त्याचे वचन ऐकून शाखा वृक्षांच्या बहु।

तोडुनिया पर्णकुटी निर्माण लक्ष्मण करी ॥20॥

तां निष्ठितां बद्धकटां दृष्ट्वा रामः सुदर्शनाम् ।

शुश्रूषमाणमेकाग्रमिदं वचनमब्रवीत् ॥21॥

सुस्थिर सुरम्य ऐसी पर्णकुटी बनवुनी ।

पाहता एकचित्ते त्या म्हणे श्रीराम लक्ष्मणा ॥21॥

ऐणेयं मांसमाहृत्य शालां यक्ष्यामहे वयम् ।
कर्तव्यं वास्तुशमनं सौमित्रे चिरजीविभि: ॥22॥

गजकन्द वापरून वास्तुपूजा करोनिया ॥
दीर्घजीवनास्तव ते लक्ष्मणा आवश्यक ॥22॥

मृगं हत्वाऽऽनय क्षिप्रं लक्ष्मणेह शुभेक्षण ।
कर्तव्य: शास्त्रदृष्टदृष्टो हि विधिर्धर्ममनुस्मर ॥23॥

खोदुनी लक्ष्मणा आण गजकन्द विधीस्तव ।
आवश्यक असे शास्त्रानुसार धर्मे उचित जे ॥23॥

ऐणेयं श्रपयस्वैतच्छालां यक्ष्यामहे वयम्।

त्वर सौममुहूर्तोऽयं ध्रुवश्च दिवसो ह्ययम् ॥25॥

शिजवी तो गजकन्द ध्रुवसंज्ञक दिन असे ।

अधिष्ठाता देवतांचे पूजन करु आपण ॥25॥

स लक्ष्मण: कृष्णमृगं हत्वा मेध्यं प्रतापवान् ।

अथ चिक्षेप सौमित्रि: समिद्धे जातवेदसि ॥26॥

काळे डाग असलेले गजकंद पवित्र टाकी ।

प्रज्वलित अग्नीमध्ये लक्ष्मण नरव्याघ्र जो ॥26॥

तत तु पक्वं समाज्ञाय निष्टप्तं छिन्नशोणितम ।
लक्ष्मण: पुरुषव्याघ्रम्थ राघवमब्रवीत ॥27॥
पक्व गजकन्द रक्तविकार नाशक जाणुनी।
पुरुषसिंह श्रीरामा लक्ष्मण ऐसे म्हणतसे ॥27॥
अयं सर्व: समस्ताङ्ग: श्रुत: कृष्णमृगो मया ।
देवता देवसंकाश यजस्व कुशलो ह्यसि ॥28॥
राम: स्नात्वा तु नियतो गुणवाञ्जपकोविद:।
संग्रहेणाकरोत सर्वान मन्त्रान सत्रावसानिकान ॥29॥

गजकन्द काळे डाग ज्यावरी सर्व दोष तो।
करी दूर करा आता यजन वास्तुदेवतेचे ॥28॥
रामही गुणसंपन्न स्नान करुनी जप ।
पाळुनी नियना योग्य वास्तुयज्ञ पूर्तिस्तव ॥29॥
इष्ट्वा देवगणान् सर्वान् विवेशावसथं शुचि:।
बभूव च मनोल्हादो रामस्यामिततेजस:॥30॥
पूजनोत्तर पवित्र भावे कुटीमध्ये प्रवेशती ।
रामास अतितेजस्वी होत संतोष तेधवा ॥30॥

वैश्वदेवबलिं कृत्वा सौद्रं वैष्णवमेव च ।

वास्तुसंशमनीयानि मङ्गलानि प्रवर्तयन् ॥31॥

वैश्वदेव रुद्रयाग वैष्णवयाग करूनिया ।

मङ्गलपाठ श्रीराम वास्तुशान्तिस्तव करी ॥31॥

जपं च न्यायतः कृत्वा स्नात्वा नद्यां यथाविधि ।

पापसंशमनं रामश्चकार बलिमुत्तमम् ॥32॥

स्नान करुनि गायत्रि जप योग्य करोनीया ।

दोषशान्तिस्तव करी संपन्न बलिकर्महीं ॥32॥

वेदिस्थलविधानानि चैत्यान्यायतनानि च ।

आश्रमस्यानुरूपाणि स्थापयामास राघव:॥33॥

वेदिस्थल आयतने चैत्य अनुरूप कुटीस ।

स्थापन करी श्रीराम वास्तुशान्तिस्तव ॥33॥

तां वृक्षपर्णच्छदनां मनोज्ञां यथाप्रदेश सुकृतां निवाताम् ।

वासाय सर्वे विविशु:समेता: सभां यथा देवगणा: सुधर्माम् ॥34॥

त्या वृक्षपर्णे आच्छादित सुरम्य प्रदेशानुकूल वायुरक्षित ।

सुधर्मासभेत प्रवेशति देवलोक तसा प्रवेश तिघे कुटीत ॥34॥

सुरम्यमासाद्य तु चित्रकूटं नदीं च तां माल्यवतीं सुतीर्थाम् ।
ननन्द हृष्टो मृगपक्षिजुष्टां जहौ च दु:खं पुरविप्रवासात ॥35॥

सुरम्य येऊनि चित्रकूटे सुतीर्थ नदीपाशि मृगपक्षियुक्त माल्यवती ।
आनन्दती श्रीराम विसरती कष्ट सारे वनी दूर होति आल्यामुळे ॥35॥

इत्यार्थे श्रीमद्रामायाणे वाल्मीकीये आदिकाव्ये अयोध्याकाण्डे षटपञ्चाशत: सर्ग:॥56 ॥

अयोध्याकाण्डसर्ग 57

कथयित्वा तु दु:खार्त: सुमन्त्रेण चिरं सह ।
रामे दक्षिणकूलस्थे जगाम स्वगृहंगुह:॥1॥
जाता दक्षिणतटी राम गुह दु:खे व्याकुल ।
करी वार्ता सुमन्त्रासी जाता स्वगृहि घेउनी ॥1॥

भरद्वाजाभिगमनं प्रयागे च सभाजनम् ।

आ गिरेर्गमनं तेषां तत्रस्थैरभिलक्षितम् ॥2॥

भरद्वाजाकडे जाणे पुढे सत्कार घेउनी ।

चित्रकूटे गमन त्यांचे गुप्तचर वदती गुहा ॥2॥

अनुज्ञातः सुमन्त्रोऽथ योजयित्वा हयोत्तमम् ।

अयोध्यामेव नगरीं प्रययौ गाढदुर्मनाः॥3॥

समजता हे उत्तम अश्व रथास जोडोनिया ।

सुमन्त्र बसुनी परते अयोध्येस दुःखी मने ॥3॥

स वनानि सुगन्धीनि सरितश्च सरांसि च ।

पश्यन् यत्तो ययौ शीघ्रं ग्रामाणि नगराणि च ॥4॥

सुगन्धित वने मार्गी नद्या ग्रामेसरोवरे ।

नगरे सावध चित्ते शीघ्र जाति पहात ते ॥4॥

ततः सायान्हसमये द्वितीयेऽहनि सारस्थिः।

अयोध्यां समनुप्राप्य निरानन्दां ददर्श ह ॥5॥

शृङ्गवेरपुरातूनी लौटता दुसऱ्या दिनी ।

सायंकाळी पुरी पाही आनन्दशून्य जाहली ॥5॥

स शून्यामिव नि:स्तब्धां दृष्ट्वा परमदुर्मना: ।

सुमन्तश्चिन्तयामास शोकवेगसमाहत:॥6॥

पुरी नि:शब्द ऐसी जणु निर्मनुष्य होतसे ।

पाहुनी शोकपीडित सुमन्त्र होत चिन्तित ॥6॥

कच्चिन्नसगजा साश्वा सजना सजनाधिपा ।

रामसंतापदु:खेन दग्धा शोकाग्निना पुरी ॥7॥

रामवियोग दु:खाने गज अश्व जनाधिप ।

जन सर्व शोकाग्नीत दग्ध झाले काय की ॥7॥

इति चिन्तापर: सूतो वाजिभि: शीघ्रयायिभि:।

नगरद्वारमासाद्य त्वरित: प्रविवेश ह ॥8॥

चिन्तेत पडुनी सूत घोड्यावर शीघ्र बैसुनी ।

करी त्वरित प्रवेश नगरद्वारा अंतरी ॥8॥

सुमन्त्रभिधावन्त: शतशोऽथ सहस्रश:।

क्व राम इति पृच्छन्त: सूतमभ्यद्रवन् नरा:॥9॥

सुमन्त्राकडे शतश: धावती जन सहस्रश:।

पुसता कुठे श्रीराम धावती ते रथासवे ॥9॥

तेषां शशंस गङ्गायामहमापृच्छ राघवन्।

अनुज्ञातो निवृतोऽस्मि धार्मिकेण महात्मना ॥10॥

ते तीर्णा इति विज्ञाय बाष्पपूर्णमुखा नराः।

अहो धिगिति निःश्वस्य हा रामेति विचक्रुशुः॥11॥

सोडुनी गंगातीरी राघवास विचारुनी।

आज्ञेने महात्म्यांच्या धार्मिक परतलो पुरी ॥10॥

वृत्त ऐकुनि ते नेत्र अश्रुनी भरुनी नर।

धि:कार आमुचा वदुनी करुणे ते आक्रोशती ॥11॥

शुश्राव च वचस्तेषां वृन्दं वृन्दं च तिष्ठताम् ।

हता: स्म खलु ये नेह पश्याम इति राघवम् ॥12॥

“हाय मृत आम्हा आता दुष्प्राप्य श्रीरामदर्शन”

ऐके जनसमुदाय वदता करुणारवे ॥12॥

दानयज्ञविवाहेषु समाजेषु महत्सु च ।

न द्रक्ष्याम: पुनर्जातु धार्मिकं राममन्तरा ॥13॥

दान यज्ञ विवाही वा सामाजिक उत्सवामध्ये ।

उपस्थित जनसंमर्दी न दिसेल राम उभा ॥13॥

किं समर्थं जनस्यास्य किं प्रियं किं सुखावहम् ।

इति रामेण नगरं पित्रेव परिपालितम् ॥14॥

योग्य काय जनतेस किंवा प्रिय सुखावह ।

विचारे या जनतेचे करी पालन पित्यासम ॥14॥

वातायनगतानां च स्त्रीणामन्वंतरापणम् ।

राममेवाभितप्तानां शुश्राव परिदेवनाम् ॥15॥

मार्गावरुनि जाताना गवाक्षी येइ ऐकण्या ।

विलाप नगरनारींचा राम वियोगे दु:खित ॥15॥

स राजमार्गमध्येन सुमन्त्र: पिहिताननः।

यत्र राजा दशरथस्तदेवोपययौ गृहम् ॥16॥

आच्छादुनी मुख वस्त्रे जाता राजमार्गावरी ।

सुमन्त्र दशरथाच्या प्रवेश भवनी करी ॥16॥

सोऽवतीर्य रथाच्छीघ्रं राजवेश्म प्रविश्य च ।

कक्ष्या: सप्तनिचक्राम महाजनसमाकुला: ॥17॥

रथातुनि उतरे शीघ्र राजभवनी प्रवेशत ।

दालने सात ओलांडी भरलेली पौरजने॥17॥

हर्म्यैर्विमानै: प्रासादैरवेक्ष्यायसमागतम् ।

हाहाकारकृतानार्योरामादर्शनकर्शिता:॥18॥

तया पाहुनि प्रासादे राजभवनी ज्या स्त्रिया ।

हाहा:कार करती दु:खे रामदर्शना वंचित ॥18॥

आयतैर्विमलैर्नेत्रैरश्रुवेगपरिप्लुतै:।

अन्योन्यमभिवीक्षन्तेऽव्यक्तमार्ततरा: स्त्रिय:॥19॥

विशाल नेत्र त्यांचे अश्रुवेगे भरोनिया ।

आर्त अव्यक्तभावे त्या एकमेका न्यहाळती ॥19॥

ततो दशरथस्त्रीणां प्रासादेभ्यस्ततस्तत:।

रामशोकाभितप्तानां मन्दं शुश्राव जल्पितम् ॥20॥

श्रीराम शोके संतप्त राजा दशरथस्त्रिया ।

बोलती मंद स्वरे जे भवनी श्रवणी पडे ॥20॥

सह रामेण निर्यातो विना राममिहागत:।

सूत: किं नाम कौसल्या क्रोशन्तीं प्रतिवक्ष्यति ॥21॥

रामासहित गेलेला लौटे रामाविना पुन्हा ।

कौसल्येस आक्रंदे जी काय सांगणार सूत ॥21॥

यथा च मन्ये दुर्जीयमेव न सुकरं ध्रुवम्।

आच्छिद्य पुत्रे निर्याते कौसल्या यत्र जीवति ॥22॥

जीवन दु:खद माझे नसे सुकर नाशही।

त्यागुनी पुत्र जाता कौसल्या तरि जीवित ॥22॥

सत्यरूपं तु तद् वाक्यं राजस्त्रीणां निशामयन्।

प्रदीप्त इव शोकेन विवेश सहसा गृहम् ॥23॥

राण्यांचे वाक्य हे सत्य सुमन्त्र ऐकोनिया।

शोकदग्ध प्रवेशीत राजभवनामध्ये ॥23॥

स प्रविश्याष्टमीं कक्ष्यां राजानं दिनमातुरम् ।

पुत्रशोकपरियूनमपश्यत पाण्डुरे गृहे ॥24॥

प्रवेशी आठव्या कक्षी श्वेतभवनी नृपा ।

पाही दीन पुत्रशोके मलिन आतुर जो असे ॥24॥

अभिगम्य तमासीनं राजानमिभावाद्य च ।

सुमन्त्रो रामवचनं यथोक्तं प्रत्यवेदयत ॥25॥

आसनस्थ महाराजां सुमन्त्र प्रणाम करी ।

आणि वचन रामाचे यथोक्त सांगे तया ॥25॥

स तूष्णीमेव तच्छ्रुत्वा राजा विद्रुतमानस:।

मूर्च्छितो न्यपदत भूमौ रामशोकाभिपीडित: ॥26॥

नि:शब्द राहुनि बोल ऐकुनी हदय व्याकुळ ।

श्रीरामशोक पीडित मूर्च्छित भूमीवरी पडे ॥26॥

ततोऽन्त:पुरमाविद्धं मूर्च्छिते पृथिवीपतौ ।

उच्छ्रित्य बाहू चुक्रोश नृपतौ पतिते क्षितौ ॥27॥

होता मूर्च्छित महाराज अन्त:पुर हो दु:खित ।

भूमीवरी पडता ते उंचावुनि हात क्रन्दती ॥27॥

सुमित्रया तु सहिता कौसल्या पतितं पतिम् ।

उत्थापयामास तदा वचनं चेदमब्रवीत् ॥28॥

सुमित्रेच्या मदतीने पडलेल्या उठवुनी ।

पतीस कौसल्या आणि वचनास अश्या म्हणे ॥28॥

इमं तस्य महाभाग दूतं दुष्करकारिण:।

वनवासादनुप्राप्तं कस्मानं प्रतिभाषसे ॥29॥

महाराज सुमन्त्र हे रामाचे दूत आणती ।

वनातुनि संदेश तो का न घेता आपण ॥29॥

अद्येममनयं कृत्वा व्यपत्रपसि राघव ॥

उत्तिष्ठ सुकृतं तेऽस्तु शोके न स्यात् सहायता ॥30॥

राघवावरि अन्याय करुनी जरि लज्जित ।

उठा सत्यपालन पुण्य शोक आता निष्फळ ॥30॥

देव यस्या भयाद् रामं नानुपृच्छसि सारथिम् ।

नेह तिष्ठति कैकेयी विश्रब्धं प्रतिभाष्यताम ॥31॥

भये जिच्या पुसता ना सूतास देवा तुम्ही ।

कैकेयी नसे येथे बोला निर्भय होउनी ॥31॥

सा तथोक्त्वा महाराज कौसल्या शोकलालसा।

धरण्यां निपपाताशु बाष्पविप्लुतभाषिणी ॥32॥

बोलता नृपा ऐसे कौसल्या हो सद्गदित ।

शोकव्याकुल होवोनी पडे ती धरणीवरी ॥32॥

विलपन्ती तथा दृष्ट्वा कौसल्यां पतितां भुवि ।

पतिं चावेक्ष्य ता: सर्वा: समन्ताद् रुरुदु: स्त्रिय: ॥33॥

रुदन करता कौसल्या पतिसवे भूमीवरी ।

पडे पाहुनि त्या सर्व स्त्रियाही रडु लागती ॥33॥

ततस्तमन्त:पुरनादमुत्थितं समीक्ष्य वृद्धास्तरुणाश्च मानवा:।

स्त्रियश्च सर्वा रुरुदु: समन्तत: पुरं तदासीत् पुनरेव संकुलम् ॥34॥

अन्त:पुरातुनि येत असे जो आर्तनाद ऐकोनी आबालवृद्धपुरुष ।

त्यांसवे रडू लागती सर्व स्त्रियाही नगरही शोकाकुल होतसे ॥34

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकांडे सप्तपञ्चाश: सर्ग:॥57॥

अयोध्याकाण्ड सर्ग 58

प्रत्याश्वस्तो यदा राजा मोहात प्रत्यागतस्मृतिः।

तदाजुहाय तं सूतं रामवृत्तान्तकारणात ॥1॥

येता शुद्धीवरी राजा मूर्च्छा होउनि दूर तो ।

बोलावी सुमन्तास रामवृत्तान्त जाणण्या ॥1॥

तदा सूतो महाराजं कृताञ्जलिरुपस्थित:।
राममेवानुशोचन्तं दु:खशोकसमन्वितम् ॥2॥
शोक चिंतामग्न दु:ख शोकात मग्न त्या ।
महाराजांपाशी सुमन्त्र हात जोडुनिया उभा॥2॥
वृद्धं परमसंतप्तं नवग्रहमिव द्विपम् ।
विनि:श्वसन्तं ध्यायन्तमस्वस्थमिव कुञ्जरम् ॥3॥
राजा तु रजसा सूतं ध्वस्ताङ्गं समुपस्थितम् ।
अश्रुपूर्णमुखं दीनमुवाच परमार्तवत् ॥4॥

वनी पकडला जाता गजराज संतप्त जसा ।
दीर्घ श्वास घेत राजा मग्न श्रीरामचिंतनी ॥3॥
मलिन देह सुता पाही दीन अश्रु नेत्री जया ।
आर्त अत्यन्त होऊनी नृप दु:खे पुसे तया ॥4॥
क्व नि वत्स्यति धर्मात्मा वृक्षमूलमुपाश्रित:।
सोऽत्यन्तसुखित: सूत: किमशिष्यति राघव: ॥5॥
कुठे राहील धर्मात्मा वनी वृक्ष उपाश्रित ।
लाडात वाढलेला तो काय खाई सुता तिथे ॥5॥

दु:खं सुमन्त्र शयनोचित दु:खस्यानुचितो:।

भूमिपालात्मजो भूमौ शेते कथमनाथवत ॥6॥

दु:ख भोगण्या न जो योग्य अतिदु:खात तो असे ।

भूमी पालन करि जो भूमीवरी कसा निजे ॥6॥

यं यान्तमनुयान्ति स्म पदारथकुञ्जरा:।

स वत्स्यति कथं रामो विजनं वनमाश्रित:॥7॥

जाता पुढे जयामागे रथ पदाति गज सारथी ।

निर्जन वनी तो राम निवास करील कसा ॥7॥

व्यालैर्मृगैराचरितं कृष्णसर्प्निषेवितम् ।

कथं कुमारौ वैदेह्या सार्धं वनमुपाश्रितौ ॥8॥

व्याघ्र सिंह पशु हिंस्र सर्प भीषण राहती ।

सीतेसह कसे तेथे कुमार दोघे राहती ॥8॥

सुकुमार्या तपस्विन्या सुमन्त्र सह सीतया ।

राजपुत्रौ कथं पादैरवरुह्य रथाद् गतौ ॥9॥

तपस्विनी सुकुमारी सीतेसह राम लक्ष्मण ।

रथातुन उतरुन खाली सुमन्त्रा चालले कसे ॥9॥

सिद्धार्थ: खलु सूत त्वं येन दृष्टौ ममात्मजौ ।

वनान्तं प्रविशन्तौ तावश्विनाविव मन्दरम् ॥10॥

सुमन्त्रा धन्य तू पाही दोन पुत्रां प्रवेशिता ।

अश्विनीकुमार जसे मन्दराचल वनी ॥10॥

किमुवाच वचो राम: किमुवाच च लक्ष्मण:।

सुमन्त्र वनमासाद्य किमुवाच च मैथिली ॥11॥

पोचता वनी सुमन्त्रा श्रीराम काय बोलला।

लक्ष्मण,मैथिली यांनी काय सांगितले तिथे ॥11॥

आसितं शयितं भुक्तं सूत रामस्य कीर्तय।

जीविष्याम्ययमेतेन ययातिरिव साधुषु ॥12॥

बसणे,झोपणे खाणे रामाचे सर्व ऐकण्या ।

ऐकून तव मुखे पुण्य जीवित मी सुखपूर्वक ।

राहीन ययाति जैसा साधुपुरुष संगती ॥12॥

इति सुतो नरेन्द्रेण चोदित:सज्जमानया ।

उवाच वाचा राजानं स बाष्पपरिबद्धया ॥13॥

महाराज पुसता ऐसे अश्रुगद्गद वाणिने ।

सुमन्त्र सारथी त्यांना वृत्तान्त सांगे असा ॥13॥

अब्रवीन्मे महाराज धर्ममेवानुपालयन् ।

अञ्जलिं राघवः कृत्वा शिरसाभिप्रणम्य च ॥14॥

सूत मद्वचनात् तस्य तातस्य विदितात्मनः।

शिरसा वन्दनीयस्य वन्द्यौ पादौ महात्मनः॥15॥

सर्वमन्तःपुरं वाच्यं सूत मद्रचनात् त्वया ।

आरोग्यमविशेषेण यथार्हमभिवादनम् ॥16॥

धर्मपालन करुनी कृताञ्जलि मस्तके ।

वंदुनी वदति श्रीराम सूता सांग पित्या मम ॥14॥

वन्दनीय महात्मा जो चरणा दोन्ही वंदितो।

तसेच सर्व मातांना अन्त:पुरि नमितो असे ॥15॥

मम आरोग्य समाचार देइ मातांना मम ।

यथोचित नमस्कार माझा सांगसि तू तयां ॥16॥

माता च मम कौसल्या कुशलं चाभिवादनम् ।

अप्रमादं च वक्तव्या ब्रूयाश्चैनामिदं वच:॥17॥

धर्मनित्या यथाकालमग्न्यगारपरा भव ।

देवि देवस्य पादौ च देववत परिपालय ॥18॥

कौसल्या मम मातेस प्रणाम कुशल सांगुनी ।

सांग मी धर्मपालन सावधान करीतसे ॥17॥

धर्मपालन करुनी अग्निहोत्र सेवन तसे ।

महाराजा देव मानी सेवा चरणांची करी ॥18॥

अभिमानं च मानं च त्यक्त्वा वर्तस्व मातृषु ।

अनुराजानमार्यां च कैकेयीमम्ब कारय ॥19॥

मान अभिमान सोडून समान वर्तन करी।

मातां सर्व तसा कैकेयी तिचाही सत्कार करी ॥19॥

कुमारे भरते वृत्तिर्वर्तितव्या च राजवत ।

अप्यज्येष्ठा हि राजानो राजधर्ममनुस्मर ॥20॥

भरताशी राजोचित वर्ते ज्येष्ठ नसे जरी ।

राजा आदरणीय तत्त्वा अनुसरूनि या ॥20॥

भरत: कुशलं वाच्यो वाच्यो मद्रचनेन च ।

सर्वास्वेव यथाब्यायं वृत्तिं वर्तस्व मातृषु ॥21॥

मम कुशल सांगूनी भरता माझा निरोप दे ।

सर्व मातांसवे करी न्यायोचित वर्तन ॥21॥

वक्तव्यश्च महाबाहुरिक्ष्वाकुकुलनन्दन:।

पितरं यौवराज्यस्थो राज्यस्थमनुपालय ॥22॥

सांगणे हेहि भरता इक्ष्वाकुकुलनन्दना ।

युवराजपदि अभिषिक्त पित्या रक्षुनि पूजिणे ॥22॥

अतिक्रान्तवया राजा ना स्मैन व्यपरोरुध:।

कुमारराज्ये जीवस्य तस्यैवाज्ञाप्रवर्तनात ॥23॥

विरोध न करी त्यांना वृद्ध झाले म्हणूनिया ।

युवराजपदा आज्ञा पाळुनि त्यांची शोभवी ॥23॥

अब्रवीच्चापि मां भूयो भृशमश्रूणि वर्तयन् ।

मातेव माम माता ते द्रष्टव्या पुत्रगर्धिनी ॥24॥

इत्येव मा महाबाहुब्रुवन्नेव महायशा:।

रामो राजीवपत्राक्षो भृशमश्रूण्यवर्तयत ॥25॥

अश्रुपूर्ण नेत्रे त्यांनी निरोप भरता दिला ।

मम मातेस सांभाळी मातेसम आपुल्या ॥24॥

मज सांगुनिया ऐसे महाबाहु महायश ।

कमलनयन श्रीराम अश्रुवर्षा करु लागती ॥25॥

लक्ष्मणस्तु सुसंक्रुद्धो नि:श्वसन् वाकयमब्रवीत ।

केनायमपराधेन राजपुत्रो विवासित:॥26॥

म्हणे लक्ष्मण संकृद्ध दीर्घ श्वास घेउनी ।

अपराधे कोणत्या केले श्रीरामा निर्वासित ॥26॥

राज्ञा तु खलु कैकेय्या लघु चाश्रुत्य शासनम् ।

कृतं कार्यमकार्यं वा वयं येनाभिपीडिता:॥27॥

पूर्ण करण्या आदेश कैकेयीचा करती त्वरा ।

योग्यायोग्य असो आम्हा कष्ट लागति भोगण्या ॥27॥

यदि प्रताजितो रामो लोभकारणकारितम।

वरदाननिमित्तं वा सर्वथा सुष्कृतं कृतम ॥28॥

कैकेयी लोभ अथवा पितृवरदान कारण ।

घडे जे पाप असे ते मम निश्चित हे मत ॥28॥

इदं तावत यथाकाममीश्वरस्य कृते कृतम ।

रामस्य तु परित्यागे न हेतुमुपलक्षये ॥29॥

ईश्वरेच्छा स्वेच्छा वा कोणत्याही कारणे ।

परित्याग रामाचा अनुचित मज वाटतो ॥29॥

असमीक्ष्य समारब्धं विरुद्धं बुद्धिलाघवात ।

जनयिष्यति संक्रोशं राघवस्य विवसनम् ॥30॥

उचित अनुचित किंवा बुद्धि लाघव कारणे ।

रामा वनवास कार्य निन्दा दु:ख पात्र असे ॥30॥

अहं तावन्महाराजे पितत्वं नोपलक्षये ।

भ्राता भर्ता च बंधुश्च पिता च मम राघव: ॥31॥

त्यामुळे महाराजांना पिता मी नच मानतो ।

बन्धु,स्वामी पिता सर्व श्रीरामच मज केवळ ॥31॥

सर्वलोकप्रियं त्यक्त्वा सर्वलोकहिते रतम् ।

सर्वलोकोऽनुरज्येत कथं चानेन कर्मणा ॥32॥

लोकहित तत्पर जो लोकप्रिय सर्व त्यागुनी ।

अप्रिय सर्व लोकांस आवडेल कृत्य कसे ॥32॥

सर्वप्रजाभिरामं हि रामं प्रव्रज्य धार्मिकम् ।

सर्वलोकविरोधेन कथं राजा भविष्यति ॥33॥

सर्व प्रजेचा अभिराम त्यागुनी श्रीराम धार्मिक ।

विरोधात सर्वांच्या कैसे राजा राहति ते ॥33॥

जानकी तु महाराज नि:श्वसन्ती तपस्विनी ।

भूतोपहतचित्तेव विष्ठिता विस्मृता स्थिता ॥34॥

जानकी ती महाराज दीर्घ श्वास घेउनिया ।

भूतासम स्मृतिहीन उभी स्तब्ध तपस्विनी ॥34॥

अदृष्टपूर्वव्यसना राजपुत्रो यशस्विनी ।

तेन दु:खेन रुदती नैव मां किंचिदब्रवीत ॥35॥

यशस्विनि राजकन्या अपरिचित संकटा अश्या ।

दु:खाने रडे बोलाया शक्य मज नसे तिला ॥35॥

उदीक्षमाणा भर्तारं मुखेन परिशुष्यता ।

मुमोच सहसा बाष्पं प्रयान्तमुपवीक्ष्य सा ॥36॥

पहाता परत येण्या मी निघता पतिकडे पाहुन ।

मूक राहुनिया लागे करण्या अश्रुपात ती ॥36॥

तथैव रामोऽश्रुमुख: कृताञ्जलि: स्थितोऽब्रवील्लक्ष्मणबाहुपालित:।

तथैव सीता रुदती तपस्विनी निरीक्षते राजरथं तथैव माम् ॥37॥

अशा प्रकारे श्रीराम अश्रुमुख जोडूनि हात सीता मनस्विनी ।

पहातसे करीत रूदन तीही रथाकडे या तर कधी मजकडे ॥37॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डेऽष्टपञ्चाश: सर्ग: ॥58॥

अयोध्याकाण्ड सर्ग 59

मम त्वश्वा निवृत्तस्य न प्रावर्तन्त वर्तनि ।
उष्णमश्रु विमुञ्चन्तो रामे सम्प्रस्थिते वनम् ॥1॥
उभाभ्यां राजपुत्राभ्यामथ कृत्वाहमञ्जलिम् ।
प्रस्थितो रथमास्थाय तदु:खमपि धारयन् ॥2॥

दोन्ही राजकुमारांना नमिले हात जोडुनी ।
वियोगदु:खित मने रथारूढ होउनि प्रस्थित ॥1॥
घोडेही मम निघताना ढाळती अश्रु उष्ण ते ।
चालती रस्त्यावरुनी परि दु:खी मनात ते ॥2॥
गुहेन सार्धं तत्रैव स्थितोऽस्मि दिवसान् बहून् ।
आशया यदि मां राम: पुन: शब्दापयेदिति ॥3॥
राहिलो गुहासह मी आशेने या दिन बहु ।
श्रीराम पुन्हा मजला बोलवतील कदाचित ॥3॥

विषये ते महाराज महाव्यसनकर्शिता: ।

अपि वृक्षा: परिम्लाना: सपुष्पाङ्करकोरका:॥4॥

वृक्षही अपुल्या राज्ये संकटे या होती कृश ।

कळ्या,अंकुर,पुष्पेही जाती कोमेजुन तशी ॥4॥

उपतप्तोदका नद्य:पल्वलानि सरांसि च ।

परिशुष्कपलाशानि वनान्युपवनानि च ॥5॥

नद्यां सरोवरे छोटी मोठी उष्णोदके युत ।

वृक्षावर शुष्क पर्णे वना उपवना मधे ॥5॥

न च सर्पन्ति सत्वानि व्याला न प्रचरन्ति च ।

रामशोकाभिभूतं तन्निष्कूजमभवद् वनम् ॥6॥

जीव जन्तु वनातील सर्पही अजगरासम ।

खाण्यास्तवहि हालती ना वन नीरव होतसे ।

श्रीराम गमने शोक करती प्राणि सर्वही ॥6॥

लीनपुष्करपत्राश्च नद्यश्च कलुषोदका:।

संतप्तपद्मा: पद्मिन्यो लीनमीन्विहंगमा: ॥7॥

मलिन नद्यांचे पाणी कमलपत्रे गळूनिया।

सरोवरी कमल शुष्क मत्स्य पक्षीहि नष्ट ते ॥7॥

जलजानि च पुष्पाणि माल्यानि स्थलजानि च ।

नातिभान्त्यल्पगन्धीनि फलानि च यथापुरम् ॥8॥

जलात उत्पन्न पुष्पे जमिनीवरची तशी ।

सुगन्ध अल्प त्यांचा फळेहि न पूर्ववत ॥8॥

अत्रोद्यानानि शून्यानि प्रलीनविहगानि च ।

न चाभिरामानारामान् पश्यामि मनुजर्षभ ॥9॥

उद्याने शून्य अयोध्येत पक्षिही नष्टचि जणु ।

बगिचेही न येथील मनोहर पूर्विसारखे ॥9॥

प्रविशन्तमयोध्यायां न कश्चिदभिनन्दति ।

नरा राममपश्यन्तो नि:श्वसन्ति मुहुर्मुहु: ॥10॥

प्रवेशित अयोध्येत आनन्दी कोणि होत ना ।

दु:खे दीर्घ श्वास राम न दिसे पाहुनी ॥10॥

देव राजरथं दृष्ट्वा विना राममिहागतम् ।

दूरादश्रुमुख: सर्वो राजमार्गे गतो जन: ॥11॥

रामाशिवाय आलेला रथ दुरुनीच पाहुनी ।

अश्रुपात लोक सर्व दु:खाने करु लागती ॥11॥

हर्मैर्विमानै: प्रासादैरवेक्ष्य रथमागतम् ।

हाहाकारकृता नार्यो रामादर्शनकर्शिता: ॥12॥

गवाक्षातुनि प्रासादी नारी बैसुनि पाहती ।

रथ रामाविन दिसता हाहाकार करु लागती ॥12॥

आयतैर्विमलैर्नेर श्रुवेगरिप्लुतै:।

अन्योन्यमभिवीक्षन्तेऽव्यक्तमार्ततरा: स्त्रिय: ॥13॥

अश्रुपात नेत्रातुनि वेगे तयांच्या होतसे ।

आर्त भावे परस्परां एकमेका न्यहाळती ॥13॥

नामित्राणां न मित्राणामदासीनजनस्य च ।

अहमार्ततया कंचिद् विशेषं नोपलक्षये ॥14॥

समान दु:खित सारे शत्रु,मित्र ,परिचित ।

कमी न दिसली मजला आर्तता कुणाचिही ॥14॥

अप्रहृष्टमनुष्या च दीननागतुरंगमा ।

आर्तस्वरपरिम्लाना विनि:श्वसितनि:स्वना ॥15॥

निरानन्दा महाराज रामप्रव्राजनातुरा ।

कौसल्या पुत्रहीनेव अयोध्या प्रतिभाति मे ॥16॥

जन अयोध्यावासी अश्व गजही खिन्न ते ।

महाराज पुरी सर्व आर्तनादे उदास ती ॥15॥

दीर्घ श्वासच उच्छ्वास नगरीचा रामाविना ।

कौसल्येसम भासे ती वियोगे दु:खी मज ॥16॥

सूतस्य वचनं श्रुत्वा वाचा परमदीनया ।

बाष्पोपहतया सूतमिदं वचनमब्रवीत ॥17॥

सुमन्त्राच्या वचना ऐकुनी अश्रुगद्गद ।

परमदीन वाणीने महाराज म्हणती असे ॥17॥

कैकेय्या विनियुक्तेन पापानिजबभावया ।

मया न मन्त्रकुशलैर्वृद्धैः सह समर्थितम् ॥18॥

वचनात कैकेयीच्या पापिणीच्या मी येउनी ।

परामर्श न मी केला वृद्ध कुशल जनांसह ॥18॥

न सुहृद्भिर्न चामात्यैर्मन्त्रयित्वा सनैगमैः।

मयायमर्थः सम्मोहात स्त्रीहेतोः सहसा कृतः॥19॥

अमात्य,वेदवेत्ते केले यां न विचारता ।

स्त्रीइच्छेस्तव मोहे अनर्थमय कार्य मी ॥19॥

भवितव्यतया नूनमिदं वा व्यसनं महत ।

कुलस्यास्य विनाशाय प्राप्तं सूत यदृच्छया ॥20॥

सुमन्त्रा जणु इच्छेने कुला विनाशकारक ।

विपत्ति निश्चित येत अकस्मात आम्हापुढे ॥20॥

सूत यद्यस्ति ते किञ्चिन्मयापि सुकृतं कृतम ।

त्वं प्रापयाशु मां रामं प्राणा: संत्वरयन्ति माम ॥21॥

सूता तुजवरी किंचित असतील उपकार मम ।

शीघ्र रामाकडे नेई दर्शना प्राण व्याकुळ ॥21॥

यद्यद्यापि ममैवाज्ञा निवर्तयतु राघवम् ।

न शक्ष्यामि विना रामं मुहूर्तमपि जीवितुम् ॥22॥

आजही ममाज्ञा चाले तर रामा वनातुनि ।

परत आण अशक्य त्याच्याविण जगणे मज ॥22॥

अथवापि महाबाहुर्गतो दूरं भविष्यति ।

मामेव रथमारोप्य शीघ्रं रामाय दर्शय ॥23॥

अतिदूर महाबाहू असेल गेलेला तर ।

घालूनि रथी मजला शीघ्र रामास दाखव ॥23॥

व्रुत्तदंष्ट्रो महेष्वास: क्वासौ लक्ष्मणपूर्वज ।

यदि जीवानि साध्वेनं पश्येयं सीतया सह ॥24॥

कुन्दकळया ज्याचे दंत कुठे लक्ष्मणबंधु तो।

महारथि सीतेसह पाहीन तरि जगेन मी ॥24॥

लोहिताक्षं महाबाहुमामुक्तमणिकुण्डलम् ।

रामं यदि न पश्येयं गमिष्यामि यमक्षयम् ॥25॥

लोहिताक्ष महाबाहु मणि कुण्डल धारण ।

नच पाहता त्याला स्वर्गलोकी मी जाइन ॥25॥

अतो नु किं दु:खतरं योऽहमिक्ष्वाकुनन्दनम् ।

इमामचस्थामापन्नो नेह पश्यामि राघवम् ॥26॥

मरणासन्न अवस्थेत कोणते दु:ख याहुनी ।

इक्ष्वाकुनन्दन रामा पाहू न शकतो इथे ॥26॥

हा राम रामानुज हा हा वैदेहि तपस्विनि ।

न मां जानीत दु:खेन म्रियमाणमनाथवत् ॥27॥

हा रामा हा लक्ष्मणा हा वैदेहि तपस्विनी ।

जाणता न तुम्ही कैसा मरतो दु:खे अनाथ मी ॥27॥

स तेन राजा दु:खेन भृशमर्पितचेतन:।

अवगाढ: सुदुष्पारं शोकसागरमब्रवीत ॥28॥

अचेतन होत राजा दु:खे शोकसागरी ।

दुर्लंघ्य करुनी पार बोले धीर धरूनिया ॥28॥

रामशोकमहावेग सीताविरहपारग:।

श्वसितोर्मिमहावर्तो बाष्पवेगजलाविल:॥29॥

बाहविक्षेपमीनोऽसौ विक्रन्दितमहास्वन:।

प्रकीर्णकेशशैवाल: कैकेयीवडवामुख:॥30॥

ममाश्रुवेगप्रभव: कुब्जावाक्यमहाग्रह:।

वरवेलो नृशंसाया रामप्रव्राजनायत:॥31॥

यस्मिन् बत निमग्नोऽहं कौसल्ये राघवं विना ।

दुस्तरो जीवता देवि मयायं शोकसागर:॥32॥

श्रीरामाविण कौसल्ये निमग्न ज्या शोकसागरी ।

रामशोक महावेग सीता विरह टोक दुजे ॥29॥

दीर्घश्वास लाटा त्याच्या अश्रुपात मलिन जल ।

मम हस्त हालचाल मासोळींचा विलास तो ॥30।

मम करुणक्रंदन गर्जना त्याची महान ।

विस्कळित केस शैवाल कैकेयी वडवानल ॥31॥

उत्पत्तिकारण मम अश्रू कुब्जा वाक्य महाग्रह ।

कैकेयीवर तट दोन सागरी न जगेन मी ॥32॥

अशोभनं योऽहमाद्य राघवं दिदृक्षमाणो न लभे सलक्ष्मणम् ।

इतीव राजा विलपन् महायशा: पपात तूर्णं शयने स मुर्च्छित:॥33॥

पाहू न शकतो लक्ष्मणासह रामा असेल मोठ्या पापाचे मम फल ।

अश्या प्रकारे करिता विलाप होऊनि मूर्च्छित पडे राजा शय्येवरी ॥33॥

इति विलपति पार्थिवे प्रणष्टे करुणतरं द्विगुणं च रामहेतो:।

वचनमनुनिशम्य तस्य देवी भयमगत पुनरेव राममाता ॥34॥

विलाप करित रामास्तव महाराज पाहुनी पडता पुन्हा मूर्च्छित ।

करुणवचन बोलले जे ऐकुनि कौसल्या भयभीत होतसे पुन्हा ॥34॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे एकोनषष्टितम: सर्ग:॥59॥

अयोध्याकाण्ड सर्ग 60

ततो भूतोपसृष्टेव वेपमाना पुन:पुन:।
धरण्यां गतसत्त्वेव कौसल्या सूतमब्रवीत ॥1॥

भूत अंगात यावे कौसल्या कापत तशी ।
बेशुद्ध हो धराशायी वदे सूत तिला असे ॥1॥

नय मां यत्र काकुत्स्थ: सीता यत्र च लक्ष्मण:।

तान् विना क्षणमप्यद्य जीवितुं नोत्सहे ह्ययम् ॥2॥

श्रीराम.लक्ष्मण सीता जिथे सूता तिथे मला ।

ने मज तयांवाचूनि जीवित अशक्य राहणे ॥2॥

निवर्तय रथं शीघ्रं दण्डकान् नय मामपि।

अथ तान् नानुगच्छामि गमिष्यामि यमक्षयम् ॥3॥

आणवुनी रथ शीघ्र वनी दंडक ने मज ।

न होता तसे यात्रा यमलोकि मम निश्चित ॥3॥

बाष्पवेगोपहतया स वाचा सज्जमानया ।

इदमाश्वासयन् देवीं सूत: प्राञ्जलिरब्रवीत ॥4॥

ऐकुनी तिचे बोल सुमन्त्र हात जोडुनी ।

अश्रुनी रुद्ध कंठाने गद्गद होउनि म्हणे ॥4॥

त्यज शोकं च मोहं च सम्भ्रमं दु:खजं तथा ।

व्यवधूय च संतापं वने वत्स्यति राघव:॥5॥

सोडा शोक महाराणी दु:खजन्य विकलता ।

वने राहति श्रीराम संताप विसरोनिया ॥5॥

लक्ष्मणश्चापि रामस्य पादौ परिचरन् वने ।

आराधयति धर्मज्ञ: परलोकं जितेन्द्रिय:॥6॥

जितेन्द्रिय लक्ष्मणही वनी करुनि रामाची ।

चरणसेवा धर्मज्ञ धन्य परलोक अर्जित ॥6॥

विजनेऽपि वने सीता वासं प्राप्य गृहेष्विव ।

विस्रम्भं लभतेऽभीता रामे विन्यस्तमानसा ॥7॥

श्रीरामार्पण असल्याने सीता वनी असोनिया ।

प्रसन्न प्रेमे राही जणु स्वगृहि निर्भय ॥7॥

नास्या दैन्यं कृतं किंचित ससूक्ष्ममपि लक्ष्यते ।

उचितेव प्रवासानां वैदेही प्रतिभाति मे ॥8॥

किंचितहि दु:खी नाही वनी राहण्यामुळे ।

वाटते जणु अभ्यस्त राहण्या परदेशि ती ॥8॥

नगरोपवनं गत्वा यथा स्म रमते परा ।

तथैव रमते सीता निर्जनेषु वनेष्वपि ॥9॥

उपवनी नगरात रमत होती जशी इथे ।

तशीच रमे सीता निर्जन वनातही ॥9॥

नालेय रमते सीताबालचंद्रनिभानना ।

रामा रामे ह्यदीनात्मा विजनेऽपि वने सती ॥10॥

श्रीरामासह सीता प्रसन्न बालिकेसम ।

पूर्णचंद्रमुखी साध्वी रमली निर्जन वनी ॥10॥

तद्गतं हृदयं यस्यास्तदधीनं च जीवितम् ।

अयोध्या हि भवेदस्या रामहीना तथा वनम् ॥11॥

हदयी श्रीराम जिच्या श्रीरामाधीन जीवन ।

रामाविण अयोध्याही वाटेल तिज ते वन॥11॥

परिपृच्छति वैदेही ग्रामांश्च नगराणि च ।

गतिं दृष्ट्वा नदीनां च पादपान् विविधानपि ॥12॥

दिसती गावे नगरे नद्या वृक्षहि वेगळे ।

पुसे परिचय पाहूनी त्यांचा विदेहनन्दिनी ॥12॥

रामं वा लक्ष्मणं वापि दृष्ट्वा जानाति जानकी ।

अयोध्या क्रोशमाने तु विहारमिव साश्रिता ॥13॥

श्रीरामा नि लक्ष्मणाला पाहुनी जवळी तिला ।

वाटते अयोध्येजवळी फिरत जणु ती असे ॥13॥

इदमेव स्मराम्यस्या: ससैवोपजल्पितम् ।

कैकेयीसंश्रितं जल्पं नेदानी प्रतिभाति माम् ॥14॥

येवढेच स्मरे मजला सीता कैकेयिबद्दल ।

बोलली असेल काही स्मरते नच ते मला ॥14॥

ध्वंसयित्वा तु तद् वाक्यं प्रमादात् पर्युपस्थितम् ।

लादनं वचनं सूतो देव्या मधुरमब्रवीत् ॥15॥

प्रमाद जाणुनि बोल कैकेयीसंबधि टाळुनी ।

आल्हादकारी तिजला बोल मधु बोले सुत ॥15॥

अध्वना वातवेगेन सम्भ्रमेणातपेन च ।

न विगच्छति वैदेह्याश्चंद्रांशुसदृशी प्रभा ॥16॥

चालण्याचे श्रम पथी ताप वायुवेग भय ।

जानकीची चंद्रकान्ती शकती न सुकविण्या ॥16॥

सदृशं शतपत्रस्य पूर्णचंद्रोपमप्रभम् ।

वदनं तद् वदन्याया वैदेह्या न विकम्पते ॥17॥

कमलासम उत्फुल्ल कान्तिमान चंद्रासम ।

जानकीमुख आनन्दी मलिन होत नसे कधी ॥17॥

अलक्तरसरक्ताभावलक्तरसवर्जितौ ।

अद्यापि चरणौ तस्या: पद्मकोशसमप्रभौ ॥18॥

अळत्याविन सीतेचे चरण कमलासम ।

अजुनी दिसती लाल अळता लावल्यासम ॥18॥

नूपुरोत्कृष्टलीलेव खेलं गच्छति भामिनी ।

इदानीमपि वैदेही तद्रागान्यस्तभूषणा ॥19॥

रामानुरागे जानकी अलंकारित नूपुरे ।

लाजवी पदलालित्ये कलनादा हंसाचिया ॥19॥

गजं वीक्ष्य सिंह वा व्याघ्रं वा वनमाश्रिता ।

नाहारयति संत्रासं बाहू रामस्य संश्रिता ॥20॥

बाहुबलावर विश्वासे रामाच्या वनि राहता ।

गज सिंह अथवा व्याघ्र पाहुनी भय ना करी ॥20॥

न शोच्यास्ते न चात्मा ते शोच्यो नापि जनाधिप:।

इदं हि चरितं लोके प्रतिष्ठास्यति शाश्वतम् ॥21॥

न शोक त्यांच्याविषयी अथवा महाराजांप्रति ।

चरित्र शुभ रामाचे प्रतिष्ठित जनि राहिल ॥21॥

विधूयं शोकं परिहृष्टमानसा महर्षियाते पथि सुव्यवस्थिता:।

वने रता वन्यफलाशना: पितु: शुभां प्रतिज्ञा प्रतिपालयन्ति ते ॥22॥

सोडुन शोक आनंदित मने महर्षिमार्गे स्थित दृढतापूर्वक ।

वनात राहून वन्य फळे खात पितृप्रतिज्ञा पालन करीत तिघे ॥22॥

तथापि सूतेन सुयुक्तवादिना निवार्यमाणा सुतशोककर्शिता ।

न चैव देवी विरराम कूजितात् प्रियेति पुत्रेति च राघवेतिच ॥23॥

बोलुनि ऐसे सूत शोकमग्न कौसल्येची चिंता रुदन कमी करीतसे ।

तरी न देवी सोडी न शोक हा पुत्र हा राम ऐसे बोलुनी ॥23॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे षष्टितम: सर्ग: ॥60॥

अयोध्याकाण्ड सर्ग 61

वनं गते धर्मरते रामे रमयतां वरे ।

कौसल्या रुदती चार्ता भर्तारमब्रवीत ॥1॥

प्रजेचा आनंदनिधान राम श्रेष्ठ जाता वनी ।

करीत रुदना आर्त भ्रात्यास कौसल्या म्हणे ॥1॥

यद्यपि त्रिषु लोकेषु प्रथितं ते महद् यश:।

सानुक्रोशो वदान्यश्च प्रियवादी च राघव:॥2॥

जरी प्रसिद्ध आपले महायश लोकी तिन्ही।

लोकी प्रसिद्ध श्रीराम दयाळु प्रिय भाषक ॥2॥

कथं नरवरश्रेष्ठ पुत्रौ तौ सह सीतया।

दु:खितौ सुखसंवृद्धौ वने दु:खं सहिष्यत ॥3॥

सीतेसह आपुले पुत्र वाढलेले सुखामध्ये ।

कसे नरवरश्रेष्ठ सोसतील कष्ट वनी ॥3॥

सा नूनं तरुणी श्यामा सुकुमारी सुखोचिता ।

कथमुष्णं च शीतं च मैथिली विसहिष्यते ॥4॥

सुकुमार तरुणी सीता वाढलेली सुखामध्ये ।

शीत उष्ण वनी दु:ख कसे सहन करेल ती ॥4॥

भूक्त्वाशनं विधालाक्षी सूपदंशान्वितम् शुभम् ।

वन्यं नैवारमाहारं कथं सीतोपभीक्ष्यते ॥5॥

पक्वान्ने स्वादिष्ट खाई जी विशालाक्षी मैथिली ।

वनात शुष्क आहार कसा खाऊ शकेल ती ॥5॥

गीतवादित्रनिर्घोषं श्रुत्वा शुभसमन्विता।

कथं क्रव्यादसिंहानां शब्दं श्रोष्यत्यशोभनम् ॥6॥

शुभ वस्तुसवे राही ऐके जी मधुरध्वनी ।

कशी विक्राळ सिंहाची गर्जना ऐकेल ती ॥6॥

महेन्द्रध्वजसंकाश: क्व नु शेते महाभुज: ।

भुजं परिघसंकाशमुपाधाय महाबल: ॥7॥

जो इन्द्रध्वज समान जनां उत्सव भासतो ।

महाबली कशी निद्रा स्वबाहुवरती करी ॥7॥

पद्मवर्णं सुकेशान्तं पद्मनि:श्वासमुत्तमम् ।

कदा द्रक्ष्यामि रामस्य वदन पुष्परेक्षणम् ॥8॥

सुकेश श्वास सुगन्धी पद्मवर्ण ज्याचा अश्या ।

कमलनेत्र रामाचे मुख केव्हां पाहीन मी ॥8॥

वज्रसारमयं नूनं हृदयं मे न संशय:।

अपश्यान्त्या न तं यद् वै फलतीदं सहस्रधा ॥9॥

हृदय मम वज्राचे असावे नच संशय ।

छिन्न जे का नसे होत श्रीरामा नच पाहता ॥9॥

यत् त्वया करुणं कर्म व्यपोह्य मम बांधवा:।

निरस्ता: परिधावन्ति सुखार्हा: कृपणा: वने ॥10॥

आपुल्या निर्दय कर्मे बान्धवा दूर धाडिले ।

सुख भोगण्या जे योग्य दीन ते वनि चालती ॥10॥

यदि पञ्चदशे वर्षे राघव: पुनरेष्यति ।

जह्याद् राज्यं च कोशंच भरतो नोपलक्षये ॥11॥

पन्ध्राव्या वर्षी येता राम पुन्हा वनातुनी ।

भरत राज्य वा कोश सोडेल नच वाटते ॥11॥

भोजयन्ति किल श्राद्धे केचित स्वानेव बान्धवान ।

तत: पश्चात समीक्षन्ते कृतकार्या द्विजोत्तमान ॥12॥

तत्र ये गुणवतश्च विद्वांसश्च द्विजातय: ।

न पश्चात तेऽभिमन्यन्ते सुधामपि सुरोपमा: ॥13॥

काही लोक श्राद्धकाळी बान्धवांसह जेवती ।

कृत्य कर्त्या ब्राहमणांना नंतर जेवू घालती ॥12॥

देवतुल्य गुणवान जे त्यात विद्वान उत्तम ।

अमृतही न करती ते स्वीकार त्यानंतर ॥13॥

ब्राह्मणेष्वपि वृत्तेषु भुक्तशेषं द्विजोत्तमा:।

नाभ्युपेतुमलं प्राज्ञा: शृङ्गच्छेदमिवर्षभ: ॥14॥

जेवता ब्राह्मणच पूर्वी द्विजोत्तम न जेवती ।

अपमानभयास्तव जसे बैला शृंगच्छेद न आवडे ॥14॥

एवं कनीयसा भ्रात्रा भुक्तं राज्यं विशाम्पते ।

भ्राता ज्येष्ठो वरिष्ठश्च किमर्थं नावमन्यते ॥15॥

तसे कनिष्ठ बंधूने राज्य जे भोगले असे ।

ज्येष्ठ बन्धु कसा त्याचा करी स्वीकार नंतर ॥15॥

न परेणाहृतं भक्ष्यं व्याघ्रः खादितुमिच्छति ।

एवमेव नरव्याघ्रःपरलीडं ण संस्यते ॥16॥

दुसऱ्याने मारलेले व्याघ्र खातो न भक्ष्य ते ।

पुरुषसिंह तसा राम परराज्य न चालवी ॥16॥

हविराज्यं पुरोडाशः कुशा यूपाश्च खादिराः।

नैतानि यातयामानि कुर्वन्ति पुनरध्वरे ॥17॥

यज्ञात वापरलेले पुरोडाश खदिर कुश ।

पुन्हा दुसऱ्या यज्ञी विद्वान न उपयोजिती ॥17॥

तथा ह्यात्तमिदं राज्यं हृतसारां सुरामिव ।

नाभिमन्तुमलं रामो नष्टसोममिवाध्वरम् ॥18॥

सुरा नि:सार अवशिष्ट सोमरस यज्ञातिल ।

तसा भुक्त राज्यास न करि ग्रहण राघव ॥18॥

नैवंविधमसत्कारं राघवो मर्षयिष्यति ।

बलवानिव शार्दूलो वालधेरभिमर्शनम् ॥19॥

बलवान व्याघ्र न सोशी पुच्छ ओढे कोणिही।

श्रीरामा नच सोसेल तैसा अपमान हा ॥19॥

नैतस्य सहिता लोका भयं कुर्युर्महामृथे ।

अधर्म त्विह धर्मात्मा लोकं धर्मेण योजयेत ॥20॥

न करू शकती भीत श्रीरामा जनसागर ।

अधर्म म्हणुनी राज्य त्यक्त धर्मात्मा करी ॥20॥

नन्वसौ काञ्चनैर्बाणैर्महावीर्यो महाभुज:।

युगान्त इव भूतानि सागरानपि निर्दहेत ॥21॥

सुवर्णबाणे आपुल्या दग्ध सागर करू शके ।

जसा अग्नि करी भस्म प्रलयकाली भूतला ॥21॥

स तादृश: सिंहबलो वृषभाक्षो नरर्षभ:।

स्वमेव हत: पित्रा जलजेनात्मजो यथा ॥22॥

हत स्वपित्याकडुनी नरसिंह वृषभाक्ष तो।

मत्स्यबालका जसा भक्षितो मत्स्यपिता ॥22॥

द्विजातिचरितो धर्म: शास्त्रे दृष्ट: सनातनै:।

यदि ते धर्मनिरते त्वया पुत्रे विवासिते ॥23॥

धर्मनिरत पुत्रास जर केले विवासित ।

आपणा सत्य वाटे का धर्म जो आचरती द्विज ॥23॥

गतिरेका पतिर्नार्या द्वितीया गतिरात्मज:।

तृतीया ज्ञातयो राजश्चतुर्थी नैव विद्यते ॥24॥

प्रथमाधार नारीस पति दुसरा पुत्रचि ।

तृतीय बान्धव बन्धू नसे आणखि कोणता ॥24॥

तत्र त्वं मम नैवासि रामश्च वनमाहित:।

न वनं गन्तुमिच्छामि सर्वथा हा हता हता ॥25॥

म्हणुनि तुम्हा सोडून वनी जाउ न इच्छिते ।

अशी हतबल सर्व बाजूनी जाहली असे ॥25॥

हतं त्वया राष्ट्रमिदं सराज्यं हता: स्म सर्वा: सह मन्त्रिभिश्च ।

हता सपुत्रास्मि हताश्च पौरा: सुतश्च भार्याच तव प्रहृष्टौ ॥26॥

तुम्ही असे राष्ट्र अन्य राज्यासवे केले असे नष्ट मन्त्रिगणांसवे।

प्रजेसवे मलाहि नष्ट प्रसन्न करण्या भार्येस एका पुत्रासह तिच्या ॥26॥

इमां गिरं दारुणशब्दसंहितां निशम्य रामेति मुमोह दु:खित:।

तत: स शोक प्रविवेश पार्थिव: स्वदुष्कृतं चापि पुनस्तथास्मरन् ॥27॥

कठोर कौसल्या वच ऐकता असे हे राम म्हणुनी दशरथ मूर्च्छित पडे ।

तश्या अवस्थेत स्मरण होतसे तया दुष्कृत्य ज्याचा परिणाम असे हा ॥27॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे एकषष्टितम: सर्ग:॥61॥

अयोध्याकाण्ड सर्ग 62

एवं तु कृद्धया राजा राममात्रा सशोकया ।
श्रावित: परुषं वाक्यं चिन्तयमास दु:खित:॥1॥

कठोर वच कौसल्या राममाता शोकाकुल ।
सुनावता दशरथा होइ दु:खित चिन्तित ॥1॥

चिन्तयित्वा स च नृपो मोहव्याकुलितेंद्रिय:।

अथ दीर्पण कालेन संज्ञामाप परंतप ॥2॥

चिन्तित गलितगात्र होत दीर्घकाल तसा ।

शुद्धीत नंतर येई शत्रुनाशक दशरथ ॥2॥

स संज्ञामुपलभ्यैव दीर्घमुष्णं च निश्वसन् ।

कौसल्या पार्श्वतो दृष्ट्वा ततश्चिन्तामुपागमत् ॥3॥

शुद्धीवर येता घेई दीर्घ श्वास उष्ण तो ।

कौसल्येस पाहुनि जवळी चिन्तेत पुन्हा पडे ॥3॥

तस्य चिन्तयमानस्य प्रत्यभात् कर्म दुष्कृतम् ।

यदनेन कृतं पूर्वमज्ञानाच्छब्दवेधिना ॥4॥

चिन्ताग्रस्त तया होई दुष्कर्म स्मरण पुन्हा ।

विस्मृतीत गेलेले शब्दवेधी नृपा तदा ॥4॥

अमनास्तेन शोकेन रामशोकेन च प्रभुः।

द्वाध्यामपि महाराजः शोकाभ्यामभितप्यते ॥5॥

रामशोकासह या शोके त्यामुळे संतप्त मन ।

वेदना कारणे दोन्ही महाराजांस असह्य जे ॥5॥

दह्यमान्स्तु शोकाभ्यां कौसल्यामाह दु:खित:।

वेपमानोञ्जलिं कृत्वा प्रसादार्थमवाङ्मुख:॥6॥

शोकदग्ध दशरथ दु:खे कम्पित खालती ।

मान घालुनि जोडून हात तिजला वदे ॥6॥

प्रसादये त्वां कौसल्ये रचितोऽयं मयाञ्जलि ।

वत्सला चानृशंसा च त्वं हि नित्यं परेष्वपि ॥7॥

सर्वांशी दया वात्सल्ये कौसल्ये वागतेस तू ।

मजवरी करी तैसी हात जोडुनि विनवितो ॥7॥

भर्ता तु खलु नारीणां गुणवान् निर्गुणोऽपि वा ।

धर्मं विमृशमानानां प्रत्यक्षं देवि दैवतम् ॥8॥

गुणवान निर्गुणी वा भर्ता प्रत्यक्ष देवता ।

सती धर्मव्रती नारी ऐसाच विचार मनी ॥8॥

सा त्वं धर्मपरा नित्यं दृष्टलोकपरावरा ।

नार्हसे विप्रियं वक्तुं दु:खितापि सुदु:खितम् ॥9॥

तू सदा धर्मतत्पर भान ठेवी भले बुरे ।

दु:खात मी तशी तूही कटु वचन न बोलसी ॥9॥

तद् वाक्यं करुणं राज्ञ: श्रुत्वा दीनस्य भावितम् ।

कौसल्या व्यसृजद् बाष्पं प्रणालीव नवोदकम् ॥10॥

करुण वच राजाचे दु:खी जो ऐकुनी तया।

नववर्षजलसम अश्रु कौसल्या नेत्रातुनी ॥10॥

सा मूर्ध्नि बद्ध्वा रुदती राज्ञ: पद्ममिवाञ्जलिम् ।

सम्भ्रमादब्रवीत् त्रस्ता त्वरमाणाक्षरं वच:॥11॥

रडे शिरी धारुनी ती नृपपद्महस्तअंजुली ।

सम्भ्रमित होई त्रस्त उच्चारी बोल हे त्वरे ॥11॥

प्रसीद शिरसा याचे भूमौ निपतितास्मि ते ।

याचितास्मि हता देव क्षन्तव्याहं नहि त्वया ॥12॥

प्रसन्न व्हा महाराज मस्तक पायी ठेवते ।

याचना आपण केली त्यामुळे मज वाटते

मेल्यासम क्षमा करा मजला अपराधास्तव ॥12॥

नैषा हि सा स्त्री भवति श्लाघनीयेन धीमता ।

उभयोर्लोकयोलोके पत्या वा सम्प्रसाद्यते ॥13॥

पति स्पृहणीय पत्नीस करतो याचना जिचा ।

कुलस्त्री म्हणण्या योग्य उभय लोकी ती नसे ॥13॥

जानामि धर्मं धर्मज्ञ त्वां जाने सत्यवादिनम् ।

पुत्रशोकार्तया तत्तु मया किमपि भाषितम् ॥14॥

धर्मज्ञ आपण मीही जाणते धर्म बोलले ।

अयोग्य केवळ शोक पीडित मी झाल्यामुळे ॥14॥

शोको नाशयते धैर्यं शोको नाशयते श्रुतम् ।

शोको नाशयते सर्वं नास्ति शोकसमो रिपु:॥15॥

शोक नाश करी धैर्य शास्त्रज्ञानहि संपवी ।

सर्वांचा नाश करतो शोक शत्रु अनन्यही ॥15॥

शक्यमापतित: सोढुं प्रहारो रिपुहस्तत:।

सोढुमापतित: शोक: सुसूक्ष्मोऽपि न शक्यते ॥16॥

शत्रूचा शस्त्रप्रहार सोसणे शक्य ते असे ।

परि दैववशे प्राप्त शोक किंचित न सोसवे ॥16॥

वनवासाय रामस्य पञ्चरात्रोऽत्र गण्यते ।

य: शोकहतहर्षाया: पञ्चवर्षोपमो मम ॥17॥

वनवासी राम जाता पाच रात्रीच संपल्या ।

हत हर्ष मला शोके वर्षासम पाच भासती ॥17॥

तं हि चिन्तयमानाया: शोकोऽयं हृदि वर्धते ।

नदीनामिव वेगेन समुद्रसलिलं महत ॥18॥

जसे नदीच्या वेगे समुद्रजल वाढते ।

तसे चिन्तन रामाचे शोकास मम वाढवी ॥18॥

एवं हि कथयन्त्यास्तु कौसल्याया: शुभं वच:।

मन्दरश्मिरभूत सूर्यो रजनी चाभ्यवर्तत ॥19॥

अथ प्रह्लादितो वाक्येर्देव्या कौसल्यया नृप:।

शोकेन च समाक्रान्तो निद्राया वशमेयिवान् ॥20॥

शुभ वचन कौसल्या बोलत असता असे ।
मंद होउनि रवितेज येतसे रजनी जगी ॥19॥
वचने कौसल्येच्या प्रसन्न होउनि नृप ।
शोकपीडित असुनी निद्रावश तो होतसे ॥20॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे द्विषष्टितम: सर्ग: ॥62॥

अयोध्याकांड सर्ग 63

प्रतिबुद्धो मुहूर्तेन शोकोपहतचेतन:।
अथ राजा दशरथ: स चिन्तामभ्यपद्यत ॥1॥

दशरथ जागृत होई अल्प काळच निद्रित ।
मनी चिंता करी त्याच्या हृदयी शोकव्याकुळ ॥1॥

रामलक्ष्मणोश्चैव विवासाद् वासवोपमम् ।

आपेदे उपसर्गस्तं तम: सूर्यमिवासुरम् ॥2॥

रामलक्ष्मण गेल्याने वनी चिन्तित दशरथ।

अन्धकारे जसा सूर्य राहुने ग्रासल्यामुळे ॥2॥

सभार्ये हि गते रामे कौसल्यां कोसलेश्वर।

विवक्षुरसितापाङ्गी स्मृत्वा दुष्कृतमात्मन:॥3॥

पत्नीसहित श्रीराम वनी जाता दशरथ ।

पूर्वीचे स्मरुनी पाप वदे कौसल्या राणिस ॥3॥

स राजा रजनी षष्ठी रामे प्रव्राजिते वनम् ।

अर्धरात्रे दशरथः सोऽस्मरद् दुष्कृतं कृतम् ॥4॥

सहाव्या रात्रि श्रीराम गेल्यावर दशरथ ।

स्मरे दुष्कृत्य झालेले हातुनी पूर्वि एकदा ॥4॥

स राजा पुत्रशोकार्तः स्मृत्वा दुष्कृत्यमात्मनः।

कौसल्यां पुत्रशोकार्तामिदं वचनमब्रवीत् ॥5॥

पुत्रशोकार्त राजास आठवे पूर्वदुष्कृत ।

सांगू लागे कौसल्येस पुत्रशोकात मग्न जी ॥5॥

यदाचरति कल्याणि शुभं वा यदि वाशुभम् ।

तदेव लभते भद्रे कर्ता कर्मजमात्मन:॥6॥

शुभ वा अशुभ कल्याणी कर्म जे करतो नर ।

फल तसे सुख वा दु:ख कर्त्यास प्राप्त होतसे ॥6॥

गुरुलाघवमर्थानामारम्भे कर्मणां फलम् ।

दोषं वा यो न जानाति स बाल इति होष्यते ॥7॥

कर्म करता आरम्भ न जाणे फलशक्यता ।

गुण दोष फळाचे त्या तो नर मूर्ख जाणणे ॥7॥

कश्चिदानवणं छित्त्वा पलाशांश्च निषिञ्चति ।

पुष्पं दृष्ट्वाफले गृध्नु: स शोचति फलागमे ॥8॥

पळसाचे सुन्दर फूल पाहुनी फळही तसे।

अपेक्षी सुन्दर त्यासाठी आम्रवृक्षा तोडुनी।

लावी पळसाचे झाड पाहुनी फळ खन्ततो॥8॥

पळसाचे फूल जसे सुन्दर तसे फळही सुन्दर असेल असे वाटणारा

अविज्ञाय फलं यो हि कर्मं त्वेवानुभावति ।

स शोचेत फलवेलायां यथा किंशुकसेचक:॥9॥

न जाणता फल कर्माचे फक्त कर्म करील जो ।
शोकग्रस्त तसा होई आम्रस्थलि पळस लावुन ॥9॥

सोऽहमाम्रवणं छित्त्वा पलाशांश्च न्यषेचयम् ।
रामं फलागमे त्यक्त्वा पश्चाच्छोचामि दुर्मतिः ॥10॥

मीही आम्रवन कापून लावले पळस तिथे ।
आणि रामास त्यागून पश्चात्तापदग्ध आता ॥10॥

लब्धशब्देन कौसल्ये कुमारेण धनुष्यता ।
कुमारः शब्दवेधीति मया पापमिदं कृतम् ॥11॥

शब्दवेधी अशी ख्याती कौमार्यी मम होतसे ।

त्यामुळे गर्वाने मम घडले पाप हातुनी ॥11॥

तदिदं मेऽनुसंप्राप्तं देवि दु:खं स्वयंकृतम् ।

संमोहादिह बालेन यथा स्याद्भुक्षितं विषम् ॥12॥

ऐसे स्वये प्राप्त देवि दु:ख स्वकृतीनेच मी ।

अज्ञाने बालकाने खावे विषारी फळ जसे ॥12॥

यथान्य: पुरुष: कश्चित्पलाशैमोहितो भवेत् ।

एवं मवाप्यविज्ञातं शब्दवेध्यमिदं फलम् ॥13॥

जसा पुरुष अज्ञानी पलाशपुष्पे मोहित ।
शब्दवेधित्व गुणाचे ना मी जाणले हे फळ ॥13॥

देव्यनूढा त्वमभवो युवराजो भवाम्यहम् ।
तत: प्रावृद्धनुप्राप्ता मम कामविवर्धिनी॥14॥

देवी तुज वरण्यापूर्वी जेव्हां युवराज मी असे ।
तदा मम मृगया इच्छा वर्षाकाळे वाढली ॥14॥

अपास्य हि रसान्भौमास्तप्त्वा च जगदंशुभि:।
परेताचरितां भीमां रविराचरते दिशम् ॥15॥

शोषुनी रस भूमीतिल स्वकिरणे ताप जगा ।
देउनी लागे जाऊ सूर्य दक्षिण दिशेकडे ॥15॥

उष्णमन्तदंघ सद्य: स्निग्धाददृशिरे घना:।
ततो जहापरे सर्वे भेकसारङ्गवर्हिण:॥16॥

असता नष्ट होउनी उष्मा घन जलभारित ।
दिसता चातक मोर दर्दुरादि आनन्दती ॥16॥

क्लिन्नपक्षोत्तरा: स्नाता: कृच्छ्रादिव पतत्त्रिण:।
वृष्टि वातावधूताग्रान्पादपानभिपेदिरे ॥17॥

पंख जले भिजल्याने जणु स्नात तपास्तव।
शेंडे हलणाऱ्या वृक्षांचा पक्षी घेति आश्रय ॥17॥

पतितेनाम्भसाऽऽच्छन्नः पतमानेन चासकृत।
आबभौ मत्तसारङ्गस्तोयराशिरिवाचलः ॥18॥

हत्ती मत्त भिजलेला पतित पर्वतासम।
तरङ्गरहित किंवा समुद्रासम दिसतसे ॥18॥

पाण्डुरारुणवर्णानि स्रोतांसि विमलान्यपि।
सुस्रुवुर्गिरिधातुभ्यः सभस्मानि भुजङ्गवत् ॥19॥

पर्वतवाही स्रोत वा झरे निर्मल शुभ्रही ।
भुजङ्गासम दिसती मिळुनी भस्म धातुनी ॥19॥

तस्मिन्नतिसुखे काले धनुष्मानिषुमान् रथी ।
व्यायामकृतसंकल्प: सरयूमन्वगां नदीम् ॥20॥

सुखद वर्षाऋतु काले शिकारीस मी जातसे ।
धनुर्बाणासह रथी बैसुनी शरयूतटी ॥20॥

निपाने महिषं रात्रौ गजं वाभ्यागतं मृगम् ।
अन्यद् वा श्वापदं किञ्चिज्जीघांसुरजितेन्द्रिय ॥21॥

वाटले तटि येतील पिण्या जल गज मृग ।
वा अन्य श्वापद रात्री शिकार करीन तदा ॥21॥

अथान्धकारे त्वौषं जले कुम्भस्य पूर्यत:।
अचक्षुर्विषये घोषं वारणस्येव नर्दत:॥22॥

आवाज जलभरणाचा घटी वाटे जणू गज ।
पिताना जल होई काळोखात दिसे नच ॥22॥

ततोऽहं शरमुध्दृत्य दीप्तमाशीविषोपमम् ।
शब्दं प्रति गजप्रेप्सुरभिलक्ष्यमपातयम् ॥23॥

वेध मी गजशुंडेचा घेउनी बाण सोडला ।
भयंकर दीप्तिमान विषारी तीर सर्पापरी ॥23॥

अमुञ्चं निशितं बाणमहमाशीविषोपमम् ।
तत्र वागुषसि व्यक्ता प्रादुरासीद् वनौकस:॥24॥
हा हेति पतत्स्तोये बाणाद् व्यथितमर्मण:।
तस्मिन्निपतिते भूमौ वाग्भूत् तव मानुषी ॥25॥

विषसर्प जसा बाण सोडता कानी ध्वनी ।
येत वनवासि कोणी हाहा:कार करीतसे ॥24॥

बाणे मम मर्मी त्याच्या पीडा अति होतसे ।
धराशायी होता तो मानववाणी प्रकटली ॥25॥

कथमस्मद्विधे शस्त्रं नियतेच्च तपस्विनि।
प्रविविक्तां नदी रात्रावुदाहारोऽहमागत:॥26॥

मजसम तपस्व्यास विंधिले शस्त्रे कुणी ।
नदीतटी जल नेण्या एकान्ती मी येतसे ॥26॥

इषुणाभिहत: केन कस्य वापकृतं मया ।
ऋषेर्हि न्यस्तदण्डस्य वने वन्येन जीवन:॥27॥

कथं तु शस्त्रेण वधो मद्विधस्य विधीयते ।

जटाभारधरस्यैव वल्कलाजिनवाससः॥28॥

को वधेन ममार्थी स्यात् किं वास्यापकृतं मया ।

एवं निष्फलमारब्धं केवलानर्थसंहितम् ॥29॥

मज बाण कोण मारी कुणास मी त्रासिले ।

ऋषितुल्य कुणा पीडा न देत जगणे मम ॥27॥

जटा धारण करुनी वल्कले धारण करी ।

शस्त्राने वध करण्या कोण उद्युक्त जाहला ॥28॥

वनी फलमूल खात निर्वाह मी करीतसे ।

वधून मज कुणा लाभ काय अपराध मम ॥29॥

न क्वचित् साधु मन्येत यथैव गुरुतल्पगम् ।

नेमं तथानुशोचामि जीवितक्षयमात्मन:॥30॥

मातरं पितरं चोभावनुशोचामि मध्दे ।

तदेतन्मिथुनं वृद्धं चिरकालभृतं मया ॥31॥

मयि पञ्चत्वमापन्ने कां वृत्तिं वर्तयिष्यति।

वृद्धौ च मातापितरावहं चैकेषुणा हत:॥32॥

केन स्म निहता: सर्वे सुबालेनाकृतात्मना ।

मारि जो मज त्या कोणी समजेल न सज्जन ।
चिंता मृत होण्याची नसे परि मम मातापितरे ॥30॥
कष्टी होतील याचा शोक होत असे मज ।
दोघांचा साम्भाळ केला मी अनेक वर्षांमध्ये ॥31॥
होता मृत मी त्यांचा कसा निर्वाह होइल ।
शर मारुनि वध केला मातापित्यांचाहि तये ॥32॥
कोण हा असा अविवेकी अजितेन्द्रिय मारक ।

तां गिरं करुणं श्रुत्वा मम धर्मानुकांक्षिण: ॥33॥

कराभ्यां सशरं चापं व्यथितस्यापतद् भुवि ।

ऐकुनी करुणोद्गार बहु व्यथित मी धार्मिक ॥33॥

धनुष्यबाण गळले भूमीवर करातुनि ।

तस्याहं करुणं श्रुत्वा ऋषेर्विलपतो निशि॥34॥

सम्भ्रान्त: शोकवेगेन भृशमासं विचेतन:।

ऋषीचे करुण बोल ऐकुनी चेतना मम ॥34॥

शोके नष्ट जणु होई न सुचे काय मी करू ।

तं देशमहमागम्य दीनसत्त्व: सुदुर्मना:॥35॥

अपश्यमिषुणा तीरे सख्वास्तापसं हतम् ।

अवकीर्णजटाभारं प्रविद्धकलशोदकम् ॥36॥

पांसुशोणितदिग्धाङ्गं शयानं शल्यवेधितम् ।

स मामुद्रीक्ष्य नेत्राभ्यां त्रस्तमस्वस्थचेतनम् ॥37॥

इत्युवाच वच: क्रूरं दिधक्षन्निव तेजसा ।

दीन दु:खी मने स्थानी सरयू तीरी जाउनी ॥35॥

पाहिले मम बाणाने तपस्वी एक विंधित ।

विस्कळित जटा ज्याच्या घटातिल जल सांडले ॥36॥

रक्त धूलिकणे मलिन देहे पतित भूवरी ।

मज पाहुनि नेत्रांनी जे भस्म करती जणु ॥37॥

मजला कठोर वाचे बोलला तेधवा असे ।

किं तवापकृतं राजन् वने निवसता मया ॥38॥

जिहीर्षरम्भो गर्वर्थं यदहं ताडितस्त्वया ।

वनवासी मला राजा कशास्तव बाण मारुनी ॥38॥

काय अपराध तुझा केला ज्यामुळे मज मारले ।

एकेन खलु बाणेन मर्मण्यभिहते मयि॥39॥

द्वाबन्धौ निहतो वृद्धौ माता जनयिता च मे ।

एका बाणे तुम्ही केले शरीरा विदीर्ण मम ॥39॥

आणि त्यासवे वृद्ध तैसे मातापित्या मम ।

तौ नूनं दुर्बलावन्धौ मत्प्रतीक्षौ पिपासितौ ॥40॥

चिरमाशां कृतां कष्टां तृष्णां संधारयिष्यत:।

दुबळे अन्ध दोघे ते पिपासित पिण्या जल ॥40॥

प्रतीक्षेत असतिल ते कष्टी केव्हां येईन मी ।

न नूनं तपसो वास्ति फलयोग: श्रुतस्य वा ॥41॥

पिता यन्मा न जानीते शयानं पतितं भुवि ।

शास्त्रज्ञान तप माझे न उपयोगि येइ ते ॥41॥

पित्या ज्ञात न होई की मृत्युशय्येवर मी असे ।

जानन्नपि च किं कुर्यादशक्तश्चापरिक्रम:॥42॥

भिद्यमानमिवास्क्तस्रातुमन्यो नगो नगम् ।

जाणले जरि दौर्बल्ये करण्या असमर्थ काहिही॥42॥

छिन्न वृक्ष दुज्या वृक्षा जसा न वाचवू शके ।

पितुस्त्वमेव मे गत्वा शीघ्रमाचक्ष्व राघव ॥43॥

न त्वामनुदहेत् कृद्धो वनमग्निरिवैचित ।

तरी नृपा स्वत: तुम्ही सांगा जाउनि मत्पित्या ॥43॥

वणव्यातिल अग्नीसम भस्म ते न करो तुम्हा ।

इयमेकपदी राजन् यतो मे पितुराश्रम:॥44॥

तं प्रसादय गत्वा न त्वां संकुपित: शयेत ।

आश्रम मम पित्याचा याच वाटेवरी असे ॥44॥

प्रसन्न करुनि सांगा ज्यामुळे शाप देति ना ।

विशल्य कुरु मां राजन् मर्म मे निशित: शर:॥45॥

रुणद्धि मृदु सोत्सेधं तीरमम्बुरयो यथा ।

शर काढावा राजन् वेदना मज देतसे॥45॥

जसा नदीचा वेग किनाऱ्या वालुकामय ।

सशल्य: क्लिश्यते प्राणैर्विशल्यो विनशिष्यति॥46॥

इति मामविशच्चिन्ता तस्य शल्यापकर्षणे ।

दु:खितस्य च दीनस्य मम शोकातुरस्य च ॥47॥

लक्षयामास स ऋषिश्चिन्तां मुनिसुतस्तदा।

जरी तो वेदनादायी काढता प्राण जाइल ॥46॥

माझ्या मनात चिन्ता ही करता मान्य याचना।

दु:खी दीन अश्या माझ्या शोकाकुल मनातिल ॥47॥

चिन्ता मुनिकुमार जाणुनी मज बोलला ।

ताम्यमानं स मां कृच्छ्रादुवाच परमार्थवित् ॥48॥

सीदमानो विवृत्ताङ्गोऽचेष्टमानो गत: क्षयम् ।

संस्तभ्य शोकं धैर्येण स्थिरचित्तो भवाम्यहम् ॥49॥

यथार्थ चिन्ता जाणून महर्षि मजला म्हणे ॥48॥

वेदना असह्य मजला कष्ट करण्यास काहिही ।

मृत्युसमीप असता स्थिरचित्ते मी बोलतो ॥49॥

ब्रह्महत्याकृतं तापं हृदयादपनीयताम् ।

न द्विजातिरहं राजन् मा भूत् ते मनसो व्यथा ॥50॥

ब्रह्महत्या घडे चिन्ता न ठेवा तुमच्या मनी ।

नसे मी ब्राह्मण तेव्हां व्यथा ही नच वागवा ॥50॥

शूद्रायामस्ति वैश्येन जातो नरवराधिप ।

इतीव वदतः कृछ्राद् बाणाभिहतमर्मणः॥51॥

विधूर्णतो विचेष्टस्य वेपमानस्य भूतले ।

तस्य त्वाताम्यमानस्य तं बाणमहमुद्धरम्।

स मामुद्रीक्ष्य संत्रस्तो जहौ प्राणांस्तयोधन:॥52॥

शूद्र माता पिता वैश्य यांचा पुत्र मी आहे ।

बाणाच्या वेदनेने तो इतुकेच बोलुनी थके ॥51॥

डोळे फिरवीत होता तडफड करिता तया ।

वेदना थांबविण्या मी त्याच्या बाण काढिला ।

मजकडे पाहत दु:खी प्राणत्याग करीतसे ॥52॥

जलार्द्रगात्रं तु विलप्य कृच्छ्रे मर्मव्रणं संततमुच्छवसन्तम् ।

तत: सरय्यां तमहं शयानं समीक्ष्य भद्रे सुभृशं विषण्ण:॥53॥

जलामुळे आर्द्र तयाचि गात्रे करीत विलाप सोडतसे प्राण तो ।

अश्या अवस्थेत सरयूतटी त्या मुनीसुता पाहत दु:खित मनी ॥53॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे त्रिषष्टितम:सर्ग:॥63॥

अयोध्याकाण्ड सर्ग 64

वधमप्रतिरूपं तु महर्षेस्तस्य राघवः।
विलपन्नेव्धर्मात्मा कौसल्यामिदमब्रवीत ॥1॥

महर्षीच्या वधाचे त्या करी स्मरण दशरथ।
करित रुदना सांगे कौसल्येस असे पुढे ॥1॥

तदज्ञानान्महत्पापं कृत्वा संकुलितेन्द्रिय:।

एकस्त्वचिन्तयं बुद्ध्या कथं नु सुकृतं भवेत ॥2॥

अज्ञाने महत्पाप मी करता गलितेन्द्रिय ।

विचार करि कल्याण उपाये कोणत्या घडे ॥2॥

ततस्तं घटमादाय पूर्णं परमवारिणा ।

आश्रमं तमहं प्राप्य यथाख्यातपथं गत:॥3॥

भरुनी सरयूजले तो घट घेउनि जात मी।

मार्गे कथित जाऊनी पोचलो आश्रमात मी ॥3॥

तत्राहं दुर्बलावन्धौ वृद्धावपरिणायकौ।

अपश्यं तस्य पितरौ लूनपक्षाविव द्विजौ ॥4॥

अन्ध दुर्बल असहाय्य वृद्ध पितरां तेथ मी ।

पंखाविन द्विज दोन असावे पाहिले तसे ॥4॥

तन्निमित्ताभिरासीनौ कथाभिरपरिश्रमी।

तामाशां मत्कृते हीनावुपासीनावनाथवत ॥5॥

बोलती पुत्राविषयी आशा आगमनाचि त्यां ।

मजमुळे ती नष्ट होती सर्वथा अनाथ ते ॥5॥

शोकोपहतचित्तश्च भयसंत्रस्तचेतन:।

तच्चाश्रमपदं गत्वा भूय: शोकमहं गत:॥6॥

शोकाकुल मनाने मी संवेदनशून्यचित्तही ।

आश्रमी पोचता माझा शोक अजुनी वाढला ॥6॥

पदशब्द तु मे श्रुत्वा मुनिर्वाक्यमभाषत ।

किं चिरायसि मे पुत्र पानीयं क्षिप्रमानय ॥7॥

ऐकुनी पदरवा माझ्या वाक्य उच्चारती मुनी ।

पुत्रा विलंब का झाला जल ये लवकर घेउनी ॥7॥

यन्मित्तमिदं तात सलिले क्रीडितं त्वया ।

उत्कंठिता ते मातेयं प्रविश क्षिप्रमाश्रमम् ॥8॥

बहु काळ जली क्रीडा केल्याने माता तुझी ।

उत्कंठित तुझ्यासाठी येई सत्वर आश्रमी ॥8॥

यद् व्यलीकं कृतं पुत्र मात्रा ते यदि वा मया ।

न तन्मनसि कर्तव्यं त्वया तात तपस्विना ॥9॥

जर अप्रिय तुज काही आमच्याकडुनी घडे ।

मनी ते नच वागविणे तपस्वी असल्यामुळे ॥9॥

त्वं गतिस्त्वगतीनां च चक्षुस्त्वं हीनचक्षुषाम् ।

समासक्तास्त्वयि प्राणा: कथं त्वं नाभिभाषसे ॥10॥

असहाय्या आम्हा साह्य नेत्रहीनास नेत्र तू ।

तुझ्यात आमचे प्राण बोलसी परि का न तू ॥10॥

मुनिमवक्तव्या वाचा तमहं सज्जमानया ।

हीनव्यञ्जनया प्रेक्ष्य भीतचित्त इवाब्रुवम् ॥11॥

मुनीस पाहुनी चित्ती भय माझ्या उद्भवे ।

अडखळू लागली जीभ उच्चारण अशक्य हो ।

योजुनी अस्पष्ट वाणी प्रयास करि बोलण्या ॥11॥

मनस: कर्म चेष्टाभिरभिसंस्तभ्य वाग्बलम् ।

आचचक्षे त्वहं तस्मै पुत्रव्यस्ननजं भयम् ॥12॥

मनी भय जे होते प्रयत्ने निरोधून मी ।

मुनीवर पुत्रमृत्यु संकट उद्भवले असे ।

प्रकट करण्यासाठी तया मी बोललो असे ॥12॥

क्षत्रियोऽहं दशरथो नाहं पुत्रो महात्मन:।

सज्जनावमतं दु:खमिदं प्राप्तं स्वकर्मजम् ॥13॥

महाम्या मी नसे पुत्र दशरथ नामे क्षत्रिय ।

सत्पुरुषे निंदित दु:ख स्वकर्मे प्राप्त हो मज ॥13॥

भगवंश्चापहस्तोऽहं सरयूतीरमागत:।

जिघांसु: श्वापदं किंचिन्निपाने वागतं गजम् ॥14॥

भगवान धनुर्बाणासह मी सरयूतटी ।

पाण्यावर श्वापद येता मारणे इच्छा मनी ॥14॥

तत: श्रुतो मया शब्द जले कुम्भस्य पूर्यत:।

द्विपोऽयमिति मत्वाहं बाणेनाभिहतो मया ॥15॥

घटी जल भरता येई ध्वनि ऐकू येता मला ।
हत्ती समजुनी तीर सोडला मी तयावर ॥15॥

गत्वा तस्यास्ततस्तीरमपश्यमिषुणा हृदि ।
विनिर्भिन्न गतप्राणं शयानं भुवि तापसान ॥16॥

सरयूतटी जाऊन पाहिले तीर तो मम ।
तपस्व्या लागुनिया गतप्राण दिसे मला ॥16॥

ततस्तस्यैव वचनादुपेत्य परितप्यत:।
स मया सहसा बाण उद्धृतो मर्मतस्तदा ॥17॥

पीडित बहु बाणाने तयाच्या वचनास्तव ।
बाण जो मर्मस्थानी मी काढूनी टाकला ॥17॥

स चोद्धृतेन बाणेन सहसा स्वर्गमास्थित:।
भगवन्तावुभौ शोचन्नन्धाविति विलप्य च ॥18॥

काढता बाण स्वर्गस्थ होइ स्मरुनी आपणा ।
पूजनीय मातापितया शोक विलाप करोनिया ॥18॥

अज्ञानाद् भवत: पुत्र: सहसाभिहतो मया ।
शेषमेवं गते यत स्यात तत प्रसीदतु मे मुनि ॥19॥

अज्ञाने वधिला पुत्र आपुला मी तयास्तव ।
अनुग्रह वा शाप मुनि देण्या प्रसन्न व्हा ॥19॥

स श्रुत्वा वचः क्रूरं मया तदघशंसिना ।
नाशकत तीव्रमायासं स का भगवानृषिः॥20॥

क्रूर बोल माझे पाप प्रकट करण्या जरि ।
मुनि शापे मज दण्ड कठोर न देति तरी ॥20॥

स बाष्पपूर्ण वदनो निःश्वसन शोकमूर्च्छितः।
मामुवाच महातेजाः कृताञ्जलिमुपस्थितम ॥21॥

अश्रुपूर्ण नेत्रे शोके महातेजस्वी मूर्च्छित ।
कृताञ्जलि उभ्या मज ते मुनि ऐसे बोलती॥21॥

यद्येतदशुभं कर्म न स्म मे कथये स्वयम् ।
फलेन्मूर्धा स्म ते राजन् सद्य: शतसहस्रधा ॥22॥

पापकर्म स्वत: आम्हा तू येउनी नच सांगता ।
छिन्नमस्तक हे राजन् होता सहस्रधा तुम्ही ॥22॥

क्षत्रियेण वधो राजन् वानप्रस्थे विशेषत:।
ज्ञानपूर्वं कृत: स्थानाच्च्यावयेदपि वज्रिणम॥23॥

क्षत्रिय करी जाणुनी जर वध वानप्रस्थिचा ।
इंद्रासहि वज्रधारी स्थानभ्रष्ट करील तो ॥23॥

सप्तधा तु भवेन्मूर्धा मुनो तपसि तिष्ठति ।
ज्ञानाद् विसृजत: शस्त्रं तादृशे ब्रह्मवादिनि ॥24॥

जाणुनी ब्रह्मवादीस जो प्रहार शस्त्रे करी।
मस्तकाचे तुकडे सात त्याच्या असति होत ते ॥24॥

अज्ञानाद्धि कृतं यस्मादिदं ते तेन जीवसे ।
अपि ह्यकुशलं न स्याद् राघवाणां कुतो भवान् ॥25॥

अज्ञाने करसी पाप म्हणुनी अजुनी जीवित ।
सज्ञाने करता नष्ट झाले असते रघुकुल ॥25॥

नय नौ नृप तं देशमिति मां चाभ्यभाषत:।
अद्य तं द्रष्टुमिच्छाव: पुत्र पश्चिमदर्शनम् ॥26॥

ने आम्हा स्थानि त्या जेथे मृत पुत्र आमचा ।
पाहण्या इच्छितो त्याचे घ्याया अंतिम दर्शन ॥26॥

रुधिरेणावसिक्ताङ्गं प्रकीर्णाजिनवाससम् ।
शयानं भुवि नि:संज्ञं धर्मराजवशं गतम् ॥27॥

अथाहमेकस्तं देशं नीत्वा तौ भृशदु:खितौ।

अस्पर्शयमहं पुत्रं तं मुनिं सह भार्यया ॥28॥

मग त्या दु:खित दोघां स्थानि त्या जात घेउनी ।

अचेतन पुत्र त्यांचा भूमीवर पडे जिथे ॥27॥

रक्तलिप्त सर्वाङ्गे मृगचर्म वस्त्र प्रकीर्ण ।

पत्नीसहित मुनींनी स्पर्शिले उभयांनि त्या ॥28॥

तौ पुत्रमात्मन: स्पृष्ट्वा तमासाद्य तपस्विनी ।

निपेतत: शरीरऽस्य पिता चैनमुवाच ह ॥29॥

करती स्पर्श तपस्वी दोघे पडती पुत्रावरी ।
पुत्रास त्या संबोधूनी पिता बोले तयाप्रती ॥29॥

नाभिवादयसे माद्य न च मामभिबाषसे ।
किं च शेषे तु भुमौ त्वं वत्स किं कुपितो ह्यसि ॥30॥

न वन्दन करसी आम्हा आम्हासि न बोलसी ।
भूमीवरि निजसी का का राग आमच्यावरी ॥30॥

नन्वहं तेऽप्रिय: पुत्र मातरं पश्य धार्मिकम् ।
किं च नालिङ्गसे पुत्र सुकुमार वचो वद ॥31॥

जर मी अप्रिय तुजला मातेस तरि धर्मात्मा ।
का न आलिङ्गसी पुत्रा बोल ना काहीतरी ॥31॥

कस्य वा परारात्रेऽहं श्रोष्यामि हृदयंङ्गमम् ।
अधीयानस्य मधुरं शास्त्रं वान्यद् विशेषत:॥32॥

ऐकले रात्री मधुर स्वरे शास्त्र पुराण मी ।
हृदयंङ्गम चर्चा ती ऐकु मी कोणत्या मुखे ॥32॥

को मा संध्यामुपास्यैव स्नात्वा हुतहुताशन:।
श्लाघयिष्यत्युपासीन: पुत्रशोकभयार्दितम् ॥33॥

स्नानसंध्या अग्निहोत्र करुनि कोण आता मज ।
करुनी सान्त्वन माझी सेवा कोण करेल रे ॥33॥

कन्दमूलफलं हृत्वा यो मां प्रियमिवातिथिम् ।
भोजयिष्यत्यकर्मण्यमप्रग्रहमनायकम् ॥34॥

कोण कन्द फल मूल असमर्थ अनाथ मज।
आणुनी जेवु घालेल प्रिय अतिथीसम मज ॥34॥

इमामन्धां च वृद्धां च मातरं ते तपस्विनीम् ।
कथ पुत्र भरिष्यामि कृपणां पुत्रवर्धिनीम् ॥35॥

माता दीन अन्ध,वृद्ध उत्कंठित तपस्विनी ।
तिचे पालन पोषण कसे आता करीन मी ॥35॥

तिष्ठ मा मा गमः पुत्र यमस्य सदनं प्रति।
श्वो मया सह गन्तासि जनन्या च समेधित ॥36॥

थांब पुत्रा यमराजाघरी जाउ नकोस तू ।
माता आणि मजसंगे उद्या चल बरोबर ॥36॥

उभावपि च शोकार्तावनाथौ कृपणौ वने।
क्षिप्रमेव गमिष्यावस्त्वया हीनौ यमक्षयम् ॥37॥

दोघे आम्ही दीन आर्त अनाथ असूनिया ।
परलोकवासी होऊ दोघेही तू नसल्यामुळे ॥37॥

ततो वैवस्वतं दृष्ट्वा तं प्रवक्ष्यामि भारतीम् ।
क्षमतां धर्मराजो मे बिभृयात् पितरावयम् ॥38॥

भेटुनी यमराजास सांगू आम्हा क्षमा करी ।
आमच्या सोड पुत्रास मातापितरां पोसण्या ॥38॥

दातुमर्हति धर्मात्मा लोकपालो महायशा:।
ईदृशस्य ममाक्षय्यामेकामभयदक्षिणाम् ॥39॥

महायशस्वी धर्मात्मा अनाथा मजसारख्या ।
एकदा तरि देईल अभयदान वाटे मज ॥39॥

अपापोऽसि यथा पुत्र निहत: पापकर्मणा।
तेन सत्येन गच्छासु ये लोकास्त्वस्त्रयोधिनाम् ॥40॥
यांहि शूरा गतिं यान्ति संग्रामेष्वनिवर्तन:।
हतास्त्वभिमुखा: पुत्र गतिं तां परमां व्रज ॥41॥

निष्पाप अससी पुत्रा पापकर्मी क्षत्रिय ।
म्हणुनी सत्यप्रभावे मम जाशिल लोकि त्या ॥40॥

जिथे जाती शूरवीर संग्रामे जे निवर्तती ।

उत्तम गति जी प्राप्त तयां ती तुज होइल ॥41॥

यां गतिं सगर: शैब्यो दिलीपो जनमेजय:।

नहुषो धुन्धुमारश्च प्राप्तास्तां गच्छ पुत्रक ॥42॥

जी गति सगरा शैब्या दिलिपा जनमेजया ।

नहुषा धुन्धुमारास प्राप्त तुज तीच होइल ॥42॥

या गति: सर्वभूतानां स्वाध्यायात तपसश्च या ।

भूमिदस्याहिताग्नेश्च एकपत्नीव्रतश्य च ॥43॥

गोसहस्रप्रदातृणां गुरुसेवाभृतामपि।

देहन्यासकृतां या च तां गति गच्छ पुत्रक ॥44॥

स्वाध्याये होतसे प्राप्त तपे प्राण्यां सर्वही ।

अग्निहोत्री एकपत्नी देती धेनुसहस्रही ॥43॥

तसेच महाप्रस्थान करति गुरुसेवाहि जे ।

त्यांचीच तुजला प्राप्त गति वत्सा होईल ॥44॥

नहि त्वस्मिन् कुले जातो गच्छन्त्यकुशलां गतिम् ।

स तु यास्यति येन त्वं निहतो मम बान्धव:॥45॥

आपल्या कुळी कोणाला न झाली प्राप्त दुर्गति ॥
तशी ती मिळेल ज्याने वधिले मम बान्धवा ॥45॥

एवं स कृपणं तत्र पर्यदेवयतासकृत ।
ततोऽस्मि कर्तुमुदकं प्रवृत्तः सह भार्यया ॥46॥

दीनभावे तसा त्यानी केला विलाप बहु ।
नंतर जलाञ्जली पुत्रा देण्या प्रवृत्त होति ते ॥46॥

स तु दिव्येन रूपेण मुनिपुत्रः स्वकर्मभिः ।
स्वर्गमध्यारुहत क्षिप्रं शक्रेण सह धर्मवित॥47॥

पुण्यकर्म प्रभावाने दिव्य रूप धारुनी ।
इन्द्रासह जाउ लागे शीघ्र तो स्वर्गाकडे ॥47॥

आबभाषे च तौ वृद्धौ शक्रेण सह तापसः ।
आश्वस्य च मुहूर्तं तु पितरं वाक्यमब्रवीत ॥48॥

इन्द्रासह तपस्वी तो बोले स्वमाता पितयासह ।
एक प्रहर आश्वासी आणि बोले पित्यासवे ॥48॥

स्थानमस्मि महत प्राप्तो भवतोःपरिचारणात ।
भवन्तावपि च क्षिप्रं मम मूलमुपैष्यथः॥49॥

सेवा करुनी आपली स्थान प्राप्त महान मी ।

केले आपण दोघे शीघ्र या मजमागुनी ॥49॥

एवमुक्त्वा तु दिव्येन विमानेन वपुष्मता ।

आरुरोह दिवं क्षिप्रं मुनिपुत्रो जितेन्द्रिय: ॥50॥

मुनिकुमार बोलुन ऐसे विमानी दिव्य बैसुनी ।

जातसे देवलोकास शीघ्र तो जितेन्द्रिय ॥50॥

स कृत्वाचोदकं तूर्णं तापस: सह भार्यया ।

मामुवाच महातेजा: कृताञ्जलिमुपस्थितम् ॥51॥

पत्नीसहित देऊनी पुत्रास जलाञ्जली ।
जोडुनी हात राहूनी उभा मज तो वदे ॥51॥
अद्यैव जहि मां राजन् मरणं नास्ति मे व्यथा ।
यः शरणैकपुत्रं मां त्वमकार्षीरपुत्रकम् ॥52॥
आता मार मजलाही राजा नसे मरणभय ।
पुत्रहीन मज केलेस मारुनी पुत्रा एकचि ॥52॥
त्वयापि च यदज्ञानान्निहतो मे स बालकः ।
तेन त्वामपि शप्स्येऽहं सुदुःखमतिदारुणम् ॥53॥

अज्ञाने मम पुत्राची हत्या जी केलीस तू ।

तुज भयंकर शाप त्यासाठि दु:खद देत मी ॥53॥

पुत्रव्यसनजं दु:खं यदेतन्मम सम्प्रतम् ।

एव त्वं पुत्रशोकेन राजन् कालं करिष्यसि ॥54॥

पुत्रवियोगे मज दु:ख ते कष्ट तुज होतिल ।

पुत्रशोकाने होशील कालवश तूही तसा ॥54॥

अज्ञानात्तु हतो यस्मात क्षत्रियेण त्वया मुनि:।

तस्मात त्वां नाविश्त्याशु ब्रह्महत्या नराधिप:॥55॥

त्वामप्येतादृशो भाव: क्षिप्रमेव गमिष्यति ।

जीवितान्तकरौ घोरो दातारमिव दक्षिणाम् ॥56॥

क्षत्रिय असुनि अज्ञाने मुनींस वैश्यजातिय ।

वधिलेस तये पाप ब्रह्महत्येचे न तुज ॥55॥

परि तुजलाही प्राप्त भयानक प्राणघातक ।

अवस्था जशी दात्यास दक्षिणेस अनुरूप फल ॥56॥

एवंशापं मयि न्यस्य विलप्य करुणं बहु ।

चितामारोप्यं देहं तन्मिथुनं स्वर्गमभ्ययात ॥57॥

असा शाप मज देऊनी करिता विलाप बहु ।
चितेवर देह ठेऊनी स्वर्गाप्रति जाति ते ॥57॥

तदेतच्चिन्तयानेन स्मृतं पापं मया स्वयम् ।
तदा बाल्यात् कृतं देवि शब्दवेध्यनुकर्षिणा ॥58॥

बाल्यस्वभावे देवी मी तीर शब्दवेधी मारुनी ।
स्मरे मज केले पाप पुत्रवियोग चिन्तित ॥58॥

तस्यायं कर्मणो देवि विपाकः समुपस्थितः।
अपथ्यैः सह सम्भूक्ते व्याधिरन्नरसे यथा ॥59॥

तस्मान्मामागतं भद्रे तस्योदारस्य तद् वचः॥

कुपथ्य करिता होत व्याधि देहामध्ये जशी।

तसे मम पापाचे फल होत उपस्थित ॥59॥

उदारात्म्याचे त्या शब्द शाप स्मरती मज ।

इत्युक्त्वा स रुदंस्त्रस्तो भार्यामाह तु भूमिपः॥60॥

मदहं पुत्रशोकेन संत्यजिष्यामि जीवितम् ।

चक्षुर्त्वां न पश्यामि कौसल्ये त्वं हि मां स्पृश ॥61॥

असे बोलुनि पत्नीस करित रुदन भूपति ॥60॥

कौसल्ये पुत्रशोके मी प्राणां त्यागुनि जाइन ।
शकतो न तुला पाहू तरी स्पर्श मला करी ॥61॥

यमक्षयमनुप्राप्ता द्रक्ष्यन्ति नहि मानवा:।
यदि मां संस्पृशेद् राम: सकृदन्वारभेत वा ॥62॥
धनं वा यौवराज्यं वा जीवेयमिति मे मति:।

मरणासन्न मानव बान्धवा न पाहू शके ।
श्रीराम जर येवूनी स्पर्श मज करूनिया ॥62॥
स्वीकारी युवराजपद जीवित राही मी तदा ॥

न तन्मे सदृशं देवि यन्मया राघवे कृतम् ॥63॥

सदृशं तत्तु तस्यैव यदनेन कृतं मयि ।

वर्तन श्रीरामाशी मजयोग्य नव्हते मम ॥63॥

मजशी सर्वथा योग्य परि त्याचे जे वर्तन ।

दुर्वृत्तमपि कः पुत्रं त्यजेत् भुवि विचक्षणः॥64॥

कश्च प्रव्राज्यमानो वा नासूयेत् पितरं सुतः।

दुर्वृत्त पुत्राचाही करी त्याग कुणी पिता ? ॥64॥

करता तसे कोणता पुत्र न दोष देइल पित्या?।

पुत्र दुर्वर्तनी असतानाही पिता त्याचा त्याग करत नाही पण तो मी केला आणि घराबाहेर काढल्यावर कोणताही पुत्र बापास दोष देईल पण रामाने मात्र तसे केले नाही,असा भावार्थ

चक्षुषा त्वां न पश्यामि स्मृतिर्मम विलुप्त्यते ॥65॥

दूता वैवस्वतस्यैते कौसल्ये त्वरयन्ति माम ।

तुज पाहु न शकतो मी कौसल्ये दृष्टिने मम ॥65॥

दिसती यमराजाचे दूत नेण्या उताविळ ।

अतस्तु किं दु:खतरं यदहं जीवितक्षये ॥66॥

नहि पश्यामि धर्मज्ञं रामं सत्यपराक्रमम् ।

प्राणान्ती पाहु न शकतो रामा सत्यपराक्रमी ॥66॥

याहून कोणते मोठे दु:ख मजवरि लोटले ।

तस्यादर्शनज: शोक: सुतस्याप्रतिकर्मण:॥67॥

उच्छोषयति वै प्राणान् वारि स्तोकमिवातप:।

अतुल्य जगि पुत्रास पाहू न शके शोक हा॥67॥

अल्प जला तीव्र ताप तसा प्राणांस शोषतो ।

ते मनुष्या देवास्ते ये चारुशुभकुण्डलम् ॥68॥

मुखं द्रक्ष्यन्ति रामस्य वर्षे पञ्चदशे पुन:।

मनुष्य ते नसती देव पन्धा वर्षानंतर जे ॥68॥

पाहती मुख रामाचे अलंकृत चारु कुण्डले ।

पद्मपत्रेक्षणं सुभ्रं सुदंष्ट्रं चारुनासिकम् ॥69॥

धन्या द्रक्ष्यन्ति रामस्य ताराधिपसमं मखम् ।

कमलनेत्र,सर्वांग सुंदर मुख सुशोभित ॥69॥

चन्द्रोपम रामाचे दर्शनसुख ज्यां धन्य ते।

सदृशं शरदस्येन्दो: फुल्लस्य कमलस्य च ॥70॥

सुगन्धि मम रामस्य धन्या द्रक्ष्यन्ति ये सुखम् ।

निवृत्तवनवासं तमयोध्यां पुनरागतम् ॥71॥

द्रक्ष्यन्ति सुखिनो रामं शुक्रं मार्गगतं यथा ।

शरच्चन्द्र सदृश्य प्रफुल्ल कमलासम ॥70॥

सुगन्धी श्रीराममुख पाहती धन्य होति ते ।

निवृत्त वनवासातून येति अयोध्येत पुन्हा ॥71॥

शुक्रासम रामचंद्रास पाहुनी सुखि होतिल ।

शुक्रास पहाणारे लोक सुखी होतात अशी त्यावेळी समजूत होती

कौसल्ये चित्तमोहेन हृदयं सीदतेतराम् ॥72॥

वेदये न च संयुक्तान् शब्दस्पर्शरसानहम् ।

मनात मोह कौसल्ये हृदय विदीर्ण मम ॥72॥

संवेदनारहित मज शब्द स्पर्श न जाणवे ।

चित्तनाशाद् विपद्यन्ते सर्वाण्येवेन्द्रियाणि हि ।

क्षीणस्नेहस्य दीपस्य संरक्ता रश्मयो यथा ॥73॥

संपता तैल दीपाची प्रभा नष्ट होई जशी ।

चित्तनाशे मम नष्ट चेतना इंद्रियातिल ॥73॥

अयमात्मभव: शोको मामनाथमचेतनम् ।

संसाधयति वेगेन यथा कूलं नदीरिय:॥74॥

नदीचा वेग किनारे कापे जसा शोक तसा ।

वेगे अनाथ मजला अवेतन करतसे ॥74॥

हा राघव महाबाहो हा ममायासनाशन ।

हा पितृप्रिय मे नाथ हा ममासि गत: सुत ॥75॥

हा राघवा महाबाहो हा कष्ट्सारक मम ।

हा पित्याप्रिय पुत्रा नाथा कोठे जासि तू ॥75॥

हा कौसल्ये न पश्यामि हा सुमित्रे तपस्विनि ।

हा नृशंसे ममामित्रे कैकेयी कुलपांसनि ॥76॥

हा कौसल्ये न शके पाहू हा सुमित्रे तपस्विनी ।

हा कुलाङ्गारे कैकेयी मम शत्रु क्रूर पापिणी ॥76॥

इति मातुश्च रामस्य सुमित्रायांश्च संनिधौ ।

राजा दशरथः शोचञ्जीवितान्तमुपागमम् ॥77॥

विलाप करिता ऐसा कौसल्या सुमित्रेसह ।

जीवनाचा होतसे अंत राजा दशरथाचा असा ॥77॥

तथा तु दीनः कथयन् नराधिपः प्रियस्य पुत्रस्य विवासनातुरः।
गतेऽर्थरात्रे भृशदुःखपीडितस्तदा जहौ प्राणमुदारदर्शनः ॥78॥

दीन वचना ऐसे प्रिय पुत्रविरहे बोलत नराधिप ।
मध्यरात्री दु:खपीडित तो सोडी प्राणा उदारदर्शन ॥78॥

इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्येऽयोध्याकाण्डे चतुःषष्टितमः सर्गः॥64॥

श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची इतर नऊ पुस्तकं.
यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा.

श्याम कुलकर्णी
तुझी माझी मोटो

हास्यरंगी रंगले
श्याम कुलकर्णी


श्याम कुलकर्णी
हमरी बारी
INSURANCE
STAMPING
IMMIGRATION
VISA

वाल्मिकीरामायण- ७



मराठी



श्याम कुलकर्णी


मराठी श्लोकानुवाद- श्री श्याम कुलकर्णी
॥ श्रीमद्भगवद्गीता ॥

लवकरच येत आहे.

श्री श्याम कुलकर्णी अनुवादित

मूळ वाल्मिकी रामायण मराठी श्लोकमय भाग आठवा

www.esahity.com